


मासिक वार्तापत्र • अंक 11 • जुलै 2019 • सहयोग मूल्य - रु. 5 • 12 पाने

कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक



असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या पेंशन योजनेची सत्यपरिस्थिती 6

मराठा आरक्षणाचा अन्वयार्थ 8

निवडणूका समाप्त, कामगारांची कपात सुरु 11


## मोदी सरकारचा दुसरा कार्यकाळ: कामगार-कष्टकऱ्यांवरच्या अजून मोठ्या हल्ल्यांची सुरूवात !

# उदारमतवाद नाही, फक्त क्रांतिकारक कामगारवर्गीय पक्षच फॅसिझमशी खऱ्या अर्थाने लढू शकतो !


संपादक मंडळ


मोदी सरकार 2019 च्या लोकसभा निवडणुकांमध्ये पुन्हा सत्तेवर आले आहे. अनेक जागी भाजपला मिळालेल्या अपेक्षेपेक्षा प्रचंड जास्त मतांमुळे, मतांच्या आकड्यांमधील तफावतींमुळे ईव्हीएम घोटाळ्याबद्दल देशभरामध्ये मोठ्या शंका उपस्थित केल्या जात आहेत आणि त्यापैकी अनेक शंकांमागे वैध कारणे आहेत. ईव्हीएम प्रक्रियेमध्ये असलेल्या कमतरतांमुळे शंकेला भरपूर वाव आहे की भाजपने ईव्हीएम घोटाळा काही प्रमाणात तरी केलेला आहे. परंतू ईव्हीएम हेच भाजपच्या विजयाचे कारण मुख्य कारण नक्कीच नाही. **भाजपच्या या यशाचे प्रमुख कारण आहे देशातील भांडवलदार वर्गाचा पैशांच्या राशीच्या रुपाने भरभक्कम पाठिंबा, आणि दुसरे कारण आहे संघ आणि संघप्रणीत संघटनांच्या जीवावर देशभरामध्ये अस्तित्वात असलेली एक कॅडर आधारित फॅसिस्ट शक्ती.** इतर अनेक चर्चिल्या जाणाऱ्या कारणांना या दोन कारणांचा परिणाम म्हणून आपण समजून घेऊ शकतो.

2019च्या निवडणुकीत देशभरातील बड्या भांडवलदारांनी पैशांच्या थैल्या मोकळ्या करून भाजपच्या पदरात प्रचंड पैसा ओतला, ज्याच्या जोरावर तब्बल 27,000 कोटी रुपये भाजपने निवडणूक खर्च केला. टीव्ही आणि वर्तमानपत्रांचा मुख्य धारेतील मीडिया असो, वा फेसबुक व्हॉट्सअपसह सोशल मीडिया, यांच्यावर भाजप आणि उजव्या शक्तींचा प्रचार पैशांच्या राशीच्या जोरावरच झालेला आहे. **भाजप आज देशातील भांडवलदार वर्गाचा लाडका पक्ष आहे, त्यामुळेच भांडवलदारांच्याच मालकीचा सर्व मीडीया भाजपच्या प्रचारामध्ये पूर्ण शक्तीने उतरला होता आणि झी, रिपब्लिक नाऊ, टाईम्स नाऊ, इंडिया टीव्ही सारखे चॅनेल जणू भाजपचे कार्यकर्ते असल्यासारखेच निवडणूकीचे वार्तांकन करत होते.** हे सर्वज्ञात आहे की भांडवली निवडणुकांमध्ये मतं विकत घेण्यासाठी, प्रचारासाठी, नकली उमेदवार उभे करण्यासाठी, अधिकाऱ्यांना विकत घेण्यासाठी, दारू-बिर्याणी वाटण्यासाठी पैसाच लागतो. स्वाभाविकपणे त्याच पक्षाच्या विजयाची शक्यता जास्त आहे ज्याच्याकडे पैशांचा ओघ आहे. आज इतर सर्व पक्षांना एकत्र मिळून होईल त्यापेक्षा जास्त पैशांचा पुरवठा उद्योगपती वर्गाने भाजपला चालवलेला आहे, इथपर्यंत की कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी सुद्धा प्रचारादरम्यान तक्रार केली की आमच्या पक्षाच्या 20 पट जास्त पैसा भाजपकडे पुरवला जात आहे.

**देश सध्या ज्या आर्थिक संकटातून जात आहे, त्याकडे पाहता देशातील भांडवलदार वर्गाला आपल्या बाजूने जनतेचे दमन करू शकणाऱ्या 'लोहपुरूषाचे' आणि जनतेच्या कष्टकरी हिश्श्याला दहशतीखाली ठेवू शकेल अशा फॅसिस्ट शक्तीचे सत्तेवर असणे अत्यंत गरजेचे वाटत आहे.** देशाची आर्थिक स्थिती अत्यंत गंभीर आहे. भांडवलशाही व्यवस्थेच्या स्वत:च्या अंतर्विरोधांमुळे उद्योगधंद्यांचा नफ्याचा दर घसरत आहे आणि उद्योग डबघाईला आले आहेत. परिणामी, जवळपास सर्वच बँकांकडे लाखो कोटी रुपये बुडीत कर्ज जमा झाले आहे. बीएसएनएल, जेट एअरवेज, एअर इंडिया सारख्या बलाढ्य कंपन्या बुडीत


पान 7 वर


## महाराष्ट्रात विविध अपघातांमध्ये कामगारांचे मृत्यू

# नफेखोर व्यवस्थेचे अजून किती बळी?


✍ पवन


जुलै महिना सुरू होत नाही तर, पुणे, मुंबई, नाशिक, कल्याण येथे पावसामुळे झालेल्या विविध अपघातांमध्ये 35च्या वर कामगारांचे मृत्यू झाले आहेत.

पुण्यामध्ये कोंढवा येथे तालब मशिदी जवळील आल्कन स्टायलस या इमारतीच्या पार्किंगची भिंत 29 जूनच्या रात्री दीडच्या सुमारास कोसळली. भिंतीच्या खालच्या बाजूला असलेल्या बांधकाम कामगारांच्या वस्ती वर, सर्व कामगार झोपलेले असताना, **ही भिंत कोसळून 15 कामगार ठार झाले**, ज्यामध्ये चार लहान मुलांचा समावेश आहे. याशिवाय 3 कामगार जखमी सुद्धा झाले. आल्कन स्टायलसचे बांधकाम 2011 पासून 2019 पर्यंत पूर्ण करण्यात आले. तिचे काम येथील आल्कन लँडमार्क बिल्डर या कंपनीने केले, ज्याचे कॉन्ट्रॅक्टर जगदीश अग्रवाल, विपुल अग्रवाल, विवेक अग्रवाल हे बिल्डर होते. बिल्डींग मधील राहणाऱ्या रहिवासी वर्गाने या पार्किंगच्या भिंतीवरील भेगा पडल्याचे सतत निदर्शनास आणले असण्याबद्दल फेब्रुवारी पासून सतत सांगून सुद्धा या बिल्डरांच्या निष्काळजीपणामुळे ही घटना घडली. अल्कोन लँडमार्क बिल्डरांनी मूठभर पैसे वाचवण्याच्या व स्वतःचा नफा वाढवण्याच्या उद्देशाने या तक्रारीकडे सतत दुर्लक्ष केले. कांचन बांधकाम प्रकल्पाच्या तब्बल 50 ते 70 कामगारांची राहण्याची सोय या पार्किंगच्या भिंतीच्या पलीकडे पत्र्यांच्या खोलीमध्ये करण्यात आली होती. कांचन संस्थेचे बिल्डर पंकज व्होरा, सुरेश शहा आणि रश्मीकांत गांधी हे आहेत. बांधकाम मजुरांच्या सततच्या तक्रारी होत्या की आम्हाला इथे राहायला देऊ नका कारण भिंत अंगावर कोसळू शकते पण कांचन बिल्डरने दुर्लक्ष करून त्यांना सांगितले की राहायचे तर इथेच या पत्र्यांच्या खोल्यांमध्ये राहा. पर्यायी जागा नसल्याने कामगारांना मजबुरीने येथे राहणे भाग होते. घटना घडल्यानंतर उरलेल्या सर्व कामगारांना तात्काळ दुसऱ्या जागी हलवण्यात आले.

याच प्रकारच्या **दुसऱ्या एका दुर्घटनेमध्ये पुण्यातच आंबेगाव बुद्रुक येथे सिंहगड कॉलेज कॅम्पमध्ये पाच घरांवर सीमाभिंत कोसळून सहा जण ठार झाले आहेत.** हे कामगार छत्तीसगढ मधून आलेले होते. ही घटना 1 जुलै रोजी रात्री 11 ते 12 च्या दरम्यान झाली. याच दिवशी **मुंबईमध्ये मालाडमधील पिंपरीपाडा परिसरातील झोपड्यांवर मंगळवारी मध्यरात्री दोन वाजता भिंत कोसळून २२ जणांचा मृत्यू झाला.** या दुर्घटनेत ७८ जण जखमी आहेत. कल्याणच्या दुर्गाडी परिसरातील उर्दू शाळेची भिंत कोसळून तीन वर्षांचा चिमुकला, त्याची आई आणि आणखी एक महिलेचे प्राण गेले आहे. नाशिकमध्ये सातपूर येथेही पाण्याची टाकी कोसळून चार कामगारांचा मृत्यू झाला आहे.

अशाच प्रकारची एक दुर्घटना पुण्यामध्येच फुरसुंगी येथे दोन महिन्यापूर्वी साड्यांच्या होलसेल व्यापाराच्या दुकानांमध्ये घडली होती. रात्रीच्या वेळी मालक दुकानाला बाहेरून लॉक लावून निघून गेला होता. दुकानाला खिडक्या दरवाजे नसल्या कारणाने आतून आग लागल्यानंतर चार कामगार जळून खाक झाले. कोंढव्या मध्ये ठार झालेले हे कामगार बिहार मधील कटियार जिल्ह्यातील होते, तर फुरसुंगी येथे कामगार राजस्थान मधून आलेले होते.

**प्रचंड बेरोजगारीने त्रासलेले असे असंख्य कामगार देशातील विविध भागातून पुण्यासारख्या मोठ्या शहरांमध्ये रोजगारासाठी येत असतात. हा कामगार वर्ग दिवसाला 200-300 रुपयावर सुद्धा काम करायला आणि जीवाचा धोका पत्करून अत्यंत असुरक्षित अशा ठिकाणी रहायला तयार होतो. बिल्डर कामगारांना अतिशय धोकादायक, तकलादू आणि पत्र्याच्या आवासात रहाण्याची सोय करतात - त्याचे कारण त्यांना कामगारांची काळजी नसून, त्यांचे उद्दिष्ट कामगारांनी कामाच्या ठिकाणीच रहावे आणि जास्त काम करावे हे आहे.** सर्व उद्दिष्ट फक्त बिल्डरांचा, मालकांचा नफा वाढवणे हे असल्यामुळे कामगारांच्या जीवाची


पान 4 वर

# तुमच्या देवाचा ऱ्हास

पान 10 वरून

सोयरे?"— तर ते व्याकूळ होऊन जातात, "आई आणि वडील असं का करतील?" तिथे ईश्वराचा हात असणं त्यांना सहजतेने मान्य करायला लावता आलं.

"आणि पोटदुखी?"— देव देतो.

"टीबी ने खंगवून खंगवून तुमच्या शेजाऱ्याला कोणी मारले?"— "देवाने."

"सात दिवसाच्या बाळाच्या आईला मारून कोण त्याला अनाथ करतो?"— "देव."

"आईच्या एकुलत्या एका मुलाला मारून कोण तिला असा दुःख विलाप करायला भाग पाडतो ज्याला ऐकून पशुपक्षी आणि दगडांचे सुद्धा हृदय पिळवटून निघते?"— "ईश्वर."

"चैत्र वैशाखाच्या दिवसांमध्ये एका-एका आंब्यावर दहा-दहा कोटी किड्यांना फक्त ऊन आणि हवेमध्ये मरण्याची मजा चाखण्यासाठी कोण जन्माला घालतो? पावसाळ्याच्या दिवसात पृथ्वीवर असंख्य डास, जीवजंतूंना तिळातिळाने मरण्यासाठी जन्माला घालून आपल्या अमर्याद दयेचा परिचय कोण देतो?— "ईश्वर."

"मग तर त्याच्यामध्ये थोडीशीही दया नाही. तेवढी सुद्धा नाही जितकी क्रुरातिक्रुर माणसामध्ये सुद्धा असू शकते. रडणाऱ्या मुलाला पाहून दगडाचं मन सुद्धा पघळतं . तुम्हीसुद्धा त्याच्या आईला त्यादिवशी छोट्या बाळाच्या मरणानंतर रडताना पाहून हळहळ व्यक्त करत होतात की नाही?"

"मी सुद्धा रडत होतो. कसं सुंदर बाळ, त्याचा गोल-गोल चेहरा, मोठ-मोठे डोळे आणि बिना दातांच्या चेहऱ्याने हसताना गालांवर पडलेली खळी अजूनही लक्षात आहे."

"अशा बाळाला मारणारा कोण?— माणूस की राक्षस?"— "राक्षसापेक्षाही खराब."

हो, जगामध्ये प्राण्यांच्या सुखाचे क्षण कमी आणि दुःखाचे जास्त आहेत. एक डासाचीच प्रजाती घ्यावी, तर त्याची संख्या शंख-महाशंखा (अनुवादकाचे टीपण: 1 शंख = 100 अब्ज) पेक्षाही वर जाईल आणि अशा प्रकारच्या प्रजाती सुद्धा आपल्या या पृथ्वीवर अब्जावधी असतील. अत्यंत सूक्ष्म अशा, सूक्ष्मदर्शीने दिसणाऱ्या किड्यांपासून ते समुद्रातील विशाल माशांपर्यंत अब्जावधी प्रजाती आहेत. त्यांच्यापैकी बहुतेक प्रजातींमध्ये शंख-महाशंखाच्या संख्येने प्राणी आहेत. असे म्हटले जाते की जो मनुष्य इथे या लोकात निकृष्ट कर्म करतो तोच परलोकी किंवा पुनर्जन्मामध्ये निकृष्ट योनीमध्ये शिक्षा भोगण्यासाठी जन्माला येत असतो. परंतु हे म्हणणे टिकत नाही, कारण या पृथ्वीवर माणसांची सर्व संख्या दीड अब्जाच्या जवळपास आहे, मग दीड अब्ज माणसांच्या पूर्वीच्या कर्मांना भोगण्यासाठी इतक्या मोठ्या संख्येने जीव कसे जन्माला येऊ शकतात? ईश्वराने या असंख्य जीवांना फक्त शिक्षा आणि त्रास भोण्यासाठी जन्माला घालून काय आपल्या कृपेचा परिचय दिला आहे? न्याय तर त्याला स्पर्शसुद्धा करून गेला नाही, उलट त्याच्या याच कर्मामुळे हेच कळून येते की त्याच्यापेक्षा क्रूर आणि दगडाच्या काळजाचा जगामध्ये इतर कोणीही इतर कुठेही मिळणार नाही. वाघ सुद्धा हरणाची शिकार करतो, आपली भूक भागवण्यासाठी; पाल पतंगाला पकडते पोट भरण्यासाठी. सर्वच सजीव दुसऱ्या सजीवांना स्वरक्षण आणि जीविकेसाठी मारत असतात. अतिशय हाल-हाल करून मारणे त्यांना सुद्धा आवडत नाही. परंतु देव ज्यांना मारतो, त्यांच्या मासाने काय तो आपली भूक शांत करतो वा आत्मरक्षणासाठी त्याला तसे करणे गरजेचे वाटते? या दोन्ही कारणांच्या अभावात, फक्त खेळासाठी केलेले असे अघोर कृत्य ईश्वराबद्दल काय सांगून जाते?

**अनुवाद - प्रवीण सोनवणे**

# कविता - एस.ए.* सैनिकाचे गीत

**बेर्टोल्ट ब्रेष्ट**

भुकेनं बेहाल झोपलो मी
घेऊन पोटात कळ,
तेवढ्यात ऐकू पडले आवाज
उठ, जर्मनी उठ!
मग दिसली लोकांची गर्दी मार्च करताना
थर्ड राईख** कडे, ऐकले मी त्यांना म्हणताना,
मी म्हटले माझ्याकडे जगायला नाही काही
तर मी पण का न जावे त्यांच्या सोबत,
आणि मार्च करत होता माझ्यासोबत सामील
जो होता त्यांच्यामध्ये सर्वात जाड
आणि जेव्हा मी ओरडलो 'अन्न द्या, काम द्या'
तेव्हा तो जाडाही ओरडला,
तुकडीच्या नेत्याच्या पायांवर होते बूट
जेव्हा माझे पाय होते ओले
पण आम्ही दोघेही करत होतो मार्च
पाय जुळवत जोशाने,
मी विचार केला, डावा रस्ता घेऊन जाईल पुढे
त्याने म्हटले मी होतो चूक



मी ऐकला आदेश त्याचा
आणि डोळे मिटून राहिलो चालत मागे,
आणि जे होते भुकेने कमजोर
पिवळे-जर्द चेहरे घेऊन राहिले चालत
भरल्या पोटावाल्यांसोबत करत कदमताल
थर्ड राईखच्या दिशेने,
आता माहित आहे मला, तिथे उभा आहे माझा भाऊ
भूकच आहे जी जोडते आम्हाला
जेव्हा की मी मार्च करतो त्यांच्यासोबत
जे शत्रू आहेत माझे आणि भावाचेही,
आणि आता मरतोय माझा भाऊ
माझ्याचा हातांनी मारले त्याला
जाणतो जरी की तो हारला तर
वाचणार नाही मी सुद्धा-

* एस.ए.: जर्मनी मध्ये नाझी पक्षाद्वारे उभ्या केलेल्या फॅसिस्ट बळाचे संक्षिप्त नाव- उग्र फॅसिस्ट प्रचाराद्वारे यामध्ये मोठ्या संख्येने बेरोजगार तरुण आणि कामगारांची भरती करण्यात आली त्यांचे मुख्य काम होते ज्यू आणि विरोधी पक्षांवर विशेषतः कम्युनिस्टांवर हल्ले करणे आणि दहशत पसरवणे

** थर्ड राइख़: 1933 ते 1945 दरम्यान नाझी पार्टी शासित जर्मनीलाच थर्ड राइख़ म्हटले जात होते

**अनुवादः अभिजित**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वतः कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**
**लेनिन**

साथींनो
'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.


• रूम नंबर 204, हीरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9145332849
• अहमदनगर - 9156323976, 9657590491
• पुणे - 9422308125


## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापानचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**


# कामगार बिगुल

संपादक मंडळ : सोमनाथ केंजळे, सत्यनारायण

संपादकीय कार्यालय : रूम नंबर 204, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043

संपर्क : 9156323976, 9619039793

ईमेल : bigulakhbar@gmail.com

सहयोग राशी : रु. 5 (एका अंकासाठी)
वार्षिक : रु. 100 (टपाल शुल्कासह)

# मानखुर्द झोपडपट्टी : स्वच्छता, पाणी, प्रदूषण व आरोग्याच्या समस्या आज सुद्धा कायम!

✍ बबन ठोके

संविधानाच्या मते प्रत्येकास समानतेचा व बरोबरीने जगण्याचा अधिकार आहे, परंतु ही बाब जमिनी स्तरावर वास्तविकतेपासून कोसो दूर आहे. प्रत्यक्षात येथे दोन दुनिया अस्तित्वात आहेत. **एकीकडे 2018 च्या आकड्यानुसार भारतात 119 अब्जपती व 3,26,052 करोडपती आहेत. ज्याच्यासाठी शॉपिंग मॉल, हाय – वे, मल्टिप्लेक्स, स्मार्ट सिटी सारखे ऐशो-आराम व मौजमजेचे जीवन जगण्यासाठी सर्व साधने उपलब्ध आहेत. तर दुसरीकडे 84 करोड गरीब व कष्ट करणारी जनता आहे. ज्यांच्यापैकी 36 करोड लोकांच्या डोक्यावर पक्के छप्पर नाही किंवा छत सुद्धा नाही.** देशात प्रत्येक दिवसाला 5000 हजार लहान मुलं भूक, कुपोषण, उपासमारी व प्राथमिक स्तरातील आरोग्य सुविधा न मिळाल्यामुळे मरत आहेत. अलीकडेच बिहारमधील मुझफ्फरपूर येथे 'चमकी बुखार' या मुख्यत्वे पोषणाच्या कमतरतेमुळे होणाऱ्या आजारामुळे 140 पेक्षा जास्त कुपोषित मुलांचा मृत्यू झाला आहे. काय हे सामान्य मृत्यू आहेत का? नफा-तोट्यावर आधारित नफेखोर व भ्रष्ट व्यवस्थेने केलेल्या हत्या आहेत! विचार करा मित्रांनो, आज भारतातील फॅसिस्ट सत्ताधारी जमात येणाऱ्या दिवसात भारत महासत्ता व विश्वगुरू बनण्याच्या घोषणा व वल्गना करत आहे. तर दुसरीकडे देशातील गरिब-कष्टकऱ्यांना पिण्यायोग्य पाणी साफ-सफाई, शौचालय व स्वच्छते सारखे मूलभूत मानवी हक्क देखील मिळत नाहीत.

मुंबई हे जगातील सर्वात श्रीमंत असलेले 12 वे शहर आहे. **या शहराचे एक चित्र कुलाबा, बांद्रा, जुहूमध्ये पाहायला मिळते. तिथे मोठ -मोठे रुंद रस्ते, हॉस्पिटल, स्वच्छ पाणी, चोवीस तास वीज यासारख्या अनेक सुविधा उपलब्ध आहेत. यामुळे या ठिकाणचे सरासरी लोकांचे आयुर्मान 73.05 वर्षे एवढे आहे. तर दुसरीकडे याच शहराचे दुसरे चित्र गोवंडी, मानखुर्द, शिवाजीनगर, मंडाला सारख्या गरिबांच्या वस्त्या आहेत जिथे एकीकडे देवनार डंपिंग ग्राउंड व दुसरीकडे बायोगॅस ट्रीटमेंट प्लांट (एस.एम.एस.) कंपनीने घेरलेले आहे. या ठिकाणी राहणाऱ्या रहिवाशांना मानवी जीवनासाठी आवश्यक स्वच्छ पाणी, शौचालये आणि स्वच्छतेची व्यवस्थादेखील नशिबात नाही.** तिथेच एस.एम.एस. कंपनी देखील आहे, जिच्यामध्ये मुंबई शहरातील सर्व हॉस्पिटलचा मेडिकल कचरा जाळला जातो. त्यामुळे लोकांना दमा, टीबी, अस्थमा, कॅन्सर व त्वचेचे रोग होत आहेत. आणि आजपर्यंत कित्येक नागरिक, लहान मुले यामुळे मरण पावली आहेत. किती, त्याचा निश्चित आकडा देखील सरकारकडे नाही! आणि ह्याच भागात राहणारे गरीब स्वच्छता करून संपूर्ण मुंबईला चमकविण्याचे काम करतात. अशा पद्धतीने श्रीमंत धनदांडग्यांच्या नगरांना आणि कॉलनीला साफ स्वच्छ व निरोगी ठेवण्यासाठी गरिबांच्या वस्त्या बकाल, कचराकुंडी समान व नरकमय बनविण्यात येत आहेत. या ठिकाणी स्वच्छ पाणी नाही, आणि जे पाणी येते त्या पाण्यात देखील अनेक ठिकाणी गटाराचे पाणी मिळालेले असते. लोकसंख्येच्या प्रमाणात याठिकाणी शौचालये अतिशय कमी आहेत व जी आहे त्यात नियमित स्वच्छता होत नाही आणि अनेकदा तर पाणी देखील नसते. त्यामुळे ही शौचालये बऱ्याच रोगांचे कारण बनत आहेत. याच कारणांमुळे या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांचे सरासरी आयुर्मान फक्त 39 वर्षे इतके आहे!

परिणामी या भागांमध्ये मानवी विकास निर्देशांक आफ्रिकन देशांपेक्षा देखील मागे आहे. इथे 1000 हजार नवजात बालकापैकी 55 बालकांचा मृत्यू होतो. 57 टक्के मुले कुपोषित आहेत. एक मोठी लोकसंख्या दमा, टीबी, अस्थमा कॅन्सर व त्वचेचे रोग यांना रोज तोंड देत आहे. मागील वर्षी पावसाळ्याच्या अगोदर 17 नागरिक डेंगू आणि मलेरियाने मरण पावले. खरं तर हा आकडा फार कमी आहे. निश्चित सरकारी आकडा उपलब्ध नाही. संपूर्ण मुंबईला चमकविणारी गरीब व कष्टकरी जनता नरकमय जीवन जगण्यासाठी मजबूर व हतबल आहे व आपण राहत असलेल्या निवासी भागात मुलभूत सुविधा व स्वच्छतेच्या समस्येशी संघर्ष करत आहे. यांने हे स्पष्ट होते की, सरकार गरीब आणि श्रीमंतांसाठी दुहेरी मापदंड वापरत आहे. सामान्य जनतेकडून जमा केलेल्या टॅक्सच्या बळावर नेते, मंत्री, आमदार, खासदार, नगरसेवक व सरकारी अधिकारी मोठा पगार व पेन्शन घेतात व सोबत सर्व सरकारी सुविधांसह मजेत जीवन जगत असतात. परजीवी धनदांडग्यांसाठी चकचकीत अपार्टमेंट, मोठ्या पॉश कॉलन्या व अलिशान बंगले बनविण्यात येतात, शॉपिंग मॉल, मल्टिप्लेक्स, एक्सप्रेस-वे बनविले जातात. धनदांडग्यांच्या व श्रीमंतांच्या मस्तीखोरीने निर्माण झालेला कचरा, घाण व मलमूत्र आपल्या वस्त्या, चाळी, झोपड्यांच्या आसपास फेकले जाते. कारण आपण कष्टकरी लोक त्यांच्यालेखी जनावरापेक्षा देखील खाली आहोत. हेच आजचे वास्तव आहे.

मुंबईत मानखुर्द, शिवाजीनगर व गोवंडी विभागातील झोपडपट्ट्यात राहणाऱ्या लोकांचे प्रमुख व्यवसाय हे बांधकाम मजूरचे काम करणे, खाजगी ठिकाणी हाउसकीपिंग, महानगरपालिकेत कचरा गाडीवर, झाडू खात्यात ठेकेदारी ने काम करणे, ऑफिसमध्ये खालच्या दर्जाची कामे करणे, रिक्षा चालवणे आहे. साठेनगर येथे महिला श्रीमंतांच्या घरात घरकाम करणे, डोक्यावर टोपली घेऊन नवी मुंबई मध्ये लसून विकणे, तसेच घरात बसून पीस रेटवर विणकाम, ड्रेस आणि साड्यांना डिझाईन लावण्याचे काम करतात. या कामात डोळ्यांचे आजार होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात असते. अनेक जण छोटे-मोठ्या गाड्या लावणे, फेरीवाल्यांची कामे करणे अशी देखील कामे करतात व सोबत अनेक छोटे उद्योग व्यवसाय देखील मोठ्या प्रमाणात याच ठिकाणी चालू असतात. संपूर्ण मुंबईभर लागणाऱ्या तिसऱ्या आणि चौथ्या श्रेणीची कामे व एकूणच पोटापाण्यासाठी मिळेल ते काम करण्याची तयारी या ठिकाणी लोकांची दिसून येते. मानखुर्द विभागात प्रारमुख्याने मराठवाड्यातून, उत्तर प्रदेश व बिहार या ठिकाणावरून कामाच्या शोधात मुंबईत आलेल्यांचे प्रमाण मोठे आहे.

आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणून धारावी कडे पाहिले जाते पण आता हे समीकरण बदलले आहे कारण धारावीला मागे टाकत मुंबईत धारावी पेक्षाही मोठ्या चार झोपडपट्ट्या उदयास आल्या आहेत. मागील काही वर्षात कुर्ला, घाटकोपर, भांडुप, गोवंडी व मानखुर्द झोपडपट्टी उदयास आली आहे. गोवंडी व मानखुर्द प्लास्टिक आणि पत्र्याच्या घरात उदयास आलेली झोपडपट्टी आहे. ही झोपडपट्टी 1980 च्या दरम्यान वसण्यास सुरुवात झाली. याच झोपडपट्टीच्या बाजूला देवनार डंपिंग ग्राउंड आहे.

### देवनार डंपिंग ग्राउंडची समस्या

देवनार डंपिंग ग्राउंडवर 1 करोडी 24 लाख लोकांचा 9000 हजार मेट्रिक टन कचरा प्रत्येक दिवसाला टाकला जातो. डंपिंग ग्राउंडची कचरा टाकण्याची क्षमता 2016 मध्येच संपली आहे. देवनार डंपिंग ग्राउंड ला बंद करण्यासंबंधीचे आदेश देखील मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. तरीसुद्धा पालिका यासाठी काहीच पावले उचलत नाही. किंबहुना असे म्हणायला काहीच हरकत नाही की, हे डंपिंग ग्राउंड गरिबांच्या वस्ती शेजारी असल्याने पालिका उदासीन आहे. देवनार डंपिंग ग्राउंडवर वारंवार आग लागत असल्याने वायू प्रदुषणाची समस्या फार गंभीर झाली आहे. त्यामुळे आज आजूबाजूला राहणाऱ्या नागरिकांना याचा प्रचंड त्रास होत आहे. व त्यामुळे आरोग्याच्या गंभीर समस्या र्मिर्माण होत आहेत. हे डंपिंग ग्राउंड बंद न होण्याचे हे देखील कारण आहे की, या ठिकाणी भंगार माफिया द्वारे प्रत्येक महिन्याला करोडोंचा व्यापार केला जातो आणि यात पालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यापासून ते आमदार, खासदारांपर्यंत सर्वांचे हित जोडलेले आहे.

### बायोवेस्ट ट्रीटमेंट प्लांट (एस.एम.एस. कंपनी) व विषारी धुराचे साम्राज्य

चकचकीत मुंबईत एक भाग असा देखील आहे की, जिथे सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मानखुर्द-घाटकोपर लिंक रोडवर साठेनगर च्या बाजूला असलेल्या बायोवेस्ट ट्रीटमेंट प्लांट चा काळा धूर नियमित पाहणे आणि नाकातून शोषणे या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांसाठी आयुष्याचा भाग बनला आहे. मुंबईतील सरकारी व खाजगी हॉस्पिटल, डिस्पेंसरी व इतर जागेवर निघालेला बायोमेडिकल कचरा या ठिकाणी जाळला जातो. याच कारणामुळे हा प्रकल्प दिवसाचे 24 तास व वर्षाचे 365 दिवस हवेत विषारी धूर सोडत असतो. यामुळे बहुतेक लोकांना दमा, टीबी, अस्थमा, कॅन्सर व त्वचेचे रोग अशा प्रकारे रोग झाले आहेत. व कित्येक लोकांचे जीव याच कारणामुळे गेले आहे. व आज देखील हे सत्र नियमित चालू आहे. याची कल्पना पर्यावरण मंडळाला व पालिकेला पूर्णपणे आहे. तरी देखील कोणीच याबद्दल बोलत नाही. कारण 50 करोड वार्षिक उत्पन्न असलेल्या कंपनीकडून यासाठी मोठी रक्कम नियामितपणे मोजली जाते. 2001 मध्ये सुरु झालेला हा प्लॉट अगोदर शिवडी मध्ये होता. श्रीमंत वस्तीच्या शेजारी असल्या कारणामुळे त्या ठिकाणावरून हटविण्यात आला. उच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश असताना देखील 2009 मध्ये या प्लॉटला नागरिक वस्तीच्या मधोमध पर्यावरण मंडळ व महानगरपालिकेच्या सहयोगाने व सहकार्याने गरिबाच्या वस्तीत हा प्लांट लावण्यात आला. गरिबाच्या जीवाची किंमत सरकारला अजिबात नाही याचे हे प्रतिनिधिक उदाहरण आहे. 10 लाख लोकसंख्या असलेल्या भागात हा प्लॉट 2009 पासून सुरू आहे. हा प्रकल्प या विभागातील नागरिकांची जीवन-मरणाची मोठी समस्या आहे.

### स्वच्छ व पिण्यायोग्य पाण्याची समस्या

स्वच्छ व पिण्यायोग्य पाणी मिळणे हा खरतर मूलभूत अधिकार आहे आणि प्रत्येकाला तो मिळणे गरजेचे आहे. (डब्ल्यूएचओ) जागतिक आरोग्य संघटनेने देखील सांगितले आहे की, प्रत्येक व्यक्तीला 150 लिटर पिण्यायोग्य पाणी मिळायला पाहिजे. पण **गरिबांची मुंबई असलेल्या मानखुर्द मधील जवळजवळ सर्वच भागातील 60% लोकांना हा अधिकार मिळतच नाही. आणि जे मिळते ते देखील इतके घाण असते कि ते पिण्यायोग्य तर नसतेच, कधी-कधी तर गटाराचे पाणी देखील त्यात मिळालेले असते.** साठेनगर सारख्या झोपडपट्ट्यात पाच घरांना मिळून एक नळ अशी व्यवस्था असते. त्यामुळे सर्वांना पुरेसे पाणी मिळत नाही. आणि त्यामुळे कित्येक वेळेस मारामारी झाल्याचे प्रकार देखील वारंवार समोर येतात. कधी कधी तर हे प्रकार एकमेकांच्या जीवावर उठल्याचे निदर्शनात येते. उन्हाळा लागल्यानंतर पालिकेकडून जाहीर फर्मान काढून गरिबांच्या वस्तीतील पाण्यात कपात केली जाते. तर श्रीमंतांना मुबलक प्रमाणात पाणी सुरुच असते. अशा झोपडपट्ट्यात 'पाणी माफिया' कडून पाणी चोरी करून इतर झोपडपट्टीवासियांना विकले जाते. पाण्यासाठी लोकांना 400 ते 100 हजार रुपये प्रतिमहिना एवढी रक्कम मोजावी लागते. अजून एक चित्र हे देखील आहे की, झोपडपट्टीतील 50% झोपडपट्ट्यांची नोंद पालिकेच्या दरबारी नाही. पालिका यंत्रणा पाणीपुरवठा करण्यात असक्षम ठरली असून त्यामुळे देखील पाण्याची विक्री करणारे पाणी माफिया पालिका कर्मचारी, अधिकारी व प्रशासनाच्या आशिर्वादाने सक्रिय आहेत. गरिबीत राहणाऱ्या या नागरिकांच्या व्यथाकडे मात्र व्यवस्थेकडून अक्षम्य दुर्लक्ष केले जात आहे व त्याची किंमत हातावर कमावून पानावर खाणाऱ्या गरिबांना मोजावी लागते आहे.

### आरोग्याचा प्रश्न

मानखुर्द, गोवंडी, शिवाजीनगर व मंडाला सारख्या लाखो लोक राहत असलेल्या विभागात लोक आरोग्याच्या गंभीर समस्यांना तोंड देत आहेत. ज्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य दिवसाचे 24 तास व वर्षाचे 365 दिवस असेल, त्या ठिकाणी या समस्या असणे यात तस आश्चर्य देखील नाही. या परिसरात गर्दी व कोंदट वातावरणामुळे टीबीचा प्रसार मोठ्या प्रमाणावर आहे असे निरीक्षण अनेक डॉक्टरांनी नोंदविले आहे. देवनार डंपिंग ग्राउंडमुळे होणारे धुराचे प्रदुषण व दाटीवाटीच्या वस्त्या, उघडी गटारे, घाणीचे साम्राज्य, व 10 लाख लोकांना सरळ प्रभावित करणारा बायोवेस्ट ट्रीटमेंट प्लांट हे अनेक कारणांपैकी प्रमुख कारणे आहेत. मुंबई शहरात 40,000 टीबी पेशंट ची नोंद आहे. त्यापैकी सर्वात मोठा हिस्सा हा मानखुर्द, गोवंडी, शिवाजीनगर भागातील आहे. प्रदुषणाचे प्रमाण जास्त असल्या कारणामुळे अनेकांना श्वसनाचे आजार झालेले आहेत. हॉस्पिटलमधील उपचार सुरु जरी केला तरी आर्थिक कारणामुळे उपचारात सातत्य ठेवणे परवडणारे नसते. त्यामुळे अनेकांचा श्वसनाच्या विकाराने मृत्यू झाला आहे. सोबतच घाणीच्या साम्राज्यामुळे क्षयरोग, दमा, अस्थमा, डेंगू, मलेरिया यासारखे अनेक रोगांना नागरिकांना सामोरे जावे लागते. परिणामी मृत्यूला देखील कवटाळावे लागते. साठेनगर, मंडाला, पीएमजीपी, लल्लूभाई कंपाउंड, झाकीर हुसेन नगर, शिवाजीनगर अशा 6 ते 7 लाख लोकसंख्या असलेल्या विभागात एक सुद्धा दुर्जेदार सरकारी दवाखाना नाही. त्यामुळे सायन हॉस्पिटल किंवा शताब्दी हॉस्पिटल यासारख्या हॉस्पिटला पोहोचेपर्यंत कित्येकांना मधीच जीव सोडावा लागतो.

### गटर, नाली,चेंबर, दिवाबत्ती व सांडपाण्याची समस्या

**मानखुर्द सारख्या झोपडपट्टीत गटर, नाली, चेंबर या समस्या फार गंभीर आहेत. साठेनगर सारख्या चाळीमध्ये तर चाळीच्या मधोमध जाणारे नाले हे उघडेच असते त्यामुळे घाणीतील माशा जेवणावर सहज येऊन बसतात.** तर उघड्या नाल्यांचे डास चावल्याने देखील आजारांना तोंड द्यावे लागते . साठेनगर, देवनार, झाकिर हुसेन नगर सारख्या भागात कित्येक चेंबरचे ढापे तुटल्याने नवीन ढापे लावले जात नाहीत. परिणामी बऱ्याच वेळेस अंधारात लहान मुला सहित मोठी माणसे देखील यात पडली आहेत व त्यात कित्येकांचा मृत्यू देखील झाला आहे; पण पालिकेच्या नाकावरची माशीदेखील उठायला तयार नाही. इथे नाले हे वर्षानुवर्षे असेच मोडकळीस पडलेले आहे,. त्याची देखील दुरुस्ती नाही. दिवाबत्ती देखील बऱ्याच ठिकाणी बंदच असते किंवा अजिबातच नसते. पावसाळ्यात या सर्व बाबीचा नागरिकांना मोठ्या प्रमाणामध्ये त्रास सहन करावा लागतो. भांडवली राजकीय पक्ष, शासनकर्ते आणि सरकारने स्वतःच्या स्वार्थासाठी गरज म्हणून झोपडपट्टी आणि झोपडपट्टीतील नागरिकांचा वापर केला पण त्यांच्या नियोजन व गरजांची पूर्ततेकडे कधीच पाहिले नाही. मानखुर्द, देवनार, गोवंडी भागातील जनतेमध्ये स्वच्छता, पिण्याचे पाणी, नाली, चेंबर, सांडपाणी, प्रदुषण इत्यादी मुद्यांवर असंतोष खदखदत आहे. जनतेने संघटीत होऊन सन्मानाने जगण्याच्या अधिकारासाठी रस्त्यावर उतरणे आज गरज बनली आहे.

# मोदी सरकारचा दुसरा कार्यकाळ

## भांडवलदारांचे गाल खाजवण्यासाठी उरल्या सुरल्या श्रम कायद्यांच्या चिंधड्या उडवण्याची तयारी

✍ आनंद सिंह

**नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील रालोआ सरकारने आपल्या पहिल्या कार्यकाळात भांडवलदार वर्गाच्या खऱ्या सेवकाच्या रुपात काम करत अनेक कामगार-विरोधी धोरणे लागू केली. स्वत:चे खरे चरित्र लपवण्यासाठी आणि कामगार वर्गाच्या डोळ्यात धुळफेक करण्यासाठी नरेंद्र मोदीने स्वत:ला 'कामगार नंबर एक' म्हटले आणि 'श्रमेव जयते' सारखे पोकळ नारे लगावले, पण त्याच्या आडून कामगारांच्या उरल्या सुरल्या अधिकारांवर दरोडा टाकण्याचे काम चालूच राहिले.** आता जेव्हा मोदी सरकार पुन्हा सत्तासीन झाले आहे, भांडवलदारांचे भाट आणि त्यांच्या थिंक टँक अंदाज करत आहेत की मोदी सरकार या कार्यकाळामध्ये श्रम कायद्यांना पूर्णत: अर्थहीन बनवेल. लोकसभा निवडणुकांचा निकाल येताच भाजप नेते सुब्रमण्यम यांनी श्रम कायद्यांमध्ये जबरदस्त फेरबदल करण्याचे आवाहन करून टाकले. नीती आयोगाचे उपाध्यक्ष राजीव कुमार यांनी सुद्धा मोदी यांच्या शपथविधीच्या अगोदरच देशी-विदेशी भांडवलदारांना गोड बातमी देत तथाकथित श्रम सुधारांसह सर्व आर्थिक सुधारांची गती वेगवान करण्याचा भरोसा दिला.

मोदी सरकारने आपल्या गेल्या कार्यकाळातच देशी-विदेशी भांडवलदारांना खुश करण्यासाठी 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस (धंदा करण्यामध्ये सोयी-सवलती)' बद्दल आपली प्रतिबद्धता जाहीर करत 44 केंद्रिय श्रम कायद्यांना समाप्त करून मजूरी, औद्योगिक संबंध, सामाजिक आणि व्यावसायिक सुरक्षितता आणि श्रमिकांच्या आरोग्य आणि कार्यस्थळाची स्थिती अशा 4 श्रम संहिता बनवण्याची योजना केली होती. ऑगस्ट 2017 मध्ये लोकसभेमध्ये 'कोड ऑफ व्हेजेस बील' (मजूरी संहिता विधेयक) प्रस्तुत केले होते. या विधेयकानुसार आंदोलन आणि संपांमध्ये सहभागी होण्याच्या कारणांच्या आडून कामगार कपातीच्या तरतुदी केलेल्या आहेत आणि यामध्ये मालकांना कामाचे तास आणि ओव्हरटाईमची व्याख्या बदलण्याचा अधिकार सुद्धा दिला गेलेला आहे. या विधेयकामध्ये एक तरतूद ही आहे की नवीन मजुरांसाठी तीन वर्षांपर्यंत नियुक्तीकर्त्यांच्या वाट्याचा प्रॉव्हिडंट फंड सरकार देईल. जाहीर आहे की ही तरतूद करदात्यांचे खिसे कापून मालकांच्या तिजोरीमध्ये टाकण्यासाठी केलेली आहे.

या विधेयकाची तुलना अगोदर असलेल्या श्रम कायद्यांसोबत केली तर सहज लक्षात येते की कामगारांच्या किमान वेतनाला ठरवण्यावरून जी संरक्षक कलमं होती त्यांना कमजोर केले जात आहे. अगोदर किमान वेतन ठरवण्यासाठी त्रिकोणी पद्धत होती ज्यामध्ये विविध क्षेत्रातील कामगारांचे प्रतिनिधी, फॅक्टरी मालक आणि सरकारचे प्रतिनिधी मिळून केंद्रीय सल्लागार बोर्डामध्ये (सेंट्रल अॅडव्हायजरी बोर्ड) किमान वेतन ठरवत होते. आता नवीन नियमांमध्ये कामगारांचे प्रतिनिधित्व कमजोर करण्यात आले आहे ज्यामुळे किमान वेतन ठरवण्यामध्ये कामगारांची भागिदारी जवळपास संपुष्टात येईल. अगोदर उद्योगांमध्ये कामाच्या चरित्राच्या आधारावर वेगवेगळ्या उद्योगांचे किमान वेतन ठरत असे पण आता सर्व उद्योगांमध्ये एकसारख्या टाईम-रेट आणि पीस-रेट च्या आधारावर किमान वेतन ठरवले जाईल. कामगारांचा एका उद्योगाच्या आधारावर संघटीत होऊना मागण्या करण्याचा अधिकार सुद्धा हिसकावून घेतला जाईल. अगोदर किमान वेतन राष्ट्रीय स्तरावर ठरत होते पण आता नवीन नियमांनुसार किमान वेतन ठरवण्याचा अधिकार राज्य सरकारांना दिला जाईल ज्यामुळे सर्व राज्यांमध्ये जास्त गुंतवणूक आकर्षित करण्याची स्पर्धा लागेल आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेमुळे राज्य सरकारांद्वारे कामगारांचे किमान वेतन अजून कमी केले जाईल. किमान वेतनाला दुरुस्त करण्याचा ठरलेला काळ 5 वर्षे होता, पण या नवीन नियमांमध्ये हा काळ हटवला आहे आणि जाणूनबुजून यामध्ये अस्पष्टता ठेवली आहे. यासोबतच महिलांसाठी किमान वेतन ठरवण्याच्या प्रक्रियेमध्ये पुरुषांच्या बरोबरीने वेतन मिळण्यासाठी कोणताही निश्चित नियम बनवलेला नाही.

याच प्रकारे उद्योगां संदर्भातील संहितेद्वारे कामगारांना युनियन बनवणे आणि तिच्या माध्यमातून सामुहिक मोलभाव करण्याचे जे स्वातंत्र्य अगोदर होते, त्यामध्ये सुद्धा अडथळे निर्माण केले गेले आहेत. जसे, ट्रेड युनियन च्या रजिस्ट्रेशन प्रक्रियेत नवीन अडथळा आणला आहे ज्यामुळे युनियन बनवणेच अजून कठीण होईल, युनियनची मान्यता रद्द करण्यासाठी नवीन शर्ती दिल्या गेल्या आहेत ज्यामुळे भांडवलदार अनेक कारणांनी युनियनची मान्यता रद्द करू शकतात, कामगारांच्या खाजगी माहितीची पर्वा न करता सर्व माहिती रजिस्ट्रारला देणे आवश्यक बनवले आहे ज्यामुळे कामगारांमध्ये वैयक्तिक स्तरावर सुद्धा एक भय कायम राहिल, युनियनवर लावले जाणारे दंड सुद्धा वाढवले आहेत जेणेकरून युनियन वाढू नये आणि दुसरीकडे फॅक्टरी मालकांसाठी दंड अत्यंत कमी ठेवला गेला आहे, नवीन नियमांनुसार 300 कामगारांपर्यंतच्या कारखान्यांमध्ये मालक आपल्या मनमर्जीने कामगारांना ठेवण्याचे आणि काढण्याचे निर्णय घेऊ शकतात आणि यासाठी सरकारकडून त्यांना कोणतीही परवानगी घ्यावी लागणार नाही. या सर्व बदलांचा अर्थ हाच आहे की कामगारांची युनियन बनवण्याची क्षमता जवळपास अशक्य करून टाकली आहे.

तिसरी संहिता आहे 'सामाजिक सुरक्षा संहिता' जिच्या माध्यमातून सरकार सामाजिक सुरक्षेच्या योजना, जसे ईपीएफ आणि ईएसआय, मिळून एक मोठी सुरक्षा योजना बनवू पहात आहे. खरेतर हे काम यासाठी केले जात आहे की कामगारांचा एका जागी एकत्र केलेला सगळा पैसा सट्टाबाजारामध्ये गुंतवता यावा. कामगारांचे आरोग्य आणि कामाच्या जागे संदर्भात लागू होणारी चौथी संहिता सुद्धा कारखाना मालकांवर कामगारांच्या जीवाशी खेळण्याबद्दल कोणताही कठोर दंड लागू करत नाही जेव्हाकी सत्य हे आहे की कारखान्यातील दुर्घटना आणि त्यामध्ये अपंग होणाऱ्या आणि जीव गमावणाऱ्या कामगारांची संख्या सतत वाढत आहे. एकंदरीत पाहिले तर या चार श्रम संहितांच्या माध्यमातून सुधारांच्या नावाने कामगारांचे किमान वेतन अजून कमी केले जात आहे, कामगारांना इच्छेनुसार नोकरीवर ठेवणे आणि काढण्याचे पूर्ण स्वातंत्र्य भांडवलदारांना दिले जात आहे आणि मुलभूत ट्रेड युनियन अधिकार सुद्धा काढून घेतले जात आहेत.

मोदी सरकारच्या पहिल्या कार्यकाळात सुद्धा अनेक कामगार विरोधी पाऊलं उचलली गेली होती. उदाहरणार्थ, कारखाना अधिनियमामध्ये बदल करण्यात आला होता. या बदलानुसार छोटे कारखाने जिथे कारखाना अधिनियम लागूच होत नाही, तिथे कामगारांची ठरलेली संख्या 10 वरून वाढवून 40 करण्यात आली. या बदलामुळे 70 टक्के नोंदणीकृत कारखान्यांवर कारखाना अधिनियम लागूच होत नाही. कारखाना मालक प्रयत्न करतात की छोट्या-छोट्या युनिट्सची स्वतंत्र नोंदणी करवून कामगारांची संख्या 40 पेक्षा कमी ठेवावी जेणेकरून ते कारखाना अधिनियमाच्या बाहेरच राहतील आणि धडाक्याने शोषण करता येईल. 2015 मध्येच एका दुरुस्तीनुसार कारखाना मालक महिलांना रात्री काम करायला नियुक्त करू शकतो. 2016 मधील एका दुरुस्ती नुसार एका तिमाही मध्ये ओव्हरटाईमचा वेळ वाढवून 50 तासांवरून 100 तास करण्यात आला होता आणि त्यामध्ये सुद्धा जास्त कामाचा बोजा असलेल्यांसाठी ही मर्यादा 115 तास आणि तथाकथित सार्वजनिक हितांच्या कामांसाठी 125 तास करण्यात आली. याशिवाय कायम नियुक्तीच्या जागी ठरलेल्या कालावधीचे काम देणे आणि अॅप्रेंटीस कायद्यामध्ये बदल केले जाण्याची योजना आहे, जिचे उद्दिष्ट कंपन्यांना कमी वेतनामध्ये जास्त काम करवून घेण्याची सूट देणे आहे.

मोदी सरकारने कर्मचाऱ्यांच्या भविष्य निधीमध्ये महिला कर्मचाऱ्यांच्या योगदानाला 12 टक्क्यांवरून कमी करून 8 टक्के केले आहे. यामागे हा तर्क दिला गेला की यामुळे महिला कर्मचाऱ्यांच्या हातात जास्त पगार येईल. परंतु दूरगामी रुपाने पाहिले तर हे महिला कर्मचाऱ्यांच्या विरोधात जाईल कारण म्हातारपणी त्यांचे पुरुषांवर अवलंबित्व वाढेल. इतकेच नाही तर, मसुदा विधेयकामध्ये महिला कर्मचाऱ्यांची प्रसुती रजा आणि स्तनपान रजेसारख्या सुविधांना सुद्धा सक्तीचे बनवलेले नाही, ज्यामुळे उत्पादनाच्या क्षेत्रातील महिलांची भागिदारी मागे जाईल.

केंद्र सरकार शिवाय राज्य सरकारांमध्ये सुद्धा भाजपचे सरकार असणाऱ्या अनेक सरकारांनी गेल्या काही वर्षांमध्ये श्रम कायद्यांमध्ये भांडवलदारांच्या बाजूने लवचिक भुमिका घेतल्या आहेत. उदाहरणार्थ 2014 मध्ये राजस्थानच्या वसुंधरा राजे सरकारने चार श्रम कायद्यांमध्ये महत्वपूर्ण बदल केले ज्यामुळे कंपन्यांना 300 कर्मचाऱ्यांना सरकारच्या परवानगी शिवाय काढून टाकण्याचे अधिकार देण्यात आले, अगोदर ही मर्यादा 100 होती. याशिवाय प्रमुख नियुक्तीकर्त्याला विना लायसंस 49 पर्यंत मजुरांना ठेकेदारी पद्धतीने कामावर ठेवण्याचा अधिकार देण्यात आला. याचप्रकारे गुजरात आणि मध्यप्रदेश मधील भाजप सरकारांनी आपापल्या राज्यांमध्ये श्रम कायद्यांमध्ये मोठे फेरबदल केले होते.

श्रम कायद्यांना हळूहळू कमजोर बनवण्याचे काम तर काँग्रेस सुद्धा, उदारीकरणाच्या धोरणांना लागू करण्यासोबत, करत आली होती, पण आजच्या नवउदारवादी भांडवलशाहीचं आयुष्य वाढवण्यासाठी कामगारांचं रक्त शोषण्याची अजून सूट देणे गरजेचे आहे, आणि हेच काम भाजप सरकार आपल्या दुसऱ्या कार्यकाळात अजून वेगाने करेल.

**अनुवाद - अभिजित**

---

# नफेखोर व्यवस्थेचे अजून किती बळी?

**पान 1 वरून**

पर्वा केली जात नाही. त्यामुळे आज कामगारांच्या जिवाची किंमत कवडीमोल झाली आहे आणि नफ्यासाठी चालणाऱ्या या भांडवली समाजाला काडीमात्र फरक पडत नाही. भारतातील दलाल धंदेबाज वृत्तवाहिन्या आणि काही वृत्तपत्र यांनी कोंढव्यातील घटनेला पावसाचा प्रकोप म्हणून देखील जाहीर केले आहे. पण हा पावसाचा प्रकोप नसून, बिल्डरांच्या नफ्यासाठी बळी गेलेले हे कामगार अपघाताचे बळी नाहीत, तर नफेखोर, भांडवली व्यवस्थेने केलेले खून आहेत.

भारतामध्ये बांधकाम उद्योग हा शेतीनंतर 'रोजगार' देणारा सर्वात मोठा उद्योग आहे. कामगारांच्या रक्ता-घामातून प्रचंड मोठ्या प्रमाणात बिल्डींग्स बांधल्या जात आहेत. परिणामी 2013 मध्ये जवळपास 54,000 कोटींच्या बिल्डींग्स बांधल्या गेल्या होत्या, तर 2018 मध्ये हा आकडा 98,000 कोटींवर गेला आहे. देशभरामध्ये सर्वत्र असुरक्षित कामाच्या स्थितीमुळे शेकडो कामगार कधी उंचावरून पडून, तर कधी वीजेच्या झटक्याने, तर कधी मलब्याखाली दबून मारले जातात. यापैकी बहुसंख्य अपघात दाबून टाकले जातात आणि मीडीया त्यांच्या बातम्याही देत नाही. बेपर्वाईची हद्द तर इतकी आहे की ना या कामगारांची कुठे कामगार म्हणून नोंद असते, ना अपघातांची ना मृत्यूंची. संसदेच्या 'मंदिरामध्ये', लोकसभेमध्ये, सादर केलेल्या आकडेवारीनुसार देशभरात 2012 ते 2015 मध्ये फक्त 77 कामगारांचे मृत्यू झाले. हा आकडा तर कीव करावी असाच आहे, कारण फक्त वर्तमानपत्रांच्या बातम्या जरी एकत्र केल्या तरी मोठा आकडा मिळेल.

पुण्यामध्ये कोंढव्यात अपघात झाल्यावर लगेचच मंत्री-संत्री, विरोधी पक्षाचे नेते, इत्यादी धावत आले. सरकारने या कामगारांना मेलेल्या कामगारांच्या जीवाची किंमत नातेवाईकांना चार लाख रुपयाची देण्याचे कबूल केले व कामगारांच्या जिवाशी खेळणाऱ्या या बांधकाम बिल्डरांना अटक करण्यात आली आहे. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी या कामगारांची नोंदणी का नव्हती वगैरे घोषा लावला. आपण या सगळ्यांचे हे मगरीचे अश्रू ओळखले पाहिजेत. गेली अनेक वर्षे महाराष्ट्रामध्ये कॉंग्रेस-राष्ट्रवादी-शिवसेना-भाजपची सरकार आहेत. यांच्यापैकी कोणीही अजूनही कामगारांची साधी नोंदणी सुद्धा केलेली नाही. जी कारवाई झाली आहे ती फक्त आत्ता निवडणूका समोर आहेत म्हणून झाली आहे हे स्पष्ट आहे. वास्तवामध्ये हे सर्व पक्ष आजपर्यंत मोठ्या प्रमाणात बिल्डर लॉबीच्या पैशावरच पोसलेले पक्ष आहेत. विधानसभेमध्ये आणि बाहेर कितीतरी वेळा या सर्वांनी, एकमेकांवर बिल्डरांना हजारो कोटींचा फायदा पोहोचवल्याचे आरोप लावले आहेत. अनेकदा ते विसरतात की त्यांच्या हमाममध्ये सगळेच नंगे आहेत. महाराष्ट्रामध्ये बांधकाम कामगारांच्या कामाच्या जागी सुरक्षिततेच्या तरतुदी मांडणारा 1996 सालचा कायदा आणि त्यानुसार बनवलेले 2007 सालचे नियम पूर्णपणे कागदावरच आहेत. यातूनच आपण समजले पाहिजे की सर्व भांडवली पक्ष आणि बिल्डर यांचे किती संगनमत आहे! राजकारणी-बिल्डर लॉबी आणि भांडवलदारांच्या एकजुटीच्या विरोधात, सुरक्षिततेच्या सोयीसाठी आज सर्व कामगारांनी एकत्र येऊन लढलेच पाहिजे.

# बीडमध्ये उसतोडणी महिला कामगारांच्या गर्भाशयाचे सक्तीने ऑपरेशन!

✍ तृप्ती

ऊसतोड कामगारांच्या मजबुरीचा फायदा घेऊन व्यवस्था गब्बर! ऊसतोडीचा फायदा साखर कारखानदारांना! गर्भपिशवी ऑपरेशनचा फायदा खाजगी डॉक्टरांना !! कामगारांच्या शोषणावर उभी अर्थव्यवस्था !!!

दिनांक ९ एप्रिल २०१९ रोजी हिंदू दैनिकाच्या' बिझनेस लाईन' या डिजिटल वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या लेखात बीड जिल्ह्यात ऊसतोड कामगार महिलांमधील वाढत्या गर्भाशय शस्त्रक्रियांसंदर्भात आलेल्या बातमीने खळबळ उडवली. त्यानंतर महाराष्ट्राच्या आरोग्य खात्याला जाग आली. त्यांनी जिल्हा शल्यचिकित्सका सोबत स्थानिक खाजगी डॉक्टरांची एक समिती बनवली आणि इथून पुढे होणाऱ्या प्रत्येक गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियेसाठी पूर्वपरवानगी आवश्यक असल्याच्या सूचना सर्व खाजगी डॉक्टरांना दिल्या. यातून आता उलटी परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की बीड मधील कोणत्याही महिलेला अशी शस्त्रक्रिया करायची असेल तर पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खाजगी डॉक्टर म्हणतात की आता आम्ही ऑपरेशन करणार नाही, तुम्ही सोलापूर किंवा उस्मानाबादला जा, नाहीतर जास्त पैसे द्या.

उसतोड कामगार महिलांची परिस्थिती आणि त्यांना अशा प्रकारचा निर्णय का घ्यावा लागतो याबद्दल जाणणे आवश्यक आहे. बीड हा दुष्काळी जिल्हा, पाऊस पडला तर शेती, नाहीतर शेतात टाकलेलं बीजही वाया जात अशी परिस्थिती. कारण जमिनी खालचं पाणी काढून काढून संपवलेलं. त्यामुळे बोअर मारा, विहीर खोदा, २५० फुट खाली जाऊनही पाणी हाती येत नाही या निष्कर्षाप्रत आलेली ही माणसं. तसेही ग्रामीण भागात रोजगाराचा प्रश्न खूप मोठा आहे, पूर्वी निदान शेतीत सर्व कुटुंबांचा उदरनिर्वाह तरी भागायचा पण आता महागाईने तेही शक्य होत नाही. त्यामुळे १९७२ च्या दुष्काळापासूनच या भागातील माणसाचं उसतोडीसाठी स्थलांतर सुरु झालं. पश्चिम महाराष्ट्रात ऊस हे मुख्य पीक. ऊस गाळणीसाठी साखर कारखाने साधारण ऑक्टोबर ते मे कालावधीत सुरु असतात. त्यामुळे ऊस तोड करायला याच काळात मुख्य करून स्थलांतर केलं जातं. साखर कारखान्यांची यंत्रणा असते त्यात शेतातला ऊस कारखान्याच्या आवारात पोचवण्याचे काम हे मुख्य करून मुकादम, बैलगाडी/ट्रक/ ट्रॅक्टर मालकांचे असते. या प्रत्येकाची आपली एक टोळी असते, त्या टोळीत ऊस तोड करणारी किमान ८ ते १० कोयते असतात—एक स्त्री आणि एक पुरुष असे मिळून एक कोयता असे एकूण २० लोक एका टोळीत काम करतात. साधारण ८ महिन्यासाठी एका कोयत्याला उसतोड करण्यासाठी एक ते दीड लाख रुपये मिळतात. त्यामुळे आपली टोळी पक्की करण्यासाठी मुकादम साखर कारखान्याकडून ५ ते ६ लाखांची उचल घेतो, त्यातील साधारण ५० हजार रुपये प्रत्येक कोयत्याच्या पुरुषाला देतो आणि त्यांना कामाला येण्यासाठी पक्के करतो. हे पैसे पुरूषच ठेवतात आणि महिलांपर्यंत पोचत नाहीत. उसतोडीचे काम हे भयंकर कष्टाचे आणि त्रासदायक काम आहे. त्यामुळे बरेचदा असाही अनुभव येतो की उसतोडीसाठी जायला घरातील त्या पुरुषाची पत्नी तयार होत नाही. त्यामुळे कुटुंबातील पुरुष दुसरे लग्न करून त्या लहान मुलीला आपल्यासोबत उसतोडीला घेऊन जातो; त्यामुळे या भागात पुरुषांची दोन लग्न ही सामान्य बाब आहे आणि मुलींच्या लग्नाचे सरासरी प्रमाण हे १४ वर्ष आहे!

एकदा कामाला सुरुवात झाली की सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत उसतोडीचे काम सुरु राहते. जर ऊस कारखान्यावर रात्रीत पोचवायचा असेल तर रात्रभरही उसतोड सुरु राहते. फक्त उसतोड करून हे कामगार थांबत नाहीत तर त्यांना उसाची मोळी करून तो गाडीत भरावा लागतो. गाडी भरण्याचे काम पुरुष करतो तर महिला उसाच्या मोळ्या उचलण्याचे काम करतात. ही एक मोळी साधारण ५० किलोची असते. त्यामुळे महिलांना ऊस तोडणे, मोळी करून ती गाडीत नेऊन टाकणे हे काम करावे लागते. शिवाय ही मंडळी त्याच शेतात पालांवर राहत असतात. त्यामुळे महिलांना इतर कामे उदा. जेवण बनवणे, सरपण गोळा करणे, भांडी-कपडे इ. कामे उसतोडीच्या आधी किंवा नंतर करावी लागतात. याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होताना दिसतो. या प्रत्येक कामगाराला एका दिवसात किमान १ टन (एक हजार किलो) ऊस तोडून द्यावा लागतो, कधी कधी मुकादमाने घाई केली तर जास्तही कापावा लागतो. या कामाच्या प्रक्रियेतच अपघात होण्याचे प्रमाण खूप आहे. उदा. हात-पाय कापणे, गाडी भरताना पडणे, ज्या शेतात राहतात तिथे साप, विंचू चावणे, इत्यादी. महिलांच्या बाबतीत इतरही अनेक मुद्दे आहेत. या कामासाठी येणाऱ्या महिला १४ वर्षाच्या वयापासून या कामाला सुरुवात करतात. लवकर लग्न, लवकर मुले होणे ही बाब खूप नित्याची असते. या टोळीवरची एखादी स्त्री गरोदर असेल तरी तिला बाळंत होईपर्यंत काम करावे लागते. तिचे बाळंतपण त्याच शेतात केले जाते, दवाखाना फार लांबची गोष्ट असते. बाळंतपणानंतर फक्त १२ दिवस तिला आराम मिळतो. पुन्हा कामाला जुंपून घ्यावे लागते. या काळात तिने न केलेल्या कामाची तिला भरपाई द्यावी लागते. त्यामुळे गरोदर असताना सतत वाकून उस तोडणे, गाडी भरणे यामुळे अनेकदा महिलांचे गर्भपात होतात. शिवाय गर्भाशयावर ताण येऊन गर्भ पिशवी खाली येणे, कंबर दुखणे असे आजार त्यांना जडतात. या महिलांना कधी कधी मुकादम किंवा त्यांच्या टोळीतील पुरुषांकडूनही लैंगिक छळाला तोंड द्यावे लागते.

कोणत्याही उसतोड कामगार महिलेचा आयुष्याचा इतिहास बघितला तर १४ ते १५ व्या वर्षी लग्न, २० वर्षाच्या आत २ ते ३ मुले आणि लगेच नसबंदीचे ऑपरेशन, त्यानंतर साधारणपणे २५ ते ३० वर्षात गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया या क्रमाने घटना त्यांच्या आयुष्यात घडलेल्या दिसतात. कामाच्या ताणाने आणि लवकर मुले होणे यामुळे गर्भाशय आधीच खाली आलेले असते, काहीवेळा जंतू संसर्ग होऊन अंगावरून पांढरे किंवा लाल पाणी जाणे अशा समस्या या कामगार महिलांना भेडसावत असतात. याचा फायदा खाजगी वैद्यकीय सेवेकडून घेतला जातो. अशा तक्रारी घेऊन जेव्हा रुग्ण डॉक्टरांकडे येतात तेव्हा सहज गर्भाशय काढण्याचा सल्ला त्यांना दिला जातो. आपल्या परंपरेमध्ये स्त्रीला येणारी मासिक पाळी ही विटाळाची बाब असे सातत्याने स्त्रियांच्या मनावर बिंबवल्यामुळे या महिलाही गर्भाशय पिशवी काढण्याच्या पर्यायाला होकार देताना आढळतात. डॉक्टर या शस्त्रक्रियेनंतर महिलांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबद्दल फारसे सांगत नसल्याने महिलांना असे वाटते की पाळीच्या त्रासातून त्यांची मुक्तता होईल. त्यामुळे स्थानिक मुकादम अशा शस्त्रक्रिया करण्यासाठी या कामगारांना ॲडव्हांस पैसे देताना दिसून येतात. यात त्यांचा स्वार्थ असा की एकदा ॲडव्हांस पैसे घेतले की ते कोयते त्यावर्षासाठी पक्के होते. शिवाय अशा स्त्रियांचा मुकादम आणि त्याचे इतर सहकारी यांना सहज "फायदा" घेता येऊ शकतो. अशाप्रकारे गरिब महिला कामगारांच्या गरिबीतून आणि बेरोजगारीतून निर्माण झालेल्या अगतिकतेचा फायदा घेत, डॉक्टर ऑपरेशन करून पैसे कमावत आहेत, ठेकेदार राबवून घेत आहेत आणि लैंगिक शोषण करत आहेत, आणि साखर कारखाने महिला कामगाराच्या 'वाढलेल्या'(!) उत्पादकतेचा फायदा घेऊन नफा कमावत आहेत.

उसतोड कामगार महिलांना होणाऱ्या त्रासापैकी मासिक पाळीबाबत सांगायचे झाले तर मासिक पाळीच्या काळात स्वच्छता करण्याचीही सोय नसल्याने पाळीच्या वेळी पहाटे घेतलेला कपडा रात्रीच बदलता येतो. यातून गर्भाशयाला होणारा जंतू संसर्ग शिवाय दिवसभर कपडा बदलायची सोय नसल्याने काम करताना कपड्याने दोन मांड्यांच्या भागात घासून घासून तिथेही जखमा होतात, कोणत्याही परिस्थितीत त्यांना काम थांबवता येत नसल्याने जंतूसंसर्ग, सततची आजारपणे यांना तोंड द्यावे लागते. शिवाय सतत वाकून काम करणे, जड उचलणे यामुळे गर्भाशयाचे स्नायू सैल होऊन गर्भाशय खाली येण्यासारखे आजार या महिलांना होतात. त्यावर काही तातडीने औषधोपचार आणि व्यायाम आहेत पण आरोग्य यंत्रणेपर्यंत पोचण्याची उसंत या महिलांकडे नसल्याने त्या दवाखान्यात जाऊ शकत नाहीत. आणि सरकारी आरोग्य यंत्रणेचा भर गरोदरपण–बाळंतपण, कुटुंब नियोजन एवढ्याच गोष्टींवर असल्याने एकदा बाईचे मुल बंद होण्याचे ऑपरेशन झाले की आरोग्य यंत्रणेची जबाबदारी संपली असे यंत्रणेला वाटते. मग अशा आजारांना सरकारी आरोग्य व्यवस्था प्राधान्य देत नाही त्यामुळे यावरचे उपचार तर लांबच राहिले.

त्यात आपल्या सरकारी आरोग्य सेवेची परिस्थिती अतिशय बिकट आहे. आपल्या देशात किमान १ लाख लोकसंख्येला १ स्त्रीरोग तज्ञ असला पाहिजे असे ग्रामीण आरोग्य सांख्यिकी(Rural health statistics) चा अहवाल सांगतो. मुळात १ लाख लोकसंख्येला एक तज्ञ डॉक्टर हा दर खूपच अपुरा आहे. ग्रामीण आरोग्य सांख्यिकीचा २०१५ चा अहवाल म्हणतो की महाराष्ट्रातील ३६० ग्रामीण रुग्णालयामध्ये किमान एक स्त्रीरोग तज्ञ असला पाहिजे. पण प्रत्यक्षात महाराष्ट्रासाठी केवळ २१७ पदे भरलेली आहेत, म्हणजे १४३ पदे रिक्त आहेत. स्त्रीरोग तज्ञांचे प्रमाण किती कमी आहे यासाठी जर प्रगत देशाशी तुलना केली तर अमेरिकेत एक लाख लोकसंख्येला २.६५ स्त्रीरोगतज्ञ, युरोपात ३.५ स्त्रीरोगतज्ञ आणि कॅनडामध्ये दीड लाख लोकसंख्येला ४ स्त्रीरोगतज्ञ आहेत. फक्त महाराष्ट्राच्या लोकसंख्येचा विचार केला तरी जवळपास ६ कोटी जनता ग्रामीण भागात राहते, या ६ कोटी जनतेसाठी, तोकड्या मानकांनुसारही ६०० स्त्रीरोगतज्ञ असायला हवेत, पण सध्या प्रत्यक्षात रुग्णालयेच ३६० आहेत त्यामुळे तेवढेच डॉक्टर उपलब्ध असावेत अशी सरकारची तोटक भूमिका. त्यामुळे इतक्या कमी संख्येने असलेले ग्रामीण भागातील हे डॉक्टर किती बायकांच्या वाट्याला येणार? आरोग्यसेवांचे धंदेवाईकीकरण झालेले असल्यामुळे बऱ्याच सरकारी स्त्रीरोगतज्ञांची स्वत:ची खाजगी प्रक्टिस असते, आणि हे तज्ञ डॉक्टर ग्रामीण भागात सेवा देण्यासाठी जायलाच तयार नसतात. त्यामुळे वर्षानुवर्ष या रुग्णालयांमध्ये ही पदे रिक्त आढळतात.

उसतोड कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा बोर्ड स्थापन करण्याचे आश्वासन राज्य सरकारने २००८ मध्ये दिले होते. पण घोषणा करण्याच्या पलीकडे काहीही झालेले नाही. मुकादमांच्या संघटना दर तीन वर्षांनी साखर कारखान्यांबरोबर वाटाघाटी करून आपले पैसे वाढवून घेतात, पण या कामगारांना मात्र त्याचा फारसा उपयोग होत नाही. स्थलांतरित कामगार असल्यामुळे यांच्या स्वतंत्र संघटना नाहीत. मुकादम आणि त्यांची टोळी मिळून काही संघटना आहेत, त्यात काही कामगार वर्गाच्या नावाने, कामगार वर्गाविरोधात काम करणाऱ्या दुरुस्तीवादी डाव्या पक्षाच्या संघटना आहेत. जेव्हा हा सर्व प्रश्न उपस्थित झाला तेव्हा डाव्या संघटनांनी मुकादमांची पाठराखण केली. कधी कधी कामगारच कसे मुकादमांचे पैसे बुडवून पळून जातात आणि मुकादम रस्त्यावर येतो ही मांडणी संघटनानी केली. सगळेच मुकादम आणि डॉक्टर वाईट नसतात असे त्यांनी म्हटले. पण इतके वर्ष सुरु असलेली ही शोषणाची व्यवस्था बदलण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. कमीत कमी प्रस्थापित भांडवली कायदे म्हणजे, कामगारांना समान वेतन कायदा, लैंगिक हिंसाचार विरोधी कायदा, सामजिक सुरक्षा कायदा लागू झाला पाहिजे, हे सर्व करण्यासाठी बोर्ड पाहिजे अशा मागण्या लावून धरण्यात त्यांना रस नाही. कारण शेवटी या तथाकथित डाव्या संघटनाही साखर कारखानदारांच्या गुलाम आहेत.

एकूणच पितृसत्ताक व्यवस्थेत स्त्रीचे स्थान दुय्यम, त्यावर साखर कारखान्याच्यांच्या धंद्याच्या स्पर्धेमध्ये आणि भांडवली शेतीमध्ये कामगाराचे स्थान सर्वात खालच्या पातळीवर, त्यामुळे त्याचे कितीही शोषण होऊ शकते, आणि या सगळ्यात कहर म्हणजे देशात खाजगी डॉक्टरांवर कोणताही कायदेशीर धरबंध नाही त्यामुळे मिळाला बकरा की काप त्याला हीच प्रक्टिस. अशाप्रकारे ऊसतोडणी महिला कामगार या तिन्ही व्यवस्थांची बळी होत आहे. अनावश्यक गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रिया झाल्याची बातमी हे या व्यवस्थेचे दृश्य रूप आहे, पण मूळ प्रश्न या तीनही व्यवस्थांमधील सत्ता संबंध आणि आर्थिक राजकारणाचा आहे. या तिन्ही व्यवस्था स्वत:च्या फायद्यासाठी स्त्रीचा वापर करून घेतात, आपला धंदा वाढवण्यासाठी एकमेकांना मदत करतात, आणि स्त्रीला असे भासवतात या सगळ्यात तिचे हित कसे आहे. भांडवली शेती, नफेखोर आरोग्य व्यवस्था आणि पितृसत्ता या तिघांविरोधात आज कष्टकरी वर्गाने एकजूट होऊन शेतीचे राष्ट्रीयकरण, पूर्णत: मोफत-समान-दर्जेदार आरोग्यव्यवस्था आणि स्त्री-पुरुष समानता यासाठी झुंझार आंदोलन उभे केले पाहिजे. स्त्री-पुरुष समानता, महिला मुक्ती हा क्रांतिकारी कामगार आंदोलनाचा अविभाज्य भाग बनला पाहिजे.

**बिगुल व्हॉट्सॲप चॅनेल**

जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सॲप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सॲप चॅनेल जॉईन करावा - http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp

चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704 (पर्यायी नंबर 9619039793)

# असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या पेंशन योजनेची सत्यपरिस्थिती

✍ **शाम मूर्ती**

भाजपच्या नरेंद्र मोदी सरकारने 2019-20 च्या लोकसभा निवडणुकीच्या आधी प्रस्तुत केलेल्या सहाव्या अंतरिम बजेटमध्ये असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी नवीन पेंशन योजना आणत असल्याची घोषणा केली आहे. तेव्हाचे केंद्रीय अर्थमंत्री पियुष गोयल यांनी असे म्हटले की देशातील 45 करोड कष्टकरी जनता, जी वृद्धापकाळात आपल्या उपजीविकेची सोय करू शकत नाही, अशा लोकांसाठी "गॅरंटिड" पेंशन योजना—"प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन पेंशन योजना (पी.एम.एस.वाई.एम.)", कष्टकरी जनतेचे स्वप्न साकार करू शकणारी योजना, 15 फेब्रुवारी पासून सुरु करण्यात आली आहे. याच सोबत असेही सांगण्यात आले आहे की "आयुष्यमान भारत" योजने अंतर्गत येणारी आरोग्य सेवा आणि "प्रधानमंत्री जीवनज्योती योजने" अंतर्गत देण्यात येणाऱ्या जीवन आणि विकलांगते संबधी विमा योजने व्यतिरिक्त पी.एम.एस.वाई.एम. ही योजना असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी आहे आणि यामध्ये 500 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पुढील पाच वर्षात ही जगातील सर्वात मोठी पेंशन योजना बनवण्याचा दावा सरकारने केला आहे.

चला सुरुवातीला हे जाणून घेऊयात की असंघटीत क्षेत्रात काम करणारे कामगार कोण आहेत आणि त्यांची सध्याची स्थिती काय आहे? यात घर कामगार, ड्रायव्हर, प्लंबर, ठेलेवाले, रिक्षा चालक शेती व सलग्न व्यवसायात जोडले गेलेले मजूर, कचरा वेचक कामगार, शेत मजूर, विडी कामगार, गवंडी, घरात राहून काम करणारे, हातमाग चालवणारे कामगार, चामडे तयार करणारे कामगार, मिड-डे मिल कामगार, हमाल, वीटभट्टी कामगार, चांभार, धोबी, ग्रामीण भूमिहीन, दारोदारी जाऊन विक्री करणारे, डोक्यावर ओझे घेऊन चालणारे, चिरफाड करणारे, वायरमन, न्हावी, तसेच कंपनी मधे काम करणारे असे कामगार ज्यांना आतापर्यंत पेंशन मिळत नव्हती, हे सगळे सामील होतात. भारतात जीवतोड मेहनत करणारे हे कष्टकरी कसे काय वय 65 वर्षापर्यंत पोहोचणार? असुरक्षित वातावरणात काम करणारी, कमी अन्नावर गुजराण करणारी ही कुपोषित जनता 65 वर्षे वयापर्यंत खरंच पोहोचते काय? आजकाल तर 70 ते 90 वर्षापर्यंत पोचणारे लोक जास्त करून खात्यापित्या सुख सुविधा उपभोगणाऱ्या भांडवली वर्गातील व उच्च मध्यम वर्गातील असतात, ज्यांच्याकडे खासगी आरोग्य सेवा खरेदी करण्याची ऐपत असते.

सध्याची नफेखोर आणि बाजारामार्फत संचालित भांडवली व्यवस्था आणि भांडवली सरकारे, मग ती राज्यात असो की केंद्रात, आपल्या देशातील 5 टक्क्यांपेक्षा कमी लोकसंख्येकडे असलेली पेंशन सुविधा संपवत आहेत—अशी ही व्यवस्था 95 टक्क्यांपेक्षा अधिक असुरक्षित कामगार जनतेला कशी काय सामाजिक सुरक्षा देऊ शकेल? सरकारी कर्मचारी देशातील जुन्या पेंशन योजना वाचवण्यासाठी आंदोलन करत आहेत. देशातील रुपयाची किंमत सातत्याने कमी होण्याची प्रवृत्ती गेल्या 70 वर्षात दिसून येत आहे. नियमित हप्ते भरून 50 ते 45 वर्षात रुपयाची किंमत किती राहील? आज रुपयाची किंमत 7 पैशांपेक्षाही कमी झाली आहे, आणि सातत्याने कमी होत आहे. तसेच वाढत्या महागाईमध्ये 3,000 रुपयामध्ये एखाद्या कामगाराला किती सेवा आणि सुविधा मिळणार? आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीं कितीही उतरल्या तरी पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीमुळे चीजवस्तूंच्या किमती सतत वाढत असतात. जिथे व्यक्तीच्या मजुरीपेक्षा महागाई वाढत जाते तिथे मजूर किती हप्ते भरणार? अशी खाती बंद होणार आणि खात्यावर असलेले पैसे सरकारच्या घशात जाणार. जसे कामगारांच्या पी.एफ.चा एक हिस्सा कायम ढापला जातो. सरकारला माहित असते की लोक पाठपुरावा करून थकून गप्प बसतील, ते मागायला येणार नाहीत. जसे कितीतरी मालक आणि ठेकेदार मजुरांची मजुरी गिळंकृत करतात आणि दिवसाचे काम जाईल या भीतीने मजूर आपली मजुरी मागायला येत नाहीत. त्यांना आपल्या आयुष्याच्या अनुभवावरून हे माहित असते की फेऱ्या मारून उलट नुकसानच होईल, त्यामुळे ते ही संयमाचा कडू घोट पिऊन जगत राहतात. आणि आता तर बँक खात्यात किमान रक्कम नसेल तर त्यांचे पैसे कापले जातील असा नियम असल्याने कायदेशीर कार्यवाही सुद्धा होऊ शकत नाही.

सरकारी आणि खाजगी क्षेत्रातील भांडवलदारांच्या पैशावर जगणाऱ्या अर्थतज्ञांचे मत आहे की नवीन आणि स्वस्त पेंशन योजना जर चांगल्या तऱ्हेने अमलात आणली तर यशस्वी होऊ शकते. मग आधी या तज्ञांच्या डोळ्यात डोळे घालून हे विचारावे लागेल की नगरसेवक ते आमदार आणि मग खासदार होणाऱ्या व्यक्तीला तीन पेंशन का द्यायच्या? त्यांनी एकच पेंशन घ्यावी. भारतातील जवळपास 50 कोटी श्रमशक्ती, म्हणजे जवळपास 95 टक्के श्रमशक्ती ही असंघटीत आणि अनौपचारिक क्षेत्रात आहे, पण या 50 कोटी जनतेला कोणतीही सामाजिक सुरक्षा नाही.

असंघटीत आणि अनौपचारिक क्षेत्रातील कष्टकऱ्याकडून दर महिन्याला निश्चित रक्कम वसूल करणार आणि 60 वर्षानंतर त्यांना पेंशन मिळेल ती पण रु. 3,000 महिना. ही फॅसिस्ट सरकारने कष्टकऱ्यासोबत केलेली क्रूर चेष्टा नाही तर काय आहे? यासाठी असाही तर्क दिला जातो की असंघटीत क्षेत्रातील कामगारांना रु.15,000 पेक्षा कमी मजुरी दर महिन्याला मिळते त्यामुळे ते कोणत्याही पेंशन योजनेत सामील होऊ शकत नाहीत. हे ते लोक आहेत जे दररोज मजुरी करतात आणि त्यांना पैशाची बचत करायची सवय नसते. असे लोक ज्यांचे महिन्याचे उत्पन्न 15,000 किंवा त्यापेक्षा अधिक असते ते कर्मचारी भविष्य निधी (ई.पी.एफ.) योजनेत बसतात, म्हणून पी.एम.एम.वाय.एस. या योजने अंतर्गत त्या लोकांना सामाजिक सुरक्षा मिळेल जे ई.पी.एफ. योजनेत बसत नाहीत.

सरकार स्वत:चं हे वास्तव स्वीकारत आहे की आपल्या देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात 50 टक्के योगदान देणारी जनता अत्यंत कष्टात आणि खूप हलाखीत जगत आहे. अशा कष्टकरी-कामगारांना किमान वेतनही मिळत नाही आणि आरोग्य-विमा व पेंशन यासारख्या सामाजिक सुरक्षा तर फार लांबची गोष्ट आहे. जिथे कामगारांना दर महिन्याला रु.15,000 मिळत नाहीत तिथे सरकार अशा कामगारांसाठी "सोशल सिक्युरिटी कोड 2018" अंतर्गत देशात काम करणाऱ्या 50 कोटी कामगारांना पीएफ, पेंशन, मेडिकल इन्शुरन्स यासहीत सामाजिक सुरक्षा देण्याबद्दलची ही योजना म्हणजे "बिरबलाची खिचडी" असेल.

त्यामुळे सगळ्यात पहिला प्रश्न हा की कामगाराचा पगार 15,000पेक्षा थोडा जरी वाढला किंवा कमी झाला तर सरकार हे कसे शोधेल की कोणाला कोणत्या पेंशन योजनेत कधी टाकायचे ? याबाबत सरकारकडे कोणतीही स्पष्टता किंवा योजना नाही, कारण असंघटीत आणि अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांना कधीही नियमित स्वरुपात काम मिळत नाही. ज्यांना मिळतो त्यांची स्थिती काय आहे हे सगळ्यांसमोर आहे. मालक/ ठेकेदार/सुपरवायझर कधी हंगामामध्ये कामगाराकडून जबरदस्ती ओव्हरटाईम करून घेतात आणि काम झालं की कामावरून ब्रेक देतात. आठवड्याची रजा, कामाचे तास किती हे स्पष्ट नाही. सुट्टी घेतली तर पगार कपात, किंवा नोकरीच जाऊ शकते अशी परिस्थिती. अशा परिस्थितीत कामगार स्वत: अशा योजनेची जोखीम घेईल का?

दुसरे म्हणजे या योजनेमध्ये 18 ते 40 वर्षापर्यंतचे कामगार सामील होऊ शकतात मग त्यांचे काय ज्यांना 40 वर्षानंतर कामगार कपात किंवा कंपनी बंद झाल्यामुळे कामावरून कमी करण्यात येत आहे? कंपन्यांचे मालक 25 वर्षाच्या कामगारालाही कामावर ठेवायला का-कू करतात. ज्यांना कायमस्वरूपी रोजगार होते असे लोक सध्या बेरोजगार होत आहेत, आणि उरलेले अनेकजण अशाच प्रकारे ठेकेदारी-रोजंदारी-पीसरेट वर असंघटीत क्षेत्राकडे ढकलले जात आहेत. अशा स्थितीत दंड करून किंवा पेंशन देण्याची व्यवस्था करून काय फायदा होणार? आधीच असुरक्षित असलेला आणखी असुरक्षित होत जाणार. वाढती महागाई, वाढणाऱ्या वस्तूंच्या किंमती आणि रुपयाची घसरत जाणारी किंमत, कमी होत जाणारे रोजगार या परिस्थितीत या योजनेसाठी जे लोक हप्ता भरत होते, त्यांना पुढचे वाढलेले हप्ते भरताना अडचण येणारच. पुन्हा योजनेत सहभागी होण्यासाठी विमा कंपन्या, एजन्सी जास्तीचे पैसे मागणार आणि जर योजनेचे पैसे भरणे पुन्हा नाही सुरु केले तर कागदपत्र पूर्ण करून घेण्याच्या नावाखाली पैसे कापून घेणार आणि उरलेली रक्कम हातात ठेवणार. मग कशी होणार कामगारांची सुरक्षा? कमी पैसे घेण्यासाठी तर कामगार ठेकेदार किंवा मालकांकडेही जात नाहीत आणि बँकामधेही आणि पीएफ ऑफिसमध्ये जात नाही, कारण त्यांची रोजंदारी बुडते.

मासिक हप्ता किती असेल हे वयाच्या आधारावर ठरेल आणि हा हप्ता 60 वर्षापर्यंत भरणे आवश्यक असेल. हेच नियम आधीच सुरु असलेल्या अटल पेंशन योजनेचेही होते. मग ही नवीन योजनेची कटकट कशाला? आहे त्याच योजनेला का सुधारले नाही? असंघटीत क्षेत्रासाठी आधीच्या योजनेमध्ये काय अडचण होती यावर काही चर्चा नाही. नुसते नाव बदलून आणि थोडेफार नियम बदलून योजना सुरु केली पण त्यांनी खरंच असंघटीत क्षेत्राच्या कामगारांचं भलं होताना दिसत नाही. अटल योजनेच्या आधी स्वावलंबन योजना होती तिचे नाव बदलून अटल योजना केले, आताही असेच होणार का? आधीच असलेल्या योजनांमधील त्रुटी यावर काही चर्चा, समीक्षा केली आहे की नाही? केली असेल तर ते प्रकाशित का केले नाही? याबद्दल कोणालाही माहिती नाही.

सरकारने असे म्हटले आहे योजनेत सामील होण्यासाठी कामगाराकडे बँक खाते, आधार कार्ड आणि मोबाईल असणे आवश्यक आहे. याचा अर्थ काय? एकाच बाणात अनेक निशाणे साधण्याचा हा जुनाच कावा आहे. असंघटीत क्षेत्रातील किती लोकांकडे फोन आहे आणि फोन कसा चालवायचा हे त्यांना माहित आहे? देशातील किती टक्के जनता खऱ्या अर्थाने साक्षर आहे? यामुळे फोन कंपन्यांचा धंदा जोरात वाढेल, पण आपल्या खिशयातून पैसा मात्र जाणार. जर एका घरात दोन व्यक्ती काम करत असतील तर त्याचा अर्थ प्रत्येकाकडे फोन असेल; यातून खर्च कमी होणार की जास्त हे तुम्हीच ठरवा. बँक खात्याबद्दल बोलायचे झाले तर आधी शून्य बॅलन्सवर खाती उघडली आणि नंतर किमान पैसे खात्यावर नसतील तर बँकेने दंड लावून काढून घेतले असाच अनुभव आहे.

जर कामगार योजनेत सामील झाल्याच्या 10 वर्षातच योजनेतून बाहेर पडू इच्छित असेल तर, 10 वर्षांनंतर, तो 60 वर्ष पूर्ण झाल्यानंतर किंवा होण्यापूर्वी अस्थायी स्वरुपात विकलांग झाला तर, केवळ त्याच्या हिश्याची रक्कम बचत खात्यावरच्या व्याजाच्या दराप्रमाणे दिली जाईल. अशा प्रकारे योजनेतून बाहेर पडणे कामगार तेव्हाच करेल ज्यावेळी त्याला पैशाची खूपच गरज असेल. जर पुन्हा कामगाराला योजनेत सामील व्हायचे असेल तर त्याचा हप्ता वाढेल, आणि तेव्हाच 60 वर्षानंतर त्याला पेंशनची रक्कम मिळेल. जर एखाद्या मोठ्या संकटातून बाहेर पडून तो कामगार आला असेल तर योजनेची वाढलेली रक्कम देणे त्याला कठीणच जाईल. 60 वर्षानंतर म्हणजे पेंशन सुरु झाल्यानंतर जर कामगाराचा मृत्यू झाला तर त्याच्या जोडीदाराला दरमहा 50 टक्के रक्कम म्हणजे रु.1,500 मिळतील. ती व्यक्ती रु. 1,500 मध्ये आपले जीवन कसे जगणार? हा तर चेष्टेचा अतिरेक झाला. तुमचं म्हातारपण सुद्धा बाजारावर अवलंबून आहे. इथे सरकारच व्यापाऱ्याच्या भूमिकेत आहे. पैसे दिले तर ठीक, नाहीतर खड्ड्यात जा. ज्याच्याकडे योजनेत भरायला पैसे नसतील तो कसे आपले आणि आपल्या जोडीदाराचे भविष्य सुरक्षित करेल? कामगार आणि त्याच्या जोडीदाराचा मृत्यू झाला तर योजनेतील रक्कम पेंशन योजनेच्या फंडात जमा केली जाईल, त्या कामगाराच्या मागे त्याची मुलं असतील तर त्यांचं काय होईल हे कोणी सांगू शकेल का?

सरकारने असे म्हटले आहे की प्रधानमंत्री जीवन विमा योजना (पी.एम.जे.जे.बी.वाय.) आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (पी.एम.एस.बी.आय.) नुसारचा अपघात विमा स्वतंत्र आहे. रु.15,000 पेक्षा जास्त वेतन मिळवणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी प्रोव्हिडंट फंड ऑर्गनायझेशन किंवा एम्प्लॉयीज स्टेट इन्शुरन्स कॉर्पोरेशन अंतर्गत सामाजिक सुरक्षा आहे, त्यामुळे त्यांना या प्रस्तावित योजनेतून बाहेर ठेवले जाईल. या सगळ्या गोंधळावर एक सोपा उपाय आहे की वेगवेगळ्या आर्थिक स्तरातील लोकांसाठी वेगवेगळ्या पेंशन योजना बनवण्यापेक्षा सर्वांसाठी एकच व्यापक पेंशन योजना असायला हवी. सरकारी असो की खाजगी, नोकरी स्थायी असो की अस्थायी, औपचारिक असो की अनौपचारिक, रोजगार असो किंवा नसो जीवनाची सुरक्षितता सगळ्यांसाठी आवश्यक आहे. त्यामुळे वेगवेगळ्या गटासाठी वेगवेगळा विचार करण्यापेक्षा एकच योजना मग ती पेंशन असो किंवा अपघातविमा, भविष्य निधी ही सर्व सरकारी योजनेच्या स्वरुपात चालवली गेली पाहिजे.

अनौपचारिक किंवा औपचारिक क्षेत्रातील असंघटीत कामगार, कर्मचारी, मजूर, कष्टकरी जनतेने सरकारने सुचवलेल्या या पेंशन योजनेची वास्तविकता समजून घेतली पाहिजे आणि संपूर्ण सामाजिक सुरक्षेची मागणी करणारा आपला अजेंडा सेट करायला हवा आणि आपली मागणी सरकार समोर मांडायला हवी. सगळ्यांना स्थायी सुरक्षित रोजगार आणि कामगारांच्या बाजूचा श्रम कायदा संमत करून लागू केला पाहिजे. रोजगाराच्या खात्रीसोबतच सर्वांना समान शिक्षण, आरोग्यसेवा, पेंशन योजना यासारख्या सामाजिक सुरक्षा द्या नाहीतर खुर्च्या खाली करा!

**'कामगार बिगुल' ची वेबसाइट**
**www.marathi.mazdoorbigul.net**
**फेसबुक पेज**
**www.facebook.com/kamgarbigul**

# मोदी सरकारचा दुसरा कार्यकाळ: कामगार-कष्टकऱ्यांवरच्या अजून मोठ्या हल्ल्यांची सुरुवात !

पान 1 वरून

खात्यात आहेत. ऑटोमोबाईल क्षेत्रामध्ये प्रचंड मंदीचे वातावरण आहे आणि अनेक कंपन्यांनी उत्पादनात कपात केली आहे वा उत्पादन बंद केले आहे. आर्थिक वाढीचा दर तर मंदावलेला आहेच, सोबतच **याच सरकारचे एकेकाळी प्रिय असलेले अर्थतज्ञ अरविंद सुब्रह्मण्यम यांनी सुद्धा भांडाफोड केला आहे की मोदी सरकार जीडीपीचे आकडे वाढवून सांगत आहे. बुडत्या जहाजातून उड्या मारणाऱ्या उंदरांसारखे उर्जित पटेलांपासून ते विरल आचार्यांपर्यंत अनेक अर्थतज्ञ जबाबदाऱ्या सोडून देत आहेत.** मंदीचे, आणि त्यातून उद्भवणाऱ्या बेरोजगारी, महागाई, अनागोंदीचे संकट देशभरातील भांडवलदार वर्गाला अस्वस्थ करत आहे. अशा स्थितीमध्ये कामगार वर्गाला अत्याधिक पिळवून काम करून घेणाऱ्या धोरणांसाठी, जनतेचा वाढता असंतोष मोडून काढण्यासाठी, एका बाजूला दमन आणि दुसऱ्या बाजूला अंधराष्ट्रभक्ती, धर्मांध विचार यांचा वापर करू शकणाऱ्या एका फॅसिस्ट शक्तीची आवश्यकता आहे आणि म्हणून आज टाटा-बिर्ला-अंबानी-अडानी सारखे सर्व उद्योगपती एकमुखाने भाजपच्या मागे तिजोऱ्या घेऊन उभे आहेत.

***संघप्रणीत कॅडर आधारित संघटनांच्या शक्तीच्या आधारावर देशभरामध्ये अंध-राष्ट्रभक्तीचे वातावरण तयार करण्यात भाजप यशस्वी ठरला आहे. 'गोमाते'चे रक्षण असो, पुलवामा हल्ला असो, सैनिकांच्या मृत्यूचे राजकारण असो, वा राममंदिर या सर्व प्रश्नांना जनतेच्या गळी उतरवून, जनतेचे खरे प्रश्न म्हणजे बेरोजगारी, महागाई, शिक्षण, आरोग्य यांच्यापासून वैचारिक चर्चा दूर नेण्यात भाजप यशस्वी झाले याचे एक मुख्य कारण मीडियाच्या समर्थनासोबतच ही संघटीत शक्ती सुद्धा आहे, जी शाळा, महाविद्यालये, विविध 'सेवाभावी' संस्थांचे जाळे, कुजबुज, अफवा, दुष्प्रचार, सोशल मीडिया यांच्या जोरावर अंध-राष्ट्रभक्तीचे वातावरण आणि सोबतच कष्टकरी, कामगार, दलित, अल्पसंख्यांक यांच्या मनामध्ये भितीचे वातावरण सुद्धा तयार करत असते.***

भाजपच्या विजयानंतर देशभरातील अनेक उदारमतवादी पूर्णत: निराश आणि हताश झालेले आहेत आणि जनतेला दोष देत आहेत. 'ही जनताच अशी आहे','अशा प्रकारच्या जनतेला असेच सरकार मिळाले पाहिजे' अशा प्रकारच्या प्रतिक्रिया ते देत आहेत. फॅसिझम आणि फॅसिझमच्या विरोधातील योग्य रणनिती न समजू शकलेल्या, भाजपला हरवणाऱ्याला मत द्या, किंवा काँग्रेसला मत द्या असा प्रचार करणाऱ्या या 'विद्वानां'ना याचे कारण मात्र शोधावे लागेल की याच जनतेने तर काँग्रेसपासून ते समाजवादी पक्षापर्यंत आणि सीपीएम पासून ते राष्ट्रवादी काँग्रेसपर्यंत विविध पक्षांना गेल्या 70 वर्षांमध्ये मतं का दिली! त्यांना हे सुद्धा सांगावे लागेल जिथे कुठे काँग्रेस वा इतर कोणत्याही 'उदारमतवादी' पक्षाची सरकारं अस्तित्वात आहेत, तिथेही हिंदुत्ववादी शक्ती आजही मजबूत का आहेत आणि गोरक्षकांच्या उन्मादावर काँग्रेसची आणि इतर उदारमतवादी सरकारं गप्प का आहेत? त्यांना उत्तर द्यावे लागेल की मध्यप्रदेश मध्ये गोतस्करीच्या आरोपावर तेथील काँग्रेस सरकार सुद्धा राष्ट्रीय सुरक्षा कायदा का लागू करत आहे? याचे उत्तर सोपे आहे. जनतेचे अशाप्रकारे दमन ही काँग्रेस-भाजपचा खरा मालक असलेल्या भांडवलदार वर्गाची गरज आहे, आणि त्यामुळे अशाप्रकारच्या अत्याचारांविरोधात कोणत्याही प्रकारच्या निर्णायक कायदेशीर कारवाईची अपेक्षा ठेवणे आता अव्यावहारिक बनले आहे. उदारमतवादी विरोध फॅसिझम विरोधात लढू शकत नाही हे कठोर सत्य आहे.

हे समजणे आज आवश्यक आहे की भारतातील फॅसिझमचे संकट इटली आणि जर्मनी मधील फॅसिझमच्या संकटापेक्षा वेगळे आहे. इटली आणि जर्मनीमध्ये ज्याप्रकारे अकस्मातपणे फॅसिझमचा उदय आणि अस्त झाला, त्याच्या पेक्षा वेगळ्या पद्धतीने म्हणजे गेल्या 90 वर्षांपेक्षा जास्त काळ आर.एस.एस. देशामध्ये अस्तित्वात आहे आणि तिने फॅसिस्ट संघटनांचे जाळे विणले आहे. या जाळ्यामार्फत नोकरशाही, पोलिस, न्यायव्यवस्था, शिक्षण संस्था, सैन्य, अशा अनेक संस्थांमध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष घुसखोरी केली आहे. दुसरे म्हणजे भांडवलशाहीचे आर्थिक संकट आता एक कायमस्वरुपी संकट बनलेले आहे, जगाच्या अर्थव्यवस्थेमध्ये तेजीचा काळ परत येण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीयेत, आणि त्यामुळे मंदीच्या काळात कामगार वर्गात फूट पाडणाऱ्या, त्यांचे दमन करणाऱ्या फॅसिस्ट शक्तींचे अस्तित्व ही भांडवलदार वर्गाची कायमची गरज बनलेली आहे. आर्थिक संकट जगव्यापी असल्यामुळेच आज आपल्याला फक्त भारतातच नाही, ग्रीस मध्ये 'गोल्डन डॉन', जर्मनी व ब्रिटन मध्ये 'पैगदा', फ्रान्स मध्ये 'नॅशनल फ्रंट', युक्रेन मध्ये 'स्वोबदा' आणि ऑस्ट्रेलिया मध्ये 'रिक्लेम ऑस्ट्रेलिया' सारख्या फॅसिस्ट किंवा अति-उजव्या चळवळी वाढत आहेत . फॅसिस्ट शक्ती आज भांडवलदार वर्गासाठी एका अनौपचारिक राज्यसत्तेचे काम करत आहेत. या समांतर सत्तेची गरज अल्पसंख्यांक, दलित, कामगारांवरील हल्ल्यांसारख्या अशा उद्दिष्टांसाठी आहे जी औपचारिक राज्यसत्तेकडून करवून घेणे प्रस्थापित मान्यतांच्या चौकटीत अशक्य नसले तरी अवघड आहे. आम्ही नेहमी मांडत आलो आहोत त्याप्रमाणे, फॅसिस्ट शक्ती अशा साखळीने बांधलेला हिंस्र कुत्रा आहेत ज्यांची साखळी भांडवलदार वर्गाच्या हातात आहे. त्या त्याला कधी भुंकायला सांगतात, कधी अंगावर धावायला, कधी चावायला सांगतात; कधी ते साखळी सैल सोडतात, तर कधी घट्ट धरतात.

जिग्नेश मेवानी, कन्हैया कुमार सारख्या सर्व संधीसाधू नेत्यांच्या मर्यादा सुद्धा या निवडणुकीमुळे स्पष्ट झाल्या आहेत. या प्रकारच्या डाव्या-उदारमतवादी प्रकारच्या राजकारणाचे अपयश हेच दाखवते की फॅसिझम विरोधात योग्य वैज्ञानिक समजदारीवर आधारित क्रांतिकारी कामगार-कष्टकरी एकजूटच खऱ्या अर्थाने लढू शकते. आज कोणत्याही प्रकारचे बेरजेचे राजकारण करून भाजपला हरवण्याची कल्पना साफ चुकीची ठरेल. दलित, मुस्लिम, आदिवासी, मागास, इत्यादींमधील काही घटकांच्या भावनांना साद घालेल अशाप्रकारच्या लोकरंजक घोषणा करून, अस्मितेच्या राजकारणाचे नवनवीन प्रयोग करून, जयभीम-जयमीम किंवा जयभीम-लालसलाम सारख्या विरोधाभासी विचार तत्वांची सरमिसळ करून ना तर जनतेला जिंकता येऊ शकते ना फॅसिस्टांना हरवता येऊ शकते. याचेच आणखी एक उदाहरण म्हणजे दुरुस्तीवादी पक्षांचा म्हणजे सीपीएम, सीपीआय, सीपीआय (लिबरेशन) सारख्या पक्षांचा झालेला सफाया. बंगाल, त्रिपुरा, केरळमध्ये आणि देशभरात इतरत्र या सर्व पक्षांना मोठा पराभव स्विकारावा लागला आहे. यापेक्षाही महत्वाची गोष्ट म्हणजे बंगाल, त्रिपुरा मध्ये सीपीएमच्या कार्यकर्त्या फळीचा मोठा हिस्सा आज सरळ भाजप मध्ये डेरेदाखल होताना दिसत आहे. या पक्षांच्या दुरुस्तीवादी विचारांचा, भांडवली धोरणांचा परिणाम म्हणून हे पक्ष जनतेपासून दूर तर गेलेच आहेत, सोबतच वैचारिक संधीसाधूपणाचे परिवर्तन पक्षांतर्गत वैयक्तिक संधीसाधूपणामध्ये होतच असते जे आता दिसून आले आहे. दुरुस्तीवादाचाच परिणाम आहे की या पक्षांचा जो दिसणारा जनाधार होता तो यांचा जैविक जनाधार नव्हता आणि त्यामुळेच संधी मिळताच हा जनाधार सत्तेच्या जवळ असणाऱ्या पक्षाकडे गेला आहे. या पक्षांमध्ये काम करणाऱ्या आणि आजही प्रामाणिक असलेल्या कार्यकर्त्यांना आज विचारधारात्मक प्रश्न उपस्थित करावेच लागतील जेणेकरून एका योग्य क्रांतिकारक कम्युनिस्ट मांडणीकडे जाता येईल.

**फॅसिझम हे मक्तेदारी भांडवलशाहीचे अपत्य आहे. त्यामुळे फॅसिझमचा सामना फक्त एक खरा कामगारवर्गीय पक्ष, म्हणजे क्रांतिकारक कम्युनिस्ट पक्षच करू शकतो, ज्याला उभे करणे आजच्या स्थितीमध्ये एक दीर्घकालीक कार्य आहे.** दुसरे हे सुद्धा समजणे आवश्यक आहे की एका बाजूला तर निवडणुकीचे मैदान भांडवली पक्षांसाठी मोकळे न सोडता क्रांतिकारी कम्युनिस्टांनी समाजवादी कार्यक्रमाच्या प्रचारासाठी हा मंच पुरेपूर वापरलाच पाहिजे, पण या भ्रमात जगता कामा नये की निवडणुकीत हरवून फॅसिझमला हरवणे शक्य आहे. फॅसिझमचा सामाजिक आधार असलेल्या भरती केंद्रांना लक्ष्य करुन, व्यापक सामाजिक आंदोलन रस्त्यांवर उभे करावेच लागेल. जनतेला तिच्या प्रश्नांच्या खऱ्या कारणांशी अवगत करवून तिला क्रांतिकारक मागण्यांकडे वळवणे आणि फॅसिझम विरोधात व्यापक कामगार वर्गीय आघाडी उभी करणे हा फॅसिझमच विरोधातील लढ्याचा अत्यंत महत्वाचा कार्यभार आहे.

गेल्या पाच वर्षांमध्ये मोदी सरकारने बेरोजगारीचे सर्व उच्चांक मोडीत काढले, धार्मिक/जातीय विद्वेष पराकोटीला पोहोचवला, भ्रष्टाचाराचेही अनेक मैलाचे दगड पार केले, जनतेच्या दैन्यावस्थेला अजूनच असह्य करून टाकले, तरीही ते जिंकून आले. याचे मुख्य कारण आहे एका योग्य देशव्यापी क्रांतिकारी पर्यायाची अनुपस्थिती. काँग्रेस आणि तिसऱ्या आघाडीच्या राजवटीतील 70 वर्षे आणि विशेषत: उदारीकरणाच्या काळातील गेल्या 25-30 वर्षांच्या काळाने जनतेला देशोधडीस लावले. कामगार वर्गच नाही तर निम्न-भांडवली वर्गाच्या एका हिश्श्यालाही बर्बाद केले. मोदीच्या गेल्या 5 वर्षातील कालखंडाने या जखमेवर मीठ चोळण्याचेच काम केले. परंतु क्रांतिकारी शक्तींच्या देशव्यापी अनुपस्थितीमध्ये त्याची प्रतिक्रिया वापरुन घेण्यात भाजप यशस्वी ठरले आहे, याचे कारण आहे सुद्धा हेच आहे की आर्थिक कारणे स्वत:हून जनतेला राजकीय परिवर्तनाकडे नेत नाहीत तर त्यासाठी एका क्रांतिकारी अभिकर्त्याची गरज असते. अशा प्रकारचा क्रांतिकारी अभिकर्ता, म्हणजेच क्रांतिकारी कामगार पक्ष, मजबूत करणे हा कामगार वर्गापुढील एक महत्वाचा कार्यभार आहे.

**मंदीवर तात्कालिक उपाय म्हणून मोदी सरकारने कामगार-कष्टकरी जनतेचं रक्त शोषणारी धोरणं आखली आहेत. संसदेत प्रस्तावित असलेल्या कामगार कायद्यांमधील सुधारणांनुसार यापुढे मनमानी पद्धतीने कामगारांना कामावर ठेवणे आणि काढणे (हायर-अँड-फायर), ठेकेदारीकरण करणे, दारिद्र्यरेषेपेक्षाही कमी अशा मजुरीमध्ये काम करवून घेणे, उद्योगधंद्यांवर सरकारी देखरेख संपवणे अशा सवलतींची बरसात उद्योगपतीवर्गावर केली आहे. कामगारांच्या हाडा-मांसाचे पाणी करून उद्योगपतींच्या तिजोऱ्या भरण्याचे काम मोदी सरकारने अत्यंत ईमानदारीने आणि कार्यक्षमपणे पुढे चालवले आहे.** उद्योगपतींवर्गाची चाटुगिरी करायला अत्यंत आतुर असलेले भाजपचे कामगार मंत्री संतोष गंगवार तर जुलै महिन्यात असेही वक्तव्य केले आहे की सरकारने राष्ट्रीय किमान वेतन फक्त रु. 178 ठरवले आहे, म्हणजे महिन्याला फक्त जवळपास रु. 4,628! इतक्या पैशात एका कुटुंबाचे काय, एका माणसाचे पोट सुद्धा भरणे अशक्य आहे! स्पष्ट आहे की मोदी सरकारला ज्या कामासाठी भांडवलदार वर्गाने निवडले आहे, ते काम अत्यंत वेगाने केले जाणार आहे ! कामगार वर्गाने मोदींच्या दुसऱ्या कार्यकाळात होऊ घातलेल्या या अजून पाशवी हल्ल्याविरोधात संघर्षासाठी कंबर कसून सज्ज झाले पाहिजे.

## भगतसिंह जे म्हणाले ते आजही प्रासंगिक आहे!



क्रांतीचा आमचा आशय काय आहे, हे स्पष्ट आहे. या शतकात क्रांतीचा फक्त एकच अर्थ असू शकतो तो म्हणजे - जनतेसाठी जनतेने राजकीय सत्ता ताब्यात घेणे. वास्तवात हीच 'क्रांती' आहे. बाकी सारे विद्रोह हे फक्त मालकांच्या पाठिंब्याने चालणाऱ्या परिवर्तनाद्वारे भांडवलशाहीतील सडकेपणाच पुढे रेटत असतात. लोकांविषयी किंवा त्यांच्या प्रश्नांविषयी कितीही सहानुभूती दाखवली तरी जनतेपासून वस्तुस्थिती लपत नाही, लोक कपट ओळखतातच. भारतामध्ये श्रमिकांच्या सत्तेपेक्षा काहीही कमी स्वीकारणे आम्हांला मान्य नाही. भारतातील साम्राज्यवादी - आणि ज्यांची नाळ शोषण हा मूलाधार असलेल्या आर्थिक व्यवस्थेशी जुळलेली आहे, असे त्यांचे हस्तक - यांना हुसकून देऊन भारतीय श्रमिकांना पुढे यावे लागेल. आम्ही गोऱ्या दुष्प्रवृत्तीच्या जागी काळी दुष्प्रवृत्ती आणून यातना भोगू इच्छित नाही. एक स्वार्थी समूह म्हणून या दुष्प्रवृत्ती एकमेकांची जागा घ्यायला तयार आहेत.

**(क्रांतिकारी कार्यक्रमाचा मसुदा)**

कायदा जोपर्यंत जनतेचे मानस म्हणजे तिच्या भावना प्रकट करतो, तोपर्यंतच कायद्याचे पावित्र्य टिकून राहते. तो जेव्हा शोषक समूहांच्या हातातला कागदाचा कपटा बनून जातो, तेव्हा त्याचे पावित्र्य आणि महत्त्व तो हरवून बसतो. न्याय द्यायचा तर प्रत्येक प्रकारच्या लाभांचा आणि हितसंबंधांचा खातमा करणे ही मूलभूत गोष्ट आहे. कायदा जसजसा सामाजिक गरजा भागवणे बंद करत जातो; तसतसा तो जुलूम आणि अन्याय वाढवण्याचे हत्यार बनत जातो. असे कायदे चालू ठेवणे याचा म्हणजे सार्वजनिक हितावर विशेष हितसंबंधांची ढोंगी जबरदस्ती आहे, दुसरे काहीही नाही,

**(भगतसिंह आणि सहा सहकाऱ्यांतर्फे कमिशनरला [कमिशनर, विशेष न्यायालय, लाहोर कट खटला, लाहोर] लिहिला गेला पत्राचा एक अंश)**

धार्मिक अंधश्रद्धा व कर्मठपणा ही आपल्या प्रगतीमधील फार मोठी धोंड आहे. आपल्या मार्गामधला तो अडथळा आहे व आपण या गोष्टी काहीही करून दूर केल्या पाहिजेत. 'ज्या ज्या गोष्टी स्वतंत्र बुद्धीने केलेल्या विचारासमोर टिकू शकत नाहीत, त्या नष्ट झाल्याच पाहिजेत.' आपल्यात इतरही अशा अनेक उणीवा आहेत की ज्यांच्यावर आपण मात केली पाहिजे. हिंदूंमधला कर्मठपणा व पुराणमतवाद; मुसलमानांमधली धर्मांधता व दुसऱ्या देशांबद्दल त्यांना असलेला जिव्हाळा; आणि एकंदरीतच सर्व जमातींमधली संकुचित मनोवृत्ती यांचा परकीय शत्रूंनी नेहमीच फायदा करून घेतला आहे. आपल्या कार्यासाठी सर्व जमातींमधल्या ध्येयनिष्ठ उत्साही तरुणांची गरज आहे.

**(नौजवान भारत सभा, लाहोरचा जाहीरनामा)**

# मराठा आरक्षणाचा अन्वयार्थ

✍ अविनाश

महाराष्ट्र विधानसभेने 29 नोव्हेंबर 2018 रोजी मराठा जातीला शिक्षण आणि रोजगाराच्या क्षेत्रामध्ये 'सामाजिक आणि शैक्षणिक रुपाने मागासलेला वर्ग' नावाची एक नवीन श्रेणी बनवून 16 टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. नुकतीच उच्च न्यायालयाने ही मर्यादा 12 टक्क्यांवर आणत त्याला मान्यता दिली आहे. महाराष्ट्रामध्ये अगोदर आरक्षण 52 टक्के होते. यामध्ये अनुसुचित जातींसाठी 13 टक्के, अनुसुचित जमातींसाठी 7 टक्के, इतर मागास वर्गांसाठी 19 टक्के, विशेष मागासांसाठी 2 टक्के, विमुक्त जातींसाठी 3 टक्के, भटके विमुक्त-बी साठी 2.5 टक्के, भटके विमुक्त-सी (धनगर) साठी 3.5 टक्के आणि भटके विमुक्त-डी(वंजारी) साठी 2 टक्के आरक्षणाची सोय होती. आता मराठ्यांना आरक्षण मिळाल्यानंतर हे प्रमाण 64 टक्क्यांवर गेले आहे. अशामध्ये प्रश्न उपस्थित होत आहे की मराठा जातीच्या संपूर्ण लोकसंख्येला याचा फायदा मिळेल का? चला, जरा मराठा आरक्षणाच्या ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अंगावर विचार करून याची तपासणी करूयात.

**मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचा इतिहास**

मराठा जात दोन दशकांपासून जास्त काळ आरक्षणाची मागणी करत होती. 1990 मध्ये मराठा जातीला पुढारलेली (फॉरवर्ड) हिंदू जात आणि समुदाय घोषित केले गेले होते आणि तीन सरकारी अहवालांनी मराठा जातीने केलेली इतर मागासवर्गामध्ये सामील होण्याची मागणी अमान्य केली होती. 2008 मध्ये महाराष्ट्र स्टेट बॅकवर्ड क्लास कमिशनने मराठा जातीला ओबीसी मध्ये सामील करण्याची मागणी अमान्य केली होती. यानंतर 2014 मध्ये काँगेस-राष्ट्रवादीच्या सरकारने निवडणुकीच्या ठीक अगोदर मराठा जातीची मतं मिळवण्यासाठी मराठा जातीला 16 टक्के आणि मुस्लिमांना 5 टक्के आरक्षण देण्याचा इरादा जाहीर केला होता. याला न्यायालयानेच रद्द केले कारण न्यायालयाच्या मते आरक्षण कोणत्याही विशेष जातीला नाही, तर एखाद्या जात किंवा जमात समुदायालाच दिले जाऊ शकते (जसे की ओबीसी, एससी, आणि एसटी). 2016 मध्ये कोपर्डी मधील घटनेनंतर मराठा जातीच्या आरक्षणाचा मुद्दा परत चर्चेमध्ये आला. जुलै 2016 मध्ये जेव्हा अहमदनगर मधील कोपर्डी गावामध्ये दलित युवकांद्वारे मराठा जातीतील मुलीवर बलात्कार आणि हत्येचा मामला समोर आला तेव्हा मराठा जात आणि व्यापक जनतेमधील या घटनेवरचा रोष प्रामुख्याने समोर आला. यानंतर पहिला क्रांती मोर्चा औरंगाबाद जिल्ह्यामध्ये झाला, ज्यामध्ये मोठ्या संख्येने लोक सामील झाले आणि पुढील 15 महिन्यांमध्ये 57 मराठा क्रांती मोर्चांचे आयोजन राज्यातील विविध जागी करण्यात आले. आरोपींना शिक्षा देण्यापासून इतर तीन प्रमुख मागण्या समोर आल्या. त्या होत्या - ॲट्रोसिटी कायदा 1989 मध्ये दुरुस्ती केली जावी, इतर मागासवर्गामध्ये मराठा लोकसंख्येला शिक्षण आणि नोकरीमध्ये आरक्षण देण्यात यावे, तसेच शेतमालाच्या किमान हमी भावामध्ये वाढ करण्यात यावी. पण हळूहळू कोपर्डी गावातील घटनेतील आरोपींना शिक्षा देण्याच्या मागणीच्या तुलनेत मराठा जातीला 16 टक्के आरक्षणाची मागणी प्रमुख होत गेली. या आंदोलनाच्या व्यापकतेला पाहून दोन मतं समोर येत होती. एक मत होते की याच्या आयोजनावर होणाऱ्या खर्चापासून ते याला अप्रत्यक्ष नेतृत्व देण्याचे काम मराठा लोकसंख्येमध्ये सर्वात लोकप्रिय आणि गेल्या लोकसभा-विधानसभा निवडणूकांमध्ये अयशस्वी झालेली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (एनसीपी) करत आहे. एनसीपीच्या जवळपास प्रत्येक छोट्या-मोठ्या नेत्याने कोणत्याही गाज्यावाज्याशिवाय या आंदोलनांमध्ये आपली हजेरी लावली. भाजप आणि शिवसेनेमध्ये सुद्धा प्रभावी असलेल्या मराठा लॉबीने आपल्या पद्धतीने या आंदोलनाचा लाभ उचलण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी दुसरीकडे वर्तमानपत्रे आणि नियतकालिकांमापासून बुद्धिजीवी वर्गाच्या एका घटकाचे मानणे होते की हे एक स्वत:स्फूर्त पद्धतीने उभे राहिलेले जन-आंदोलन आहे. मोठ्या प्रमाणात हे आंदोलन शांततामय मार्गाने चालू होते. फडणवीस सरकारच्या 'मेगा रिक्रुटमेंट ड्राईव्ह' (72,000 सरकारी नोकऱ्यांची)च्या घोषणे नंतर आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा युवक काकासाहेब याने 23 जुलै रोजी आत्महत्या केली. यानंतर या आंदोलनाने एक उग्र रुप धारण केले. पुढच्या आठवड्यापर्यंत या घटनेमुळे 100 गाड्या तोडण्यात आल्या आणि 4 लोकांच्या मृत्यूची बातमी सुद्धा आली. या आंदोलनांमुळे फडणवीस सरकारने 'मेगा रिक्रुटमेंट ड्राईव्ह' ला तोपर्यंत पुढे ढकलले जोपर्यंत मराठा आरक्षण दिले जात नाही.

**मराठा जातीची सामाजिक-आर्थिक स्थिती**

जर आपण गेल्या काही वर्षांमध्ये आरक्षणाची मागणी करणाऱ्या जातींना पाहिले तर गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये गुजरात, उत्तर प्रदेश, हरियाणा आणि आंध्र प्रदेशामध्ये सुद्धा याच प्रकारची आंदोलने झाली आहेत. यामध्ये विकसनशील मध्यम शेतकरी जातींनी आरक्षणाची मागणी केली आहे. यानुसार गुजरात मध्ये पाटीदार, हरियाणा मध्ये जाट, आंध्र प्रदेशामध्ये कापू सामील आहेत. महाराष्ट्रामध्ये ऐतिहासिक रुपामध्ये मराठा, कुणबी आणि माळी जाती शेतकरी पृष्ठभुमीच्या आहेत. एका बाजूला 20व्या शतकात मराठा आणि कुणबी जाती स्वत:ला क्षत्रिय म्हणून स्थापित करण्यासाठी लढत होत्या, तिथेच आता बदललेल्या आर्थिक परिस्थितीमध्ये आपल्या सामाजिक स्थितीमध्ये बदलामुळे त्या स्वत:ला मागास जातींमध्ये सामील करवून घेण्याची लढाई लढत आहेत.

एका बाजूला महाराष्ट्रातील मराठा समुदायाची लोकसंख्या जवळपास 33 टक्के आहे आणि महाराष्ट्रातील राजकारणावर याच समुदायाचा दबदबा आहे. 200 कुलीन आणि अतिधनाढ्य मराठा परिवार आज राज्यातील जवळपास सर्व मुख्य आर्थिक साधनं आणि राजकीय़ केंद्रांवर कब्जा करून आहेत. मराठा लोकसंख्येच्या सर्वाधिक कुलीन वर्गाकडे आज अप्रत्यक्ष रुपाने राजकीय आणि आर्थिक ताकदीचे केंद्रीकरण झालेले आहे. राज्यातील जवळपास 54 टक्के शिक्षण संस्थांवर यांचा ताबा आहे. राज्यातील 105 साखर कारखान्यांपैकी 86 ची मालकी यांच्याकडे आहे, राज्यातील जवळपास 23 सहकारी बँकांचे मॅनेजमेंट याच खात्या-पित्या मराठ्यांकडे आहे, राज्यातील कॉलेजांपैकी 75 टक्केंचे मॅनेजमेंट यांच्याकडे आहे, जवळपास 71 टक्के सहकारी समित्या यांच्याकडे आहेत. शिवाय राजकीय शक्तीकडे पहावे तर 1962 पासून 2004 पर्यंत निवडून आलेल्या 2340 आमदारांपैकी 1336(म्हणजे 55 टक्के) मराठा होते. यापैकी अधिकांश त्याच उच्चभ्रू परिवारांमधून येतात. 1960 पासून ते आत्तापर्यंत महाराष्ट्रातील 18 मुख्यमंत्र्यांपैकी 10 मराठा होते.

दुसऱ्या बाजूला आज सुद्धा मराठा जातीतील 77 टक्के लोकसंख्या शेतीमध्ये गुंतलेली आहे. अशामध्ये शेती उद्योगातील संकटाचा परिणाम मराठा जातीच्या आर्थिक स्थितीवर पडला आहे. आज आपण पाहिले तर (2012-13 ते 2017-18 या काळात) कृषी उद्योगामध्ये गेल्या 4 वर्षांमध्ये एकूण वाढ ऋणात्मक राहिली आहे आणि ती वजा 0.4 टक्क्यांवरून वजा 10.7 टक्क्यांवर पोहोचली आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी झाले आहे. 2004 ते 2014 च्या दरम्यान ग्रामीण भागांमध्ये रोजगाराची स्थिती 71 टक्क्यांवरुन कमी होऊन 64 टक्क्यांवर आली आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण आणि शहरी भागातील उत्पन्नातील फरक देशामध्ये सर्वधिक आहे. शहरांमध्ये दरडोई उत्पन्न रु. 1,68,178 आहे, जे ग्रामीण भागाच्या तीन पटीपेक्षा जास्त आहे. 1995 पासून ते आत्तापर्यंत 2,96,438 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये 2004 ते 2013 दरम्यान दरवर्षी सरासरी 3,685 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. टाटा सामाजिक विज्ञान संस्था (TISS) ने 2011 ते 2017 च्या दरम्यान सर्व्हे केला, ज्याच्या अहवालानुसार ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केली त्यापैकी 80 टक्के सुशिक्षित होते. यापैकी 7.3 टक्के ग्रॅज्युएट किंवा पोस्ट ग्रॅज्युएट होते. सोबतच एक आकडेवारी ही पण आहे की आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांपैकी 65.8 टक्के शेतकरी मराठा, 10.4 टक्के धनगर, 4 टक्के लिंगायत आणि 3.1 टक्के माळी जातीतील होते. जागतिकीकरण-खाजगीकरण-उदारीकरणाच्या (खाउजा) 25 वर्षांनंतर कृषी संकट आणि मराठा आंदोलनाची उसळी पाहिली तर समजते की शेतीमध्ये असलेल्या मराठा जातीचे वेगाने सर्वहाराकरण झाले आहे आणि हे भांडवलशाहीचे संकट आहे. आज मराठा जातीमध्ये शेती आणि उद्योग, गाव आणि शहर, मानसिक आणि शारिरीक श्रमामधील अंतर मोठे आहे. आकडे सांगतात की 65 टक्के मराठा लोकसंख्या गरिब आहे आणि मराठा जातीतील फक्त 4 टक्के हिश्श्याकडे 20 एकरापेक्षा जास्त जमीन आहे. सध्याच्या स्टेट बॅकवर्ड क्लास कमिशनच्या शैक्षणिक आणि सामाजिक आर्थिक आकड्यांनुसार मराठा जातीतील 37 टक्के लोकसंख्या गरिबी रेषेच्या खाली आहे. 93 टक्के परिवार आहेत ज्यांचे वार्षिक उत्पन्न एक लाखांच्या खाली आहे. एका सर्व्हे नुसार 60 ते 65 टक्के मराठे कच्च्या घरांमध्ये राहतात.

**आरक्षण की रोजगार?**

जर आपण अर्थव्यवस्थेमध्ये शेती क्षेत्राच्या भागीदारीकडे पाहिले तर सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या 15 टक्क्यांपेक्षा कमी शेती आणि निगडीत क्षेत्रातून येते. दुसऱ्या बाजूला लोकसंख्येचा एक मोठा हिस्सा आपल्या जीविकोपार्जनासाठी याच क्षेत्रावर अवलंबून आहे. शेतीव्यतिरिक्त मॅन्युफॅक्चरींग आणि प्रत्यक्ष उत्पादनाच्या अन्य क्षेत्रांमध्ये रोजगाराची निर्मिती ऋणात्मक दरामध्ये आहे. सरकारी आणि खाजगी क्षेत्रांमध्ये सुद्धा हीच अवस्था आहे आणि जी नवीन भरती होत आहे तिच्यामध्ये बहुतेक कंत्राटी, कॅज्युअल, ॲड-हॉक पद्धतीने होत आहे. आज मुलभूत प्रश्न रोजगार निर्मितीचा आहे. उदारीकरण-खाजगीकरणाच्या या काळात 'स्टेट ऑफ वर्क इन इंडिया' 2018 च्या अहवालानुसार अनेक वर्षे बेरोजगारीचा दर 2 ते 3 टक्क्यांपर्यंत होता, तोच दर 2015 मध्ये 5 टक्क्यांवर पोहोचला, ज्यामध्ये युवक बेरोजगार 16 टक्क्यांपर्यंत होते. नोकरीच्या कमतरतेमुळे उत्पन्न घटले आहे. आज 82 टक्के पुरुष आणि 92 टक्के महिला महिन्याला रु. 10,000 पेक्षा कमी कमावतात. 1970 आणि 80 मध्ये जीडीपीची वाढ 3 ते 4 टक्के होती आणि रोजगार निर्मिती दरवर्षी 2 टक्के होत होती. पण 1990 नंतर आणि विशेषत: 2000 नंतर जीडीपी वाढीचा दर 7 टक्क्यांवर पोहोचला आहे, तिथेच रोजगार निर्मितीचा दर 1 टक्क्यांपेक्षाही कमी झाला आहे. एन.एस.एस.ओ. च्या अहवालानुसार गेल्या वर्षी गेल्या 45 वर्षांमधील सर्वाधिक बेरोजगारी होती. अशामध्ये आपली मागणी सरकारने सर्वांना रोजगाराची पक्की हमी देण्याची असली पाहिजे. मराठा जातीमध्ये सुद्धा जो कष्टकरी समुदाय शेतीचे संकट आणि त्यातून निर्माण झालेल्या रोजगार, उत्पन्नातील कपात आणि असमानतेची घृणा करतो, त्याला अस्मितावादी राजकारण करणाऱ्या संघटना-पक्ष आपल्या फायद्यासाठी वापरून घेतात आणि वर्गीय स्तरावर एकजूट होण्यापासून थांबवतात. हेच कारण आहे की व्यवस्थेतून उत्पन्न होणाऱ्या रागाला कधी जात, भाषा, समुदाय, प्रांताच्या नावावर विभागण्याचे काम केले जाते. याच प्रकारचे उदाहरण आहे की अस्मितावादी राजकारणाचा भाग म्हणून मनसे प्रमुख राज ठाकरे मराठी आणि गैर-मराठी मध्ये अंतर निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. आकडे सांगतात की एन.एस.एस.ओ. (NSSO) च्या अहवालानुसार महाराष्ट्राच्यामध्ये असलेल्या प्रवासी मजूरंपैकी जवळपास 70 टक्के लोक महाराष्ट्राच्याच इतर भागांमधून आलेले आहेत. जेव्हा एक मजूर बिहार, उत्तरप्रदेश, ओरिसा मधून प्रवास करून महाराष्ट्रात येतो, त्याच वेळी 3 प्रवासी मजूर महाराष्ट्रातल्याच इतर भागांमधून मोठ्या शहरांमध्ये आलेले असतात. भांडवली निवडणुकबाज राजकीय पक्ष याचप्रकारचे मुद्दे गरम करून आपल्या राजकारणाच्या पोळ्या भाजण्यासाठी वापरतात.

**मराठा आरक्षणाच्या राजकारणातून कोणाला फायदा?**

2014 च्या विधानसभा निवडणूकांमध्ये राष्ट्रवादी-काँग्रेस द्वारे 16 टक्के आरक्षणाची खेळी फसली. त्यावेळी भाजपला विधानसभा निवडणूक जिंकल्यावर 122 जागा मिळाल्या. पण मतांची टक्केवारी पाहिली तर भाजपला मराठा जातीची 24 टक्केच मते मिळाली आणि शिवसेनला 29 टक्के व राष्ट्रवादीला 28 टक्के मते मिळाली. भाजप निवडणुकीच्या अगोदर आरक्षणाच्या राजकारणातून मराठा जातीच्याच शहरी उच्चभ्रू लोकसंख्येमध्ये आपल्या मतपेढीला वाढवू पहात होती. मराठा जातीचा प्रमुख पक्ष आत्तापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस होता, ज्याची हरुन सुद्धा मराठ्यांमध्ये पकड मजबूत होती. याच मतपेढीचे राजकारण समोर ठेवून भाजपने मराठा आरक्षणाच्या मागणीला पुढे रेटले आणि आता तो निवडणुकीमध्ये या संधीचा पुरेपुर वापर करून घेण्याचा प्रयत्न नक्की करेल.

भांडवली स्पर्धेमध्ये तोच वर्ग पुढे राहतो ज्याच्याकडे साधनं उपलब्ध आहेत. मुळात जागाच इतक्या कमी आहेत की कोणत्याही जातीतील अत्यंत छोट्या हिश्श्यालाच संधी मिळू शकते. शहरातील सर्व सुखसोयी उपलब्ध असलेल्या मध्यम, उच्च-मध्यम वर्गातील विद्यार्थ्यांशी स्परधेमध्ये ग्रामीण गरिब, शेतकरी, कष्टकरी वर्गातून येणाऱ्या विद्यार्थ्यांचा निभाव लागणे अत्यंत बिकट आहे. त्यामुळे वास्तवामध्ये या आरक्षणाचा जो अल्पत्य फायदा होणार आहे तो सुद्धा मराठा जातीतीलच उच्च वर्गीय़ शहरी हिश्श्यालाच जाईल. मराठा जातीतील सामान्य कष्टकरी जनतेच्या जीवनात तसुभरही फरक पडणार नाही. कधीकधी भांडवली राजकारणी बोलण्याच्या नादात सत्य बोलून जातात—खुद्द भाजपचे नेते नितिन गडकरी यांनीच मराठा आरक्षणाबद्दल म्हटले होते की आरक्षणाची लढाई लढताय कशाला, जेव्हा नोकऱ्याच नाहीयेत ! अस्मितावादी लढाईतून हे होईल की एका अस्मितेच्या विरोधात दुसरी अस्मिता उभी राहिल. याच मार्गावर धनगर जात सुद्धा अनुसुचित जमातींमध्ये आरक्षण घेऊ इच्छित आहे. मुस्लिम सुद्धा 2014 मध्ये केल्या गेलेल्या 5 टक्के आरक्षणाच्या वायद्याची आठवण करून देतील आणि नुकतेच सवर्णांमधील गरिब हिश्श्याला 10 टक्के आरक्षण देण्याचे राजकारण सुद्धा समोर आले आहे. आज आपण हे समजणे गरजेचे आहे की जातीय पूर्वाग्रह तोडून वर्गीय आधारावर एकजूट होऊन लढणे हाच एक उपाय आहे कारण 70 वर्षांच्या स्वातंत्र्यामध्ये सर्व जातींमधील गरिब, कष्टकरी समुदायांच्या वाटेला ना आजपर्यंत काही आले, ना काही येईल. असे केले नाही, तर एका काल्पनिक भाकरीच्या हिश्श्याच्या लढाईमध्ये रस्सीखेच करण्याचा फायदा सत्ताधारी भांडवलदार वर्गालाच होईल.

**अनुवाद : राहुल**

# डॉक्टर पायल तडवी यांची आत्महत्या : जातीय अत्याचाराचा आणखी एक बळी!

**परमेश्वर जाधव**

मुंबईत वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या व आदिवासी सामाजिक पार्श्वभूमी असलेल्या डॉक्टर पायल तडवी यांना जातीय छळवणुकीमुळे आपला जीव गमवावा लागला. तशी पाहिली तर ही घटना नवीन नाही. यापूर्वीसुद्धा दलित आणि आदिवासी पार्श्वभूमी असलेल्या उच्चशिक्षित तरुण-तरुणींना जातीय अत्याचाराला बळी पडावे लागले आहे आणि वेळप्रसंगी आपला जीव गमवावा लागला आहे. या अन्याय अत्याचाराचे स्वरूप अनेकदा संस्थागत हिंसात्मक स्वरूपाचे राहिले आहे. सार्वजनिक ठिकाणी अपमानास्पद बोलणे, हिनवणे, सामाजिक पार्श्वभूमीच्या आधारे शैक्षणिक संस्थेच्या परिसरात वेगळी वागणूक देणे, शिक्षक प्राध्यापकांकडून अध्यापनात भेदभाव जनक व्यवहार करणे, हॉस्टेल्स व भोजन गृहांमध्ये वेगळा गट पाडणे, वसतीगृहात दलित आदिवासींच्या मुलांना मुलींना वरचा मजला किंवा खालचा मजला यासारख्या विभागणी करणे, गुणवतेवरून किंवा आरक्षणाच्या आधारे टोमणे मारणे हा व्यवहार सर्रासपणे शैक्षणिक संस्थांच्या परिसरात चालतो.

### डॉ.पायल पडवीवरील जातीय अत्याचाराचे स्वरूप

डॉक्टर पायल तडवी ही मुंबई मधील नावाजलेल्या टीएन टोपिवला नॅशनल मेडिकल कॉलेज (टीएनएमसी) येथे द्वितीय वर्षीय एमडी शिकणारी विद्यार्थीनी होती. तिची सामाजिक पार्श्वभूमी आदिवासी होती. त्यामुळे तिच्या वरिष्ठांकडून सहा महिन्यापासून जातीय छळ केला जात होता. हा छळ करणाऱ्यामध्ये प्रामुख्याने हेमा अहुजा, भक्ती मेहरे आणि अंकिता खंडेलवाल यांच्याकडून पायलला नेहमीच जातीवाचक बोलणे, मागास आहे अशा प्रकारचे टोमणे मारणे, आरक्षण आणि गुणवत्तेच्या नावाखाली अपमानास्पद वागणूक देणे, सार्वजनिक ठिकाणी अपमान करून बोलणे, कामाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची संधी न देणे, जाणीवपूर्वक जातीय पूर्वग्रह ठेवून वैद्यकीय शिक्षणात आवश्यक असलेल्या वैद्यकीय सरावाला डावलणे, पेशंट किंवा नातेवाईकाच्या समोर मोठ्या आवाजामध्ये जातीवाचक शिवीगाळ करणे, काम करून न देणे अशा प्रकारचा व्यवहार केला जात होता. प्रशासनाला कल्पना देऊन सुद्धा प्रशासनाने अप्रत्यक्षरीत्या तिच्यावर होत असलेल्या जातीय अन्याय आणि अत्याचाराच्या घटनेला पाठिंबा दिला. पायल ही सामाजिक दृष्ट्या अत्यंत संवेदनशील आणि गरिबी, भूक, स्वच्छता अशा प्रश्नांवर सामाजिक मीडीय़ा मध्ये भुमिका घेणारी सजग डॉक्टर होती. परंतु सततच्या या त्रासाला कंटाळून पायलने आत्महत्या केली. आत्महत्या केल्यानंतर प्रशासनाकडून आणि राजसत्तेकडून पाच दिवसापर्यंत कोणत्याही प्रकारची दखल घेतली जात नव्हती. प्रगतिशील सामाजिक आणि राजकीय कार्यकर्त्यांच्या पुढाकारामुळे या प्रश्नाला सार्वजनिक वाचा फुटली व त्यानंतर आरोपींना अटक झाली. रॅगिंगचे कलम लावले गेले असले तरी अजूनही जातीय़ छळ होत होता हा आरोप पोलिसांनी दाखल केलेला नाही.

### उच्च शिक्षण: जातीय अत्याचारांचे केंद्र

भारतातील उच्च शिक्षण म्हणजे दलित आणि आदिवासी सामाजिक पार्श्वभूमी असलेल्या मुला-मुलींवरील अन्याय आणि अत्याचाराचे केंद्र बनले आहे. भारतातील उच्च शिक्षण हे प्रामुख्याने भांडवली व्यवस्थेच्या नफ्याचे हत्यार आहे. जागा कमी, त्यामुळे मिळणारा प्रवेश व संधी खूप मर्यादित असते. भारताच्या सध्याच्या उच्चशिक्षणाच्या स्थितीचा विचार केला असता असे दिसते की समाजातल्या कष्टकरी आणि कामगार पार्श्वभूमी असलेल्या मुला-मुलींना उच्च शिक्षणामध्ये अत्यंत नगण्य व कमी संधी आहे. या मर्यादित व व संकुचित संधीमुळे मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व विद्यार्थिनी उच्चशिक्षणाच्या बाहेर फेकले जात आहेत. ज्या दलित आणि आदिवासी मुला-मुलींना ही मर्यादित संधी भेटते त्यांना मोठ्या प्रमाणात जातीय व धार्मिक अन्याय-अत्याचाराला सामोरे जावे लागत आहे. दलित आणि आदिवासी मुलामुलींना नेहमीच शिक्षक, प्रशासन आणि राज्यसंस्थेच्या विविध घटकांकडून भेदभावाची वागणूक दिली जाते. या अन्याय आणि अत्याचार याचे स्वरूप आपण पहिले तर असे लक्षात तर ते तीन प्रकारच्या स्तरावर काम करते. पहिले म्हणजे दलित-आदिवासी विद्यार्थी विरुद्ध इतर विद्यार्थी अशा प्रकारचा भेदभाव, दुसरे दलित-आदिवासी विद्यार्थी विरोधात प्रशासनाकडून भेदभाव, तिसरे दलित-आदिवासी विद्यार्थी विरोधात शिक्षकांकडून भेदभाव मोठ्या प्रमाणात होत असताना दिसतो. अशा जातीय आणि अत्याचारांच्या पार्श्वभुमीवर दलित आणि आदिवासी मुलंमुली अत्यंत निराश व कुंठीत अवस्थेत शिक्षण घेतात.

### थोरात समिती अहवाल

उच्च शिक्षणातील तंत्रज्ञान आणि वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या क्षेत्रातील दलित आणि आदिवासी मुलामुलींवर शैक्षणिक संस्थेच्या परिसरात होणाऱ्या जातीय अन्याय आणि अत्याचाराच्या संदर्भात एम्स, नवी दिल्ली (2007) मधील जातिभेदांवरील प्रोफेसर थोरात समिती अहवाल केंद्र शासनाकडून नेमण्यात आला. हा आवाज केंद्र शासनाला 2007 मध्ये देण्यात आला. या अहवालामध्ये वैद्यकीय आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात शिक्षण संस्थेच्या परिसरातील दलित आणि आदिवासी मुलामुलींवर जातीय अन्याय आणि अत्याचार कसा केला जातो यावर प्रकाश टाकला आहे. या अहवालामध्ये दलित जातीतील आणि आदिवासी जमातीतील मुला-मुलींना कोणत्या कोणत्या प्रकारच्या भेदभावांना सामोरे जावे लागत आहे याची जळजळीत उदाहरणे दिली आहेत. दलित आणि आदिवासी जाती-जमातीतील मुलासोबत अंतर्गत आणि बाह्य मूल्यमापनामध्ये मोठ्या प्रमाणात भेदभाव केल्याचे नमूद केले आहे. 72 टक्के दलित आणि आदिवासी मुलामुलींसोबत शिकवण्याच्या वेळेस भेदभाव केला जातो आहे. 76 टक्के दलित आणि आदिवासी मुलामुलींना पेपर तपासणीच्या वेळेस भेदभाव केल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे, व त्यासोबतच मौखिक व प्रयोग शाळेतील भेदभाव केला जातो आहे. त्यासोबतच दैनंदिन व्यवहारांमध्ये बोलण्याच्या आणि राहण्याच्या स्वरूपावरून टोमणे, जेवणाच्या ठिकाणी भेदभाव, खेळामध्ये आणि सांस्कृतिक कामांमध्ये सहभाग नाकारणे या गोष्टींचीही नोंद आहे. विद्यार्थ्याच्या वसतीगृहामध्ये दलित आणि आदिवासी मुलांना मुलींना वेगळी वागणूक कशी दिली जाते यावरही प्रकाश टाकून उच्च शिक्षणातील जाती आणि आणि अत्याचाराचे नग्न स्वरूप उघडकीस आणले आहे. हा अहवाल शासनाला सादर करून आज जवळपास बारा वर्षे झाली आहेत, पण कारवाई कुठेही दिसून येत नाही. ही कृतीहिनता हेच दाखवते की शिक्षणसंस्थांमध्ये राज्यसत्ता सुद्धा जातीय आणि आणि अत्याचाराला खतपाणी घालण्यात सहभागी आहे.

अशा प्रकारच्या अत्याचारांचे एक कारण पपरंपरागत जातीय मानसिकता आहे, तर दुसरे आहे शिक्षणाचे बाजारीकरण. उच्च शिक्षणात पोहोचणाऱ्या अनेक सर्वणांच्या मानसिकतेबद्दल तर बोलावे तितके कमीच. समाजातील कष्टकरी, मेहनती वर्गाने उपलब्ध करून दिलेल्या संधींच्या आधारावर, त्यांच्या श्रमाच्या जिवावर आपण शिकतो ही जाणीव तर सोडाच, दलित-आदिवासी-गरीब घरातून येणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल उच्चवर्गीय, ब्राह्मण्यवादी अहंकार आणि घृणा यांच्या व्यवहारात सतत दिसते. अनेक कोटींमध्ये डोनेशन देऊन वैद्यकीय शिक्षणाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल यांना तक्रार नसते, परंतु गुणवत्तेच्या, मेरिटच्या ढोंगी सबबीखाली आपले जातीय पूर्वाग्रह, वर्चस्ववाद आणि जातीय अहंकार जोपासण्याचे काम ही मंडळी व्यवस्थित करतात. दुसरीकडे भारतातली उत्पादन व्यवस्था ही भांडवली असल्यामुळे सर्व उत्पादन आणि व्यवस्था ही नफा केंद्री झाली आहे. परिणामी भारतातील उच्च शिक्षण सुद्धा नफ्याचे साधन, कॉर्पोरेट भांडवलासाठी एक संधी बनले आहे. जागतिकीकरणामुळे शिक्षणासारख्या क्षेत्रांमध्ये कामगार कष्टकऱ्यांची पार्श्वभूमी असलेल्या मुला-मुलींना अल्पत्य संधी या व्यवस्थेत उपलब्ध आहे. मर्यादित संधी आणि नफा केंद्रीय शिक्षण व्यवस्था यामुळे कोणत्याही प्रकारच्या चिकीत्सक आणि सर्जनशील शिक्षणाला संधी उपलब्ध नाही. मुळातच तोकड्या असलेल्या या व्यवस्थेत आरक्षणातून जागा निघतात, त्या सुद्धा अत्यंत कमी. त्यातही ज्यांना या जागा मिळतात त्यांना विविध मार्गांनी मोफत शिक्षण नाकारण्यासाठी विविध फी आकारल्या जातात. दुसरीकडे स्पर्धेच्या युगामध्ये आरक्षणाचा फायदा घेऊन आज बहुतांश प्रतिष्ठीत शिक्षणसंस्थांमध्ये प्रत्येक जातीतील मध्यमवर्गीय विद्यार्थीच मोठ्या प्रमाणात प्रवेश घेत आहेत. मध्यम आणि उच्च मध्यम वर्गातून आलेल्या अनेक दलित-आदिवासी विद्यार्थ्यांचे स्वप्न सुद्धा समाजातील तळागाळातील कष्टकरी-कामगारांच्या जीवनाशी जोडून घेणे हे नसून धंद्याच्या, नफ्याच्या व्यवस्थेत स्वत:चे स्थान बनवणे, आणि शोषणकारी व्यवस्थेचा भाग बनणे हे बनले आहे, त्यामुळे अनेकदा ते जातीय़ भेदभाव सहन करतात आणि आवाज उठवण्याची हिंमत करत नाहीत. अशामध्ये गरिब वर्गातून आलेल्या दलित विद्यार्थ्यांची, अथवा डॉ. पायलसारख्या संवेदनशील विद्यार्थ्यांची स्थिती अत्यंत बिकट होऊन बसते. तथाकथित सवर्ण, ओबीसी अशा समुदायांमधून आलेली कष्टकरी-कामगार वर्गीय़ विद्यार्थी सुद्धा अनेकदा जातीय़ अस्मितेच्या प्रचाराला बळी पडून शिक्षणव्यवस्थेचे हे शोषक चरित्र समजू शकत नाहीत आणि जातीयवादी विचार जोपासतात. उच्च शिक्षण संस्थांमध्ये जातीव्यवस्थेविरोधात व्यापक, झुंझार चळवळ तेव्हाच संघटीत होऊ शकते जेव्हा जातीअंताची भुमिका घेऊन व्यापक कष्टकरी-कामगार वर्गाच्या चळवळीसोबत विद्यार्थी चळवळ उभी राहील.

तेव्हा जातीय अत्याचारांविरोधात उभे राहणे, ही आज जात-धर्मापलीकडे जाऊन त्या प्रत्येक विद्यार्थ्याची सुद्धा गरज आहे जो नफ्याच्या व्यवस्थेने त्रस्त आहे, शिक्षणाच्या बाजाराने बेजार आहे आणि संधी मागत आहे. आज मुठभर दलित-आदिवासी किंवा इतर जात समुहातील वंचित घटकांना आरक्षण देऊन खऱ्या अर्थाने जाती व्यवस्थेला ओरखडा सुद्धा पडू शकत नाही. गरज आहे ती सर्वांसाठी मागण्याची! आज प्रत्येक विद्यार्थ्याला पूर्णत: मोफत आणि समान शिक्षणाच्या कायद्याची मागणीच खऱ्या अर्थाने वर्गीय-जातीय़ वास्तवाला खरी टक्कर देणाऱ्या लढ्याचा भाग असू शकते. फक्त आरक्षणासारख्या धोरणातून कामगार आणि कष्टकऱ्यांच्या मुला-मुलींना जीवनाचा सन्मानजनक दर्जा प्राप्त होऊ शकणार नाही हे वास्तव स्वीकारून, डॉ. पायलसारखे अजून बळी जाऊ नयेत यासाठी, जातीअंताची कामगार वर्गीय चळवळ उभी होणे आवश्यक आहे.

# गिरीश कर्नाडः एका निर्भय कलाकारास आदरांजली

**नागेश**

ज्येष्ठ रंगकर्मी, नाटककार, दिग्दर्शक, अभिनेता, विद्वान, उदारमतवादी, आणि प्रगल्भ सामाजिक जाणीव असलेला, सामाजिक-राजकीय प्रश्नांवर परखड आणि राज्यसत्तेविरुद्ध भुमिका घेण्यास न कचरणारा एक सच्चा कलाकार काळाच्या पडद्याआड गेला. दिनांक 10 जून रोजी आजारामुळे गिरीश कर्नाड यांचे वयाच्या 81 व्या वर्षी निधन झाले. ते गेल्या दोन वर्षापासून आजारी होते. गिरीश कर्नाड यांना त्यांच्या साहित्य आणि कला क्षेत्रातल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल अनेक पुरस्कारांनी सन्मानित देखील करण्यात आले होते. 1999 मध्ये' ज्ञानपीठ 'पुरस्कार त्यांना मिळाला.

कर्नाडांचा जन्म माथेरान येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण मराठीत झाले. त्यानंतर त्यांचे कुटुंब कर्नाटकात स्थायिक झाले. गिरीश कर्नाड यांचा गणित, इतिहास, याचबरोबर तत्त्वज्ञानाचा गाढा अभ्यास होता. पुराणकथा आणि वास्तवाची सांगड घालणारी नाटके गिरीश कर्नाडांनी लिहिली. ययाती, हयवदन, तुघलक, नागमंडल, अग्नि आणि पाऊस ही महत्त्वपूर्ण नाटके त्यांनी लिहिली. विजय तेंडुलकर, बादल सरकार, मोहन राकेश, अशा महान नाटककारांच्या बरोबरीने गिरीश कर्नाड यांचे नाव नाट्यकलेची उंची वाढवणाऱ्यांमध्ये घेतले जाते. आपल्या सर्व नाटकांमधून गिरीश कर्नाड यांनी पौराणिक कथांचा वापर करून आधुनिक जगातील मानवी जीवनातील कोलाहल आणि अंतर्विरोधांना समोर आणण्याचे काम केले.

बहुआयामी प्रतिभा असलेल्या गिरीश कर्नाड यांनी सिने सृष्टीवरही आपली छाप सोडली. सामाजिक मुद्द्याला हात घालणाऱ्या नाटकांच्या लेखनाबरोबरच कर्नाडांनी सामाजिक मुद्द्याला हात घालणारे सिनेमे देखील केले. 1970 साली 'संस्कार' या ब्राह्मणी मुल्यमान्यतांना आव्हान देणाऱ्या सिनेमाचे लेखक गिरीश कर्नाड होते. जब्बार पटेल दिग्दर्शित अशाच एका 'उंबरठा' या मराठी चित्रपटात त्यांनी मध्यवर्ती भूमिका केली. त्याचबरोबर त्यांनी काही कन्नड चित्रपटांचे दिग्दर्शन देखील केले. 'निशांत', 'मंथन', 'स्वामी', 'पुकार' सारख्या हिंदी समांतर सिनेमात देखील त्यांनी कलाकार म्हणून काम केले . 'वंश वृक्ष' सिनेमासाठी त्यांना सर्वोत्तम दिग्दर्शकाचा राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला.

अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या समर्थानमध्ये लढणाऱ्या कलाकारांमध्ये त्यांचे नाव अग्रणी होते. आपल्या उदारमतवादी वैचारिक भूमिकांमुळे गिरिश कर्नाड नेहमीच चर्चेत राहिले. कलाकारांनी सामाजिक-राजकीय प्रश्नांवर भुमिका घेतल्या पाहिजेत या मताचे ते होते. बोले तैसा चाले या उक्तीप्रमाणे त्यांनी राजकारण- समाजकारण यावर निर्भीडपणे आपली परखड मते मांडली त्यमुळे त्यांना काही वेळा टीकेला देखील सामोरे जावे लागले. त्यांनी नुसतीच भूमिका घेतली नाही तर वेळ पडली तेव्हा ते रस्त्यावर देखील उतरले. हिंदुत्ववादी शक्ती आणि धार्मिक कट्टरपंथीयांच्या विरोधात ते कायम आवाज उठवत राहिले. 1992 साली बाबरी मशिद पाडण्याचा निषेध, तस्लिमा नसरीन यांना दिलेल्या धमक्यांच्या विरोधात कलाकारांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या समर्थनात बोलणे, बीफ वर बंदी च्या विरोधात, नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्येनंतर झालेल्या पुण्यातील विरोध प्रदर्शन, गौरी लंकेश यांच्या हत्येविरोधातील आंदोलन, मॉब लिंचींग सारख्या घटनांवर, स्टीलच्या फ्लायओव्हरच्या विरोधात, अर्बन नक्षल च्या नावाखाली चळवळीतील कार्यकर्त्यांच्या अटके विरोधात झालेले आंदोलन, इत्यादी मुद्यांवर भुमिका घेण्यात कर्नाड कधीच कचरले नाहीत. शेवटच्या दिवसांमध्ये आजारी असतानाही अनेक विरोध प्रदर्शनांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला. भाजप सरकार सत्तेवर आल्यावर 'पुरस्कार वापसी'च्या आंदोलनामध्ये सुद्धा कर्नाडांनी भाग घेतला होता. त्यांच्या या भुमिकांमुळे, गौरी लंकेश यांच्या अगोदर गिरीश कर्नाड यांचे नाव हिंदुत्ववादी अतिरेक्यांच्या हिट-लिस्ट वर होते असे नुकतेच उघड झाले आहे. एक मोठी शोकांतिका आहे की आपल्याकडे गिरीश कर्नाडांसारखे सामाजिक, राजकीय मुद्द्यांवर भूमिका घेणारे बोटावर मोजण्याइतकेच कलाकार आहेत.

गिरीश कर्नाडांनी त्यांचे जीवन साधेपणात घालवले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या इच्छेनुसार शासकीय इतममात अंत्यसंस्कार न करता साधेपणाने त्याचा अंत्यसंस्कार करण्यात आला. अशा प्रतिभाशाली, लोकशाहीवादी, निर्भय सच्च्या कलाकारास विनम्र आदरांजली.

# तुमच्या देवाचा ऱ्हास

✍ *राहुल सांकृत्यायन*

मूल आईच्या पोटातून देवाचा विचार घेऊन जन्माला येत नाही. भूत, प्रेत तसेच इतर संस्कारां प्रमाणेच देवाचा विचार सुद्धा मुलाला आई-वडील तसेच भोवतालच्या सामाजिक वातावरणातून मिळत असतो. विश्वातील धर्मांमध्ये बौद्ध धर्माचे अनुयायी आज सुद्धा सर्वात जास्त आहेत, परंतु त्यांच्या मनामध्ये सृष्टीकर्त्याचा विचार सुद्धा येत नाही. रशियाची नव्वद टक्के जनता सुद्धा ईश्वराच्या भानगडी पासून मुक्त झालेली आहे आणि काही म्हाताऱ्यांना सोडलं तर हा विचार इतर कोणालाही भेडसावत नाही. हे निश्चित आहे की या म्हाताऱ्यांच्या मरणानंतर देवाचे नाव घेणारे तिथे कोणीच उरणार नाहीत. हिंदुस्थानामध्ये प्रार्थना सभा आणि हरिकीर्तन पाहून काही माणसांना असे वाटते की देवाचा विचार पुन्हा जोर धरत आहे. त्यांना माहीत नाही की ज्या लोकांमध्ये देवावरचा विश्वास आहे, त्यांच्यात सुद्धा आता त्याची व्याप्ती खूपच कमी झाली आहे.

ज्या समस्यांना, ज्या प्रश्नांना, ज्या नैसर्गिक रहस्यांना जाणून घेण्यात माणूस स्वतःला असमर्थ समजत होता, त्याचसाठी तो ईश्वराचा समज करून घेत होता. प्रत्यक्षात देवाचा विचार तर आहे सुद्धा अज्ञानाचीच निर्मिती. सुरुवातीचा माणूस जेव्हा घर बांधून राहत नव्हता, स्वतःच्या रक्षणासाठी जेव्हा त्याच्याकडे काही ओबडधोबड दगडां शिवाय काहीच नव्हते आणि सोबतच सर्व जमीन जंगलाने व्यापलेली होती ज्यामध्ये सिंह, वाघ, हत्ती, लांडगे इत्यादी मोठ-मोठे हिंस्र पशू फिरत फिरत असायचे. दिवसासुद्धा झाडांवर चढून, गुहांमध्ये लपून, अतिशय जागरूक राहून तो कसा तरी आपला जीव वाचवत होता. अंधारामध्ये त्याची वाट पाहत टपून बसलेल्या जंतूंची भीती तर त्याला घाबरवून टाकत होती. अशाप्रकारे तो अंधार प्राकृतिक मानवाच्या आजपर्यंतच्या भीतीचं कारण बनून राहिला आहे. हो, जेव्हा पुढे चालून माणसाने भाषेचा विकास केला, विचारांना व्यक्त करण्यासाठी त्याच्याकडे काही शब्दकोश तयार झाला आणि जेव्हा प्रत्येक पिढी आपल्या अनुभवांच्या कटू आठवणींना पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवायला लागली, तेव्हा प्रत्यक्षातील वास्तवापेक्षा काल्पनिक भीतींची संख्या खूपच वाढत गेली. आयुष्यभर आपले बलिष्ठ शासक आणि नेत्यांना माणूस थर-थर कापत होता. तो आपल्या आश्रितांसोबत बोलण्यापेक्षा, त्यांना लाथांनीच तुडवायचा. या सामान्य शिक्षण-प्रशिक्षण प्रक्रियेमध्ये कित्येक आंधळे, कित्येक लंगडे व्हायचे आणि कित्येक जिवानिशी जायचे. अशा निर्दयी मालक आणि प्रमुखांची भीती त्यांच्या मरणानंतर सुद्धा लोकांच्या मनातून जायची नाही. मेल्यानंतर सुद्धा ते आपल्या वस्त्यांमध्ये एखाद्या झाडावर अथवा एखाद्या कट्ट्यावर त्याचे संचार आहे असे मानू लागायचे. अंधार पडल्यावर कोणत्याही वेळी त्यांच्या प्रकट होण्याची भीती होती. अज्ञात भयाने अशाप्रकारे देवाचं रूप धारण केलं. आणि हेच विचार पुढे चालून महान देव (महादेव) किंवा ईश्वराच्या रूपामध्ये विकसित झाले.

सुरुवातीच्या माणसाचा मानसिक विकास अजूनही खालच्या पातळीवर होता. त्याच्या शंका साध्या आणि निरसन सोपं होतं. पाऊस का पडतो? पर्जन्य देवतेच्या नेतृत्वामध्ये ढगांचे समूह एखाद्या जलाशय किंवा डोंगरांमध्ये चरायला जातात, ते तेथून पाणी घेऊन पर्जन्याच्या आदेशानुसार ठीक -ठिकाणी पाऊस पाडतात. इंद्र हा पावसाचा स्वामी आहे. तो कधीकधी वज्र चालवून आपला राग दाखवत असतो. हाच मेघनाद किंवा वीज आहे. डोंगरांच्या आकारांना ढगांच्या आकाराशी मिळतेजुळते पाहून त्या काळातील लोक समजत होते की डोंगरच आकाशामध्ये ढगांच्या रूपांमध्ये उडत आहेत. त्यांच्या विश्वासा नुसार डोंगरांना पंखसुद्धा होते, ज्यांना इंद्राने नाराज होऊन कधीकाळी आपल्या वज्राने कापून टाकले. प्रातःकाळी पूर्व दिशेला तांबडं फुटल्याबरोबर लाली का पसरते? हा उषेचा, स्वर्गातील देवीचा प्रताप आहे. त्याकाळी सूर्य आपल्या प्रखर तेजामुळे तप्त देव होता, आणि तो सात घोड्यांच्या रथावर स्वार होऊन त्रिभुवनाच्या यात्रेसाठी निघत होता. आगीच्या जवळ मोठ-मोठे हिंस्र पशू येऊ शकत नाहीत. मोठ-मोठाली झाडं आणि विशाल (ब्रम्ह) जंगलांना ती ढणा-ढणा जाळून टाकते. यामुळेच आग प्रत्यक्ष होती आणि तिला ते प्रत्यक्ष महान म्हणत होते. नदी, समुद्र हे सगळेच त्या माणसांसाठी देव होते, कारण त्यांच्यामध्ये ते अमानवीय दिव्यशक्ती पहात होते,



विनाश घडवून आणण्याची भीषण क्षमता पाहत होते. त्यांच्यामध्ये अशी अद्भुत रहस्य माणसांना दिसत होती ज्यांच्या गुंत्याला ते देवाच्या कल्पनेनेच सोडवू शकत होते. मानवाने नैसर्गिक शक्तींमध्ये अनेकेश्वरवादाला आपल्या ज्ञानाच्या मर्यादा खूप संकुचित असल्या कारणाने स्वीकारले होते. आता आम्हाला माहिती आहे, की ढग कसे तयार होतात, पाऊस कसा पाडतात, कुठून कुठला प्रवास करतात. कोण- कोणते देश त्यांच्या मार्गावर आहेत आणि कोणते दूर. वीज ढगांमध्ये कोणत्या कारणाने निर्माण होते? गडगडाट काय आहे? सूर्य आता आपल्यासाठी घोड्यांच्या रथावर स्वार राहिलेला नाही, आणि ना त्याचे ते गोल तोंड, दोन डोळे आणि आणि काळ्या मिशा असलेला चेहरा राहिलाय. त्याचा प्रवास सुद्धा आता पहिल्यासारखा राहिलेला नाही. उषादेवी आता सूर्याच्या निम्नतर लाल किरणांच्या व्यतिरिक्त वेगळं काहीच नाहीये. सुरुवातीच्या माणसासाठी सूर्य आकाशामधील सर्वात मोठा विशाल आणि तेजस्वी देव होता. आता आम्हाला माहिती आहे, की आकाशामध्ये चमकणारे हे छोटे -छोटे तेजपुंज तारे तेवढे छोटे नाहीत जेवढे आम्हाला दिसतात. त्यांच्यापैकी बहुतेक आपल्या सुर्यापेक्षाही लाखो पटींनी मोठे आणि तेजस्वी आहेत. आकाशाला अनंत म्हणून पूर्वजांनी त्याच्या विस्ताराचा एक अंदाज लावला होता, परंतु तो वास्तवाच्या आधारावर न होता अज्ञानाच्या आधारावर बांधलेला होता. प्रकाशाची गती प्रतिसेकंद एक लाख ऐंशी हजार मैल आहे. आजपर्यंत आम्हाला सर्वात जवळचा जो तारा माहित झाला आहे, तो इतका दूर आहे की त्याची किरणं आमच्यापर्यंत पोहोचण्यासाठी अडीच वर्षे लागतात. ध्रुव तारा आमच्यापासून दूर नाहिये, पण त्याच्या ज्या रूपाला आम्ही यावेळी पहात आहोत, ते आजपासून पन्नास वर्षांपूर्वीचे आहे. दहा-वीस हजार वर्षांमध्ये आपल्या किरणांना आमच्या पर्यंत पोहोचवणाऱ्या ताऱ्यांबद्दल आपण आश्चर्य करण्याची गरज नाही.. नक्षत्रमंडळामध्ये असेही तारे आहेत ज्यांच्या अंतराला किरणांच्या प्रवासाच्या वर्षांमध्ये सुद्धा सांगणे अवघड आहे. तारे, खगोल आणि प्राकृतिक जगाबद्दलच्या आपल्या या अज्ञानाला मनुष्य देवतांच्या आणि ईश्वराच्या आड लपवत होता..

भूकंप का होतो? चपट्या सपाट पृथ्वीच्या अवजड वजनाला शेषनागाने आपल्या खांद्यावर उचलून धरले आहे. थकल्यावर तो जेव्हा तिला एका खांद्यावरून उचलून दुसऱ्या खांद्यावर ठेवतो तेव्हा भूकंप होतो. आज कोण बरे या व्याख्येला मानू शकतो? कोण चंद्र आणि सूर्याच्या ग्रहणाला राहू राक्षसाचा अत्याचार म्हणू शकतो? परंतु कधीकाळी आपल्या पूर्वजांसाठी ह्या गप्पा म्हणजे अटळ सत्य होत्या. विज्ञानाने आपल्या अज्ञानाच्या मर्यादांना, कित्येक बाजूंनी अतिशय मर्यादित करून टाकलं आहे; आणि जितक्या लांब पर्यंत आपल्या ज्ञानाच्या सीमा वाढत गेल्या, तिथून ईश्वर आणि देवाच्या नावाचे उत्तर बाजूला सरत गेलं. अजूनही अज्ञानाचे क्षेत्र अतिशय विस्तृत आहे, परंतु आजची माणसं त्याला सरळ अज्ञानाच्या रूपात स्वीकारण्यासाठी तयार आहेत, ना की ईश्वर आणि देवाच्या पडद्याआड लपविण्यात.

धर्माच्या, भाषांच्या आणि कथांच्या तुलनात्मक अभ्यासातून दिसून येते की सृष्टिकर्त्या एका ईश्वराचा विचार माणसांमध्ये खूप नंतर आलेला आहे. जगातील सर्वात जास्त प्रगत जमाती युनानी, रोमन, हिंदू, चिनी, मिस्र इत्यादी तर आपल्या भरभराटीच्या मध्य काळापर्यंत याला स्वीकारण्यास तयार झाल्या नाहीत ;आणि त्यांच्यापैकी एखादीने या विचाराला मानले सुद्धा तरी सामीय धर्म वाल्यांसारखे वैयक्तिक ईश्वराच्या रूपांमध्ये नाही, तर विश्वरूप ईश्वराच्या रूपामध्ये.

अज्ञानाचे दुसरे नावच ईश्वर आहे. आपण आपल्या अज्ञानाला सरळ स्वीकारण्यास लाजत असतो, त्याच मुळे त्याच्यासाठी गोंधळलेले नाव ‘ईश्वर’ शोधून काढले गेले आहे. ईश्वरावरील विश्वासाचं दुसरं कारण म्हणजे माणसाची दुर्बलता आणि लाचारी आहे.

आल्या दिवशी येणारी सगळ्या प्रकारची संकटं, नैसर्गिक दुर्घटना, शारीरिक आणि मानसिक आजारांच्या असहाय्य वेदना सहन करता-करता जेव्हा माणसाला वाचण्याचा कोणताच रस्ता दिसत नाही, तेव्हा तो हे म्हणून समाधान करून घेऊ पाहतो की देवाची हीच इच्छा आहे; तो जे काही करतो, चांगलंच करतो; तो आमची परीक्षा घेत आहे, भविष्यातील सुखाला आणखीनच सुंदर बनवण्यासाठी त्याने हे नियोजन केले आहे. अज्ञान आणि असमर्थते शिवाय जर कोणताही इतर आधार ईश्वर-विश्वासासाठी आहे, तर तो आहे श्रीमंत आणि धूर्तांचा आपल्या स्वार्थाच्या रक्षणासाठीचा प्रयत्न. समाजामध्ये होत असलेल्या हजारो अत्याचार आणि अन्यायांना योग्य ठरविण्यासाठी त्यांनी ईश्वराचा बहाणा शोधून काढला आहे. धर्माच्या पाखंडाला चालविण्यासाठी आणि त्याला न्याय सिद्ध करण्यासाठी ईश्वराचा विचार खूपच सहाय्यक आहे. या संबंधात धर्माविषयी आम्ही अगोदरच लिहिले आहे, त्यामुळे त्याची पुनरावृत्ती करण्याची गरज वाटत नाही.

देवावरील विश्वास एका छोट्या मुलाच्या भोळ्याभाबड्या विश्वासा व्यतिरिक्त काहीच नाही. फरक एवढाच आहे की छोट्या मुलांचा शब्दकोश, दृष्टांत आणि तर्कशैली मर्यादित असते आणि मोठ्यांची थोडीशी विकसित. बास एवढाच विशेष फरक आपण या दोघांमध्ये पाहत असतो. एकदा तीन छोट्या-छोट्या मुलांनी माझ्याशी ईश्वरा बाबत चर्चा केली. त्यांचे वय सात आणि दहा वर्षांमधील होते. विचारले की देव कुठे राहतो, तर उत्तर मिळाले—"आकाशामध्ये". पृथ्वीवर म्हटले असते तर प्रत्यक्ष दाखवण्याची गरज पडली असती कारण धरती प्रत्यक्षाच्या सीमेमध्ये आहे. आकाश अज्ञानाच्या सीमेअंतर्गत आहे म्हणून तिथे देवाचे अस्तित्व जास्त सुरक्षित आहे. देवाच्या रंग-रूपाविषयी मुलांचं एक मत नव्हतं. कोणी त्याला आपल्यासारख्या चेहऱ्याचा सांगत होते तर कोणी विचित्र चेहऱ्याचा. "ईश्वर काय करतो?" हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न होता. याला मुलेसुद्धा अनुभवत होती कारण ज्या वस्तूचा आकार प्रत्यक्ष नसतो, तिची सत्ता तिच्या कार्यानेच सिद्ध केली जाऊ शकते. मुलांनी सांगितले—"तो आम्हाला जेवण देतो." "आणि तुमचे वडील?"—"वडिलांना देव देतो."

"ज्या दिवशी वडील कचेरीत वकिली करण्यासाठी जात नाहीत, त्या दिवशी का नाही त्यांच्या खिशात पैसे येत?" मुलांना समाजाच्या कठीण बांधणीची तेवढी माहिती नसते आणि जुगाराच्या खेळांसारखं वास्तविक न्याय न करता, कशाप्रकारे शंभर रुपये हरवून दोघांना जिंकले जाते, याची सुद्धा त्यांना कल्पना नसते. म्हणून त्यांनी अशा प्रकारचे प्रश्नोत्तर विचारले नाहीत. हो, त्यांना हे समजले की जोपर्यंत खाणेपिणे, कपडे, घर, खेळ-तमाशांचा खर्च देण्याचा प्रश्न आहे, त्याची काळजी आई-वडील आणि नातेवाईकांकडून घेतली जाते. तिथे ईश्वराची मदत संदिग्ध होऊन जाते. परंतु जेव्हा त्यांना विचारले गेले—"तुम्हाला डोकेदुखी कोण देतं? आई-वडील की सगे-

पान 2 वर

## लेखकाचा परिचय

*राहुल सांकृत्यायन खऱ्या अर्थाने जनतेचे लेखक होते. ते आजच्यासारख्या तथाकथित प्रगतिशील लेखकांसारखे नव्हते, जे जनतेच्या जीवन आणि संघर्षापासून अलिप्त राहून आपापल्या महालांमध्ये बसून कागदावर प्रकाश टाकत असतात. जनतेच्या संघर्षाचे मोर्चे असोत वा सरंजामदार-जमीनदारांच्या शोषण-दमनाच्या विरूद्ध शेतकऱ्यांच्या संघर्षाचा लढा असो, ते नेहमीच पहिल्या फळीत उभे राहिले. अनेक वेळा तुरूंगात गेले, यातना सहन केल्या. जमीनदारांच्या भाडोत्री गुंडांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्लासुद्धा केला, परंतु स्वातंत्र्य, समानता आणि मानवी स्वाभिमानासाठी ते ना कधी संघर्षातून मागे हटले आणि ना कधी त्यांची लेखणी थांबली.*

*जगभरातील 26 भाषा अवगत असलेल्या राहुल सांकृत्यायन यांच्या अचाट बुद्धीचे अनुमान यावरूनसुद्धा लावता येऊ शकते की, ज्ञान-विज्ञानाच्या अनेक शाखा, साहित्याच्या अनेक प्रकारांमध्ये त्यांनी हातोटी मिळवली होती. इतिहास, तत्वज्ञान, पुरातत्वशास्त्र, मानववंशशास्त्र, साहित्य, भाषा-विज्ञान इ. विषयांवर त्यांनी अधिकारवाणीने लेखन केले. बौद्धिक गुलामी, तुमचे अध:पतन, पळू नका-जगाला बदला, तत्वज्ञान-संदर्भ, मानवसमाज, वैज्ञानिक भौतिकवाद, जय यौधेय, सिंह सेनापती, साम्यवादच का?, बावीसावे शतक इ. रचना त्यांच्या महान प्रतिभेची ओळख स्वत:हूनच करून देतात.*

*राहुल देशातील दलित-शोषित जनतेला हर-तऱ्हेच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी लेखणीचा हत्यारासारखा वापर करायचे. त्यांचं म्हणणं होतं की, “साहित्यकार जनतेचा जबरदस्त सहकारी, सोबतच तो त्यांचा नेता (पुढारी) आहे. तो सैनिक आहे आणि सेनापतीसुद्धा.”*

*राहुल सांकृत्यायन यांच्यासाठी जीवनाचं दुसरं नाव गती होतं आणि मरण किंवा स्तब्धतेचं दुसरं नाव होतं गतिरोध. यामुळेच अगोदरच तयार असलेल्या मार्गावर चालणे त्यांना कधीही आवडले नाही. ते नव्या मार्गाचे संशोधक होते. परंतु फिरणे म्हणजे त्यांच्यासाठी फक्त भूगोलाची ओळख करून घेणे नव्हते. ते सुदूर देशांतील जनतेचं जीवन आणि त्यांच्या संस्कृतीशी, त्यांच्या जिजीविषेशी ओळख करून घेण्यासाठीचं फिरणं होतं.*

*समाजाला मागे ढकलणाऱ्या हरतऱ्हेच्या विचार, रूढी, मूल्ये, मान्यता-परंपरांच्या विरूद्ध त्यांचे मन अतिशय तिरस्काराने भरलेले होते. त्यांचं संपूर्ण जीवन आणि लिखाण याविरूद्ध विद्रोहाचं जितं-जागतं उदाहरण आहे. यामुळेच त्यांना महाविद्रोहीसुद्धा म्हटले जाते. राहूल यांची ही वेगळी रचना आजसुद्धा आपल्या समाजातील प्रचलित रूढी-परंपरांच्या विरूद्ध तडजोड विहीन संघर्षाची आरोळी आहे.*

# निवडणूका समाप्त, कामगारांची कपात सुरु

✍ **बिगुल पत्रकार**

**“कामगार क्रमांक 1” चे सरकार दुसऱ्यांदा सत्तेवर येताच मोठ्या प्रमाणात कामगार कपातीचे सत्र सुरू झाले आहे. अर्थव्यवस्थेचे गंभीर होत जाणारे संकट लक्षात घेता, हे तर निश्चितच आहे की, येणाऱ्या काळात हि कपातीची तलवार कामगारांच्या आणखी मोठ्या संख्येवर आघात करेल.** नफ्याच्या दराच्या घटीच्या संकटामुळे सगळ्याच कंपन्या आपापली गुंतवणूक कमी करण्याच्या दबावाखाली आहेत आणि हे स्पष्ट आहे की याचा सर्वात सोपा उपाय म्हणजे कामगारांवर केल्या जाणाऱ्या खर्चाच्या गुंतवणुकीत कपात करणे. एका झुंजार आणि एकताबद्ध कामगार आंदोलनाच्या अभावामुळे भांडवलदार वर्गाला असे करणे फार सोपे झाले आहे. हवं तेव्हा कामगारांना कामावरून काढून टाकण्याच्या कंपन्यांच्या 'अधिकारा'च्या रस्त्यात येणारा प्रत्येक अडसर दूर करण्याचे काम सरकार अगदी जोमाने करत आहे. **बाजारात मागणी असेल तेव्हा मनाला वाटेल त्या प्रकारे कामगारांना कामावर ठेवायचे आणि मागणी कमी झाल्यावर पुन्हा मनमानी पद्धतीने कामगारांना कामावरून काढून टाकायचे. यालाच म्हणतात 'हायर अँड फायर' (ठेवा आणि काढा) निती, जिला सुगम बनवण्यात मागील सर्व सरकारं सतत कार्यरत राहिली आहेत. मोदी सरकारने तर याबाबत उरल्या-सुरल्या कायद्यांच्या अडचणींना देखील संपवले आहे.**

निवडणूकीनंतर लगेच 'रिलायन्स जियो' आणि 'बीएसएनएल', म्हणजे देशातली सर्वात मोठी खाजगी दूरसंचार कंपनी आणि सर्वात मोठ्या सरकारी दूरसंचार कंपनीने हजारो कर्मचाऱ्यांना रस्त्यावर आणून याची सुरुवात केली आहे. याशिवाय, देशातील सर्वात मोठी कार बनवणारी कंपनी मारुती आणि तिच्या व्हेंडर कंपन्यांमध्ये देखील कामगार कपात सुरु झाली आहे .

### रिलायन्स जियो ने 5000 कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढले

मोदीच्या 'मालक क्र.1' मुकेश अंबानीची कंपनी जियोने, एका झटक्यात आपल्या 5,000 कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढून टाकले आहे, ज्यात जवळ जवळ 600 कायम आणि इतर कंत्राटी तत्वावर होते. यामध्ये कार्यालयातील कर्मचाऱ्यांपासून तांत्रिक विभागातील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. जियोच्या कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की प्रत्येक जागी व्यवस्थापकांना, त्या जागेतील कर्मचाऱ्यांना कमी करण्याचे आदेश देण्यात आलेत. म्हणजे, कपातीचा हा मारा इतक्यात थांबणारा नाही.

जियो मध्ये जवळजवळ 20,000 कर्मचारी काम करतात. याव्यतिरिक्त याहूनही अधिक संख्या अशा कामगारांची आहे जे काम तर जियो साठी करतात पण ते 'थर्ड पार्टी' म्हणजे कुठल्या तरी दुसऱ्या कंपनीचे कर्मचारी आहेत जिचा जियो सोबत करार आहे. इतर सर्व कंपन्यांप्रमाणे आता दूरसंचार क्षेत्रातसुद्धा एकूण भांडवलाचा अगदी छोटा हिस्सा कामगारांवर खर्च होतो. असे मानले जाते की, दूरसंचार कंपन्यांमध्ये गुंतवणुकीच्या 5 ते 6 टक्के एवढीच रक्कम कर्मचाऱ्यांवर खर्च केली जाते. परंतु संकट येताच सर्वात आधी यांच्यावरच कुऱ्हाड चालवण्यात येते. लाखो-कोटींमध्ये पगार घेणाऱ्या उच्च पदाधिकाऱ्यांच्या पगारात किंवा अंबानी आणि त्यांच्या लग्गू-भग्गूंच्या आलिशान जीवनात काहीच कमतरता येत नाही. नीता अंबानी आजदेखील रोज सकाळी अडीच लाख रुपयांचा चहा पीत असेल, भलेही जियोच्या हजारो कर्मचाऱ्यांच्या घरात चूल पेटणे बंद झाले असेल.

सप्टेंबर 2016 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदीचा फोटो असलेल्या जाहिरातींनिशी बाजारात उतरणाऱ्या जियोने सरकारी कृपेने शक्य झालेल्या भरभक्कम सवलतींमुळे बाजाराचा मोठा हिस्सा काबीज केला आणि तीन वर्षांपेक्षा सुद्धा कमी वेळात 30 कोटींपेक्षा जास्त ग्राहक बनवले. दूरसंचार बाजाराच्या 31% हिश्श्यावर कंपनीने कब्जा केला आणि मागील वित्तीय चौथ्या तिमाहीत ह्या कंपनीने 840 करोड रुपयांचा नफा कमावला, जेव्हा की वोडाफोन आणि एअरटेल सारख्या कंपन्या तोट्यात आहेत.

भांडवली खेळाचे नियमच असे आहेत आणि त्यात इतका खोटेपणा-फसवेगिरी आणि अपारदर्शकता आहे की सत्याचा शोध घेणं खूप कठीण होऊन बसतं. जसं कि, जियो च्या नफ्याच्या दाव्यांनाच बघूया. एका बाजूला हि कंपनी शेकडो कोटी रुपयांचा नफा लुटतेय, दुसऱ्या बाजूला 31 मार्च 2019 पर्यंत कंपनीवर एकूण कर्ज वाढून 67,000 कोटी रुपये झाले होते. परंतु निश्चिन्त रहा, जियोच्या 'फ्री' डेटा च्या नादात आपली विचारशक्ती हरवून बसलेल्या देशवासियांकडूनच याचीही वसूली होईल.

### बीएसएनएल च्या 30 टक्के कंत्राटी कर्मचाऱ्यांना काढण्याचा आदेश

लोकसभा निवडणुकीच्या काळातच हि बातमी आली होती की मोदी सरकारची उपेक्षा आणि अव्यवस्थेमुळे तोटा झेलणाऱ्या बीएसएनएल कंपनीचे 56,000 कर्मचारी काढून टाकण्यात येतील. निवडणुकीच्या काळात मोदीच्या प्रतिमेला कुठलीही क्षती पोहचू नये म्हणून बातमी दाबून टाकण्यात आली. परंतु निवडणुकीचे निकाल आल्यानंतर 2 आठवड्यातच हे आदेश आलेत कि बीएसएनएलच्या सर्व मंडळांमधून कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या 30 टक्के कर्मचाऱ्यांना काढून टाकण्यात यावे. अशा कर्मचाऱ्यांची संख्या हजारोंमध्ये आहे. सर्व जाणतातच की, मागच्या तीन दशकांच्या दरम्यान खाजगी कंपन्यांमध्येच नाही तर सरकारी कंपन्या आणि विभागांमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणावर कंत्राटीकरण झाले आहे आणि तांत्रिक कामांपासून ते कार्यालयीन कामांपर्यंत नवीन स्थायी भरती नाममात्र झाली आहे. जास्तीत जास्त काम कंत्राटी आणि प्रासंगिक कर्मचाऱ्यांकडून करवून घेतले जात आहे. आता कपातीची वीज सुद्धा सर्वप्रथम यांच्यावरच कोसळत आहे. अर्थात, स्थायी कर्मचाऱ्यांनी देखील खूप निश्चिंत राहू नये. मोदी सरकार बीएसएनएल मध्ये व्हीआरएस (ऐच्छिक निवृत्ती) घेऊन येत आहे आणि चांगल्या मोठ्या संख्येने जुन्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीची पावती पकडवून बाहेरचा रस्ता दाखवण्यात येणार आहे. बीएसएनएल यूनियन च्या मते हे खाजगीकरणाच्या दिशेने टाकलेले एक पाऊल आहे.

ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्यात येत आहे त्यांना कित्येक महिन्यांपासून पगार देखील मिळालेला नाही. संपूर्ण देशात जवळजवळ पाच महिन्यांपासून कर्मचाऱ्यांच्या पगारांचा भरणा थांबला आहे. पश्चिम उत्तरप्रदेशातील मंडळात 10-11 महिन्यांपासून आणि पूर्व उत्तरप्रदेश मंडळात तर एका वर्षांपासून त्यांना पगार मिळालेला नाही. हे कंत्राटी कामगार वेगवेगळ्या कंत्राटी कंपन्या व छोट्या कंत्राटदारांच्या माध्यमातून कामावर ठेवले जातात. परंतु त्यांना पगार आणि इतर भत्ते, इत्यादी बीएसएनएलच देत आली आहे. परंतु मागच्या काही महिन्यांपासून व्यवस्थापन कंत्राटदारांना सांगत आहे कि वित्तीय संकटामुळे त्यांच्याजवळ पैसेच नाहीत. नवीन निविदा देणे बंद केले आहे. जी कामं सुरु आहेत, ती पूर्ण झाल्यानंतर तिथे काम करणाऱ्या कामगारांना देखील कामावरून काढून टाकण्यात येईल.

मोदी सरकार एका बाजूला जियो वर नजराण्यांची लूट करत आहे—कित्येक राज्यांत उघडपणे सरकारी आदेश काढून सरकारी कर्मचाऱ्यांना जियोचेच कनेक्शन घेण्यास सांगितले गेले आहे—दुसरीकडे बीएसएनएलच्या सर्व सोयीसुविधा बंद करून तिला मारून टाकण्यात येत आहे कारण नंतर बीएसएनएल ची सगळी जमीन-संपत्ती देखील जियो कडे सुपूर्त करता येईल. ह्या वर्षी मार्च महिन्यात पहिल्यांदा असे घडले कि आपल्या 1.68 लाख नियमित कर्मचाऱ्यांना पगार द्यायला त्यांच्याकडे पैसेच नव्हते . अथक प्रयत्नांनी एका महिन्यानंतर प्रश्न सुटला. जानेवारी 2018 मध्ये दूरसंचार मंत्री मनोज सिन्हानी घोषणा केली होती की बीएसएनएल ला 4जी स्पेक्ट्रम देण्यात येईल ज्याच्याविना मैदानात टिकणे तिला अशक्य आहे. परंतु कंपनीला अजूनपर्यंत 4जी स्पेक्ट्रम मिळालेला नाही. दुसरीकडे संचारमंत्री रविशंकर प्रसाद निर्लज्जपणे विधान करत आहेत की बीएसएनएल ला प्रतिस्पर्धी बनावे लागेल.

### मोटारगाड्यांच्या विक्रीत भारी घट, मोठ्या प्रमाणात कपात सुरु

आर्थिक संकट गडद होण्याचे एक मोठे कारण ऑटोमोबाईल उद्योगाची खस्ता हालत आहे. गेल्या मे महिन्यात कारच्या एकूण विक्री मध्ये गेल्या वर्षाच्या तुलनेत 20.55 टक्के आणि उत्पादनामध्ये 12.23 टक्के मोठी घट झाली. देशातील सर्वात मोठी कार कंपनी असलेल्या मारुती सुझुकीने गेल्या जवळपास 3 महिन्यांमध्ये आपले उत्पादन जवळपास 39 टक्के कमी केले आहे. तिच्या कार विक्री मध्ये सुद्धा मोठी घट आली आहे आणि कंपनीजवळ न विकलेल्या कारचा मोठा साठा साचला आहे. मारूतीने आपल्या डिझेल कारचे उत्पादन एप्रिल 2020 मध्ये बंद करण्याची घोषणा केली आहे.

याचा परिणाम सुद्धा लवकरच समोर आला. ऑटोमोबाईल उत्पादनाच्या देशातील सर्वात मोठे केंद्र असलेल्या गुरगाव-माणेसर भागामध्ये मारूतीच्या तीन कारखान्यांमध्ये आणि तिच्यासाठी पार्ट्स बनवणाऱ्या व्हेंडर कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कामगार कपात होणे सुरू झाले आहे. गुरगाव-माणेसर क्षेत्रात मारूतीच्या जवळपास 400 व्हेंडर कंपन्या आहेत आणि जवळपास 75 व्हेंडर कंपन्या गुजरात मध्ये आहेत. मारूतीकडून ऑर्डर्स मध्ये कमी आल्यावर जवळपास या सर्वांनी आपल्या इथे कामगार कपात सुरू केली आहे.

मारूतीसाठी पार्टस बनवणाऱ्या माणेसर येथील बेलसोनिका कंपनीने आपले सगळे कॅज्युअल कामगार काढून टाकले आहेत. पुढच्या टप्प्यात जवळपास 200 अजून कामगारांना काढण्याची तयारी आहे. मारुती, होंडा, हिरो इत्यादींसाठी इलेक्ट्रीक पार्टस बनवणाऱ्या माणेसरच्या डेंसो कंपनीने मे महिन्यात शेकडो कामगारांना काढून टाकले. कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेशिवाय कंपनीच्या गेटवर काढून टाकलेल्या कामगारांची यादी देण्यात आली आणि कामगारांना गेट वरूनच परत पाठवले गेले. कामगारांना हे सांगितले गेले की त्यांच्या एका महिन्याचा पगार त्यांच्या खात्यात टाकला जाईल आणि आता त्यांनी येण्याची गरज नाही. हे ते कामगार होते जे डेंसो मध्ये 3-4 वर्षांपासून काम करत होते. सांगण्याची गरज नाही की या अंदाधुंद कारभारामुळे सरकारच्या श्रम विभागाला काहीच फरक पडलेला नाही.

गुरगाव-माणेसर मध्ये मारूतीच्या तीन कारखान्यांमध्ये जवळपास 35 हजार कामगार काम करतात ज्यामध्ये जवळपास साडे सहा हजार कामगार कायमस्वरुपी आहेत आणि बाकी टेंपररी, कॅज्युअल, ट्रेनी किंवा ॲप्रेंटीस आहेत. कंपन्यांसाठी कायम कामगारांना काढणे सोपे नाही, पण टेंपररी, कॅज्युअल, ट्रेनी आणि ॲप्रेंटीस कामगारांना काढले जात आहे.

गुरगाव पासून ते धारुहेडा आणि बावल पर्यंतच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये जवळपास दोन डझन कंपन्यांमध्ये कामगार कपात आणि टाळेबंदी झाली आहे. येत्या महिन्यांमध्ये ही प्रक्रिया अजून वेगवान होईल.

**अनुवाद - पूजा**

# बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ढिसाळ कारभाराची किंमत सामान्यांना प्राण गमावून कधी पर्यंत मोजावी लागेल ?

✍ **बबन ठोके**

मुंबई शहरातील गटारे आणि नाले सफाई व्यवस्थित झाली नसल्यानेच पावसाचे पाणी तुंबून राहते असा आरोप विरोधकांकडून कायमच केला जातो. यासाठी महापालिकेला लक्ष्यही केले जाते. ही बाब शंभर टक्के खरी असल्याचे कॅगच्या अहवालातून समोर आले आहे. त्यामुळे मुंबई तुंबण्यास महापालिकेचा ढिसाळ कारभारच कारणीभूत असल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्या दोन दशकापासून शिवसेना-भाजप बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये (बीएमसी) निवडून येत सोबत सत्तेत राहिले आहेत. असे असताना प्रत्येक वर्षी मुंबईत पावसाळ्यात हंगामी पावसामुळे पाणी साठवण्याची समस्या उद्भवते. कधीकधी तर याचे पुरामध्ये देखील रूपांतर होते असल्याचे पाहायला मिळते. यावर्षी सुद्धा पावसाने पूर्ण मुंबईला ठप्प करून टाकले. लोकांना बऱ्याच समस्यांना तोंड द्यावे लागले. मुंबई पालिकेच्या ढिसाळ कारभारामुळे मुंबई पुन्हा तुंबली. वेगवेगळ्या ठिकाणी पावसाचे व गटाराचे पाणी साठलेले दिसले. बऱ्याच ठिकाणी तर पावसाचे पाणी आणि गटारीचे पाणी एकत्र मिळून झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांच्या घरात देखील गेले. रेल्वे रुळावर देखील पाणी साचल्यामुळे मुंबईची लोकल बरेच ठिकाणी बंद करण्यात आली; तसेच बऱ्याच लोकल व बाहेरून येणाऱ्या ट्रेन सुद्धा संथपणे चालत होत्या. त्यामुळे प्रचंड मोठ्या प्रमाणात प्रवाशांना गैरसोयीला तोंड द्यावे लागले.

पावसामुळे जवळपास 37 लोकांचे मृत्यू झालेले आहेत. मुंबईतील मालाड व कल्याण येथे भिंत खचल्याने 25 लोकांचा मृत्यू झाला आहे, तसेच कुरण पिंपरीपाडा येथे झोपडपट्टीवर भिंत कोसळल्याने 22 लोकांचा मृत्यू झाला आहे. हॉस्पिटलमध्ये 310 लोकांना डेंगू, मलेरिया झाल्याने भरती करावे लागले आहे. अशा मध्ये मुंबई मधल्या पहिल्या पावसाने आशियातील सर्वात धनिक महानगरपालिकेची पोलखोल झाली आहे. महानगरपालिकेचे या वर्षाचे बजेट (2019–20) 30,000 कोटी रुपये आहे, ज्यापैकी 51.00% बजेटचा हिस्सा रस्त्यावर व पावसाचे पाणी वाहून जाणाऱ्या व्यवस्थेवर (स्टार्म वॉटर ड्रेन, storm water drain) वर खर्च करण्याचे जाहीर करण्यात आले होते. वस्तुस्थिती अशी आहे की, बीएमसीने मागील वर्षी एकूण बजेटच्या 37.00% एवढा खर्च केला आहे. पावसात प्रत्येक वर्षी याच घटना नियमित होत आहेत, पण जनतेचा विचार कोणाकडूनही होताना दिसत नाही. एकीकडे मुंबईला आंतरराष्ट्रीय फायनान्स सेंटर बनविण्याच्या वल्गना करण्यात येत आहेत, तर दुसरीकडे पाणी साठण्याच्या प्रकारामुळे 2 जुलै रोजी पूर्ण मुंबई बंद ठेवण्यात आली होती.

शिवसेना व बीजेपी द्वारे नियंत्रित असलेली बीएमसी आपल्या कामात आणि व्यवस्थापनात अयशस्वी झाली आहे. एवढे असून सुद्धा इंडियन एक्सप्रेस मधील लेखात शिवसेनेच्या नेत्या प्रियंका चतुर्वेदी यांनी अतिशय निर्लज्जपणे आपले अपयश लपविण्याचा प्रयत्न केला आहे. या लेखात प्रियंका चतुर्वेदींनी म्हटले आहे की, माणसाद्वारे निर्मित इमारतींना कोणतीही नैसर्गिक आपत्ती सावरू शकत नाही. या बोलण्यावरून हे स्पष्ट दिसून येते की सत्ताधारी आपल्या जबाबदारी पासून हात झटकण्याचा प्रयत्न करत आहेत. पुढे त्यांच्या लेखानुसार 2005 चा BRIMSTOWAD ( BRIhan-Mumbai STorm WAter Drainage ) प्रकल्प सर्वात चांगल्या प्रकारे पाणी व कचरा निचरण्याचे काम करत आहे. 1990 मध्ये या प्रकल्पाचा प्रस्ताव देण्यात आला होता. याच दरम्यान 26 जुलै 2005 मध्ये मुंबईत

पान 12 वर

# बिहार मध्ये लहान मुलांचा मेंदूज्वराने मृत्यू

## जपानी ताप किंवा लिचीचे नाही, गरिबीचे बळी!

✍ **डॉ निखिल एकडे**

नुकत्याच देशातील वेगवेगळ्या भागातून समोर आलेल्या लहान मुलींवरील पाशवी यौन हिंसेच्या घटनांनी समाजातील थंड शांततेला थोडे हलवले होते, तितक्यात बिहार मधील मुजफ्फरपूरमध्ये 'ॲक्युट एन्सेफलाइटिस सिंड्रोमने' (एक प्रकारचा मेंदूचा दाह) 140 मुलांचा बळी गेला आणि अजूनही लहान मुले ह्याची शिकार होत आहेत. एका बाजूला सर्व समाजात व्याप्त लहान मुली-महिलांवरील हिंसेच्या खऱ्या मुद्द्याला बगल देत टप्पल,उत्तर प्रदेश मधील बलात्काराच्या घटनेला हिंदुत्ववाद्यांकडून धार्मिक रंग देत दंगल सदृश वातावरण निर्मिती चालू होती, जय श्रीरामच्या नावावर कहर चालू होता, मध्यमवर्ग क्रिकेटमध्ये पाकिस्तानला हरवण्याच्या खुमखुमीत होता तर दुसऱ्या बाजूला कामगार कष्टकऱ्यांची लहान मुलं दवाखान्यांमध्ये जपानी तापामुळे दम तोडत होती.

ह्या घटनेने परत एकदा बिहार आणि **एकंदरीत देशातील आरोग्य व्यवस्थेचा दीर्घकालीक आजार, विकासाच्या बाता मारणाऱ्या आणि सुशासनाची डिंग हाकणाऱ्या सत्ताधारी वर्गाची थंड कसायाची भूमिका आणि नफेखोर व्यवस्थेचे कामगार कष्टकरी वर्ग विरुद्ध चरित्र चव्हाट्यावर आले.** डॉक्टरांच्या सुरक्षेच्या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्या इंडियन मेडिकल असोसिएशन आणि डॉक्टरांच्या ह्या घटनेवरील मौनातून त्यांचेसुद्धा वर्गचरित्र जनतेसमोर आले. या लहान मुलांच्या मृत्युकांडातून एक गोष्ट परत एकदा तीव्रतेने अधोरेखित होत आहे की पूर्ण प्रतिबंध करण्याजोगा आजार असताना, ह्या आजारावर बरेच आधी संशोधन होऊन इलाज उपलब्ध असताना सुद्धा कष्टकरी कामगारांना ही नफेखोर व्यवस्था चांगली आरोग्य सेवा देऊच शकत नाही. कारण **भांडवली मानवद्रोही नफेखोर व्यवस्था शिक्षण-आरोग्य-अन्नधान्य-स्वछता या सारख्या मूलभूत सुविधा आणि शक्य त्या प्रत्येक गोष्टीला फक्त नफेखोरीचे साधन म्हणूनच वापरते.** ॲक्युट एन्सेफलाइटिस सिंड्रोम मग तो जपानी तापामुळे झालेला किंवा लीची नावाच्या फळातील टॉक्सिनमुळे झालेला असो सहज प्रतिबंध करण्यायोगा आहे.

तुंबलेल्या पाण्यात पैदास करणाऱ्या क्यूलेक्स मच्छरावाटे, घाणीच्या साम्राज्यातील डुकरांमधील, ह्या जपानी तापाचा विषाणू माणसांमध्ये पोहोचतो. डुक्कर या विषाणुसाठी नैसर्गिक साठ्याचे काम करतात. परंतु **हा विषाणू सर्वांना एन्सेफलाइटिस करू शकत नाही. विषाणू शरीरात गेलेल्यां 250 व्यक्तींमागे फक्त एकालाच दृश्यस्वरूपात हा आजार होतो आणि हा आजार मुख्यतः कुपोषित, प्रतिकारशक्ती कमी असलेल्या मुलांमधे गंभीर स्वरूप धारण करतो आणि त्यांच्यामध्येच ॲक्युट एन्सेफलाइटिस सिंड्रोम होतो.** लक्षण आल्या नंतर ह्या आजाराचा उपचारही अतिशय सोपा आहे. फक्त योग्य निदान, चांगली आरोग्य सेवा-सुविधा आणि लाक्षणिक उपचार रुग्णाला बर करू शकतो.

लिचीमुळे जो टॉक्सिक एन्सेफलाइटिस होतो तो त्यातील हायपोग्लायसिन (Hypoglycin) नावाच्या घटकामुळे शरीरातील साखर एकदम कमी झाल्यामुळे त्याच लहान मुलांमधे होतो ज्यांच्या शरीरात कुपोषणामुळे साखरेची ही कमी भरून काढण्यासाठी साठाच नाही. ह्या परिस्थितीत शरीराची पूर्ण चयापचन प्रक्रिया (metabolism) बिघडून घातक पदार्थ शरीरात तयार होऊन एन्सेफलाइटिस होतो. ह्या आजाराचा सुद्धा पूर्ण प्रतिबंध शक्य आहे. **योग्य वेळेत उपचार मिळाला तर तो लाक्षणिक आणि फार सोपा आहे. तरी ह्या आजारातुन सुद्धा हजारो लहान मुलांचे बळी जात आहेत.** एका बाजूला आपल्या देशात पूर्ण भारतीय उपखंडाची अन्नाची गरज भागवण्याऐवढे अन्नधान्य पिकते आणि देशात दुसऱ्या बाजूला 40 ते 45 टक्के मुले गंभीर कुपोषणाची शिकार आहेत. इतकी संपन्नता देशामध्ये आहे तरी सुद्धा गरीबांच्या मुलांचे ह्यात बळी जातात, म्हणजे या व्यवस्थेमध्ये विज्ञान आणि आर्थिक विकासावर पूर्ण मक्तेदारी फक्त बांडगुळ नफेखोर मालकवर्ग आणि मध्यमवर्गाकडे आहे हे स्पष्ट होत नाही का?

**बऱ्याच पश्चिमी देशांमध्ये 19व्या शतकाच्या उत्तरार्धात संसर्गजन्य आजार फक्त काही भांडवली कल्याणकारी धोरणांद्वारे लोकांचे जीवनमान उंचावल्याने, स्वच्छ पाण्याची सार्वजनिक व्यवस्था, सांडपाणी आणि कचऱ्याच्या योग्य व्यवस्थापनाची व्यवस्था आणि पोष्टिक अन्नाच्या पुर्ततेमुळे जवळपास संपली.** हे त्याच काळात झाले जोपर्यंत अजून कुठलीही लस आलेली नव्हती, जंतु संसर्गाचा सिद्धांत (जर्म थिअरी, germ theory) म्हणजे संसर्गजन्य आजार जंतु म्हणजे जिवाणू-विषाणूमुळे होतात हे अजून माणसाला कळालेलेच नव्हते, ना उपचारासाठी प्रतिजैविकं (अँटीबायोटीक्स) उपलब्ध होती. आज ह्या सगळ्या गोष्टी उपलब्ध आहेत तरी संसर्गजन्य आजार अजूनही करोडो लोकांचे बळी घेत आहेत.

आजारी मुलं मुजफ्फरपुरच्या ज्या श्रीकृष्ण मेडिकल कॉलेज हॉस्पिटल या सरकारी रुग्णालयात भरती होती, तेथे इतर सरकारी रुग्णालयांप्रमाणे एका खाटेवर 2-3 मुलांचा उपचार होतोय, एक-दोन डॉक्टर मिळून 200-300 पेशंट, आयसीयू आणि वार्ड बघत आहेत, औषध आणि थर्मामीटर सुद्धा बाहेरून विकत आणायला लागतायेत. अशा परिस्थितीत वेळेत योग्य उपचार संभवच होऊ शकत नाही. सेवासुविधा-मनुष्यबळाच्या गंभीर कमीने रुग्ण अवस्थेत पोहोचलेल्या देशातील सर्व सरकारी रुग्णालयांची हीच अवस्था आहे.

**भांडवलदार मालकांच्या सेवेत मग्न मीडियासुद्धा या सर्व घटनेला टीआरपीचे आणि जनतेची दिशाभूल करण्याचे साधन म्हणून यथायोग्य रित्या वापरत होता.** ह्या हत्याकांडासाठी जबाबदार भांडवली व्यवस्थेला, त्यांची दलाली करणाऱ्या सर्व भांडवली पक्षांना, भाजपा-जेडीयू सरकार, मुख्यमंत्री, आरोग्य मंत्री आणि 2014 मधे निवडणूक प्रचारात मतांची भिक मागण्यासाठी ढोंगी जुमलेबाजी करणाऱ्या पंतप्रधान मोदीला कुठलाही प्रश्न न करता आयसीयूमधे पोहोचून नाटकबाजी करणारा मीडिया डॉक्टरांना यात पूर्ण दोषी ठरवत लोकांची दिशाभूल करत होता. ज्यावेळी बिहारचे आरोग्य मंत्री ह्या विषयावरील पत्रकार परिषदेत निर्लज्जपणे मॅच चा स्कोअर विचारत होता त्यावर दलाल मीडिया एक चकार शब्द बोलला नाही. भाजपच्या केंद्र सरकारचे आरोग्य मंत्री हर्षवर्धन, ज्यांनी 2014 मध्ये ह्याच प्रकारे 125 मुलांचा बळी गेल्यावर 50 बैठका करुन घोषणा केल्या होत्या, त्यांच काय झाल हे सुद्धा निर्लज मीडिया विचारू शकला नाही. आपल्याला हे समजावं लागेल की या आणि अशा सर्व प्रकारच्या घोषणा फक्त कामगार-कष्टकऱ्यांच्या तोंडाला पानं पुसण्याचं आणि व्यापक जन असंतोषाचा उद्रेक रोखण्यासाठी दिशाभुल करण्याचे काम करतात. ह्या घोषणेला पाच वर्ष झालेले आहेत. ना 100टक्के लसीकरण झालेले आहे, ना 100 बेडचा नवीन दवाखाना बनला, ना श्रीकृष्ण मेडिकल कॉलेजच्या सीट 100 वरुन 150 झाल्या, ना उच्च दर्जाच्या विषाणू-निदान लॅब चालू झाल्या. ह्या साठी त्यांच्याकडे पैसा-वेळ नाही कारण ह्या सरकारी दवाखान्यात कामगार-कष्टकारी जातात आणि ते जगो अथवा मरो, नफेखोर व्यवस्थेला त्यांच काही सोयरसूतक नाही. केंद्रातील भाजपा सरकार, बिहारमधील भाजपा-जेडीयू सरकार तर आपले खरे मालक, म्हणजे देशी-विदेशी भांडवलदारांच्या सेवेत 20-22 तास अहोरात्र काम करत आहेत आणि ह्याविरोधात कष्टकरी-कामगारांनी एकत्र येऊ नये म्हणून हिंदू-मुस्लिम, राममंदिर-गौमाता ह्यांच्या प्रभावी वापर करत आहेत.

कामगार ज्या ठिकाणी उपचाराची आस घेऊन आपल्या लहानग्यांना घेऊन जात होते तिथेच आपल्या डोळ्यासमोर त्यांना मृत्यूच्या दाढेत जाताना बघत असहाय होते. आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार बिहारमधील सामुदायिक स्वास्थ्य केंद्रांमध्ये 600 स्पेशलिस्ट डॉक्टरांची गरज असताना फक्त 82 पदे भरलेली आहेत. **देशाच्या स्तरावर 82 टक्के स्पेशलिस्ट, 40 टक्के टेक्नीशियन, 20 ते 40 टक्के नर्सेस आणि फार्मसिस्ट कमी आहेत. खरंतर हे आकडे चांगल्या आरोग्य व्यवस्थेच्या दृष्टिकोनातून तुटपुंजेच आहेत आणि या तुटपुंज्या जागा सुद्धा रिक्त आहेत.** म्हणजे विकासाच्या बाता करणारे केंद्र सरकार, बिहार आणि इतर राज्य सरकारांना सरकारी दवाखाने चालवण्यापेक्षा नागरिकांना खासगी दवाखान्यांमध्ये ढकण्यात जास्त रस आहे. खाजगी उपचार शक्य नसेल तर तुम्हाला मरायचे स्वातंत्र्य आहे! बिहारमध्ये आरोग्य खर्चाचा 80 टक्के हिस्सा आणि देशपातळीवर 74 टक्के परिवार स्वतः उचलत आहेत. राष्ट्रीय ग्रामीण स्वास्थ्य मिशन 2015 च्या माहितीनुसार जेथे 10,000 लोकसंख्येमागे एक उपकेंद्र अपेक्षित आहे, तिथे बिहारमध्ये 55,000 लोकसंख्येमागे एक उपकेंद्र आहे; 3,000 पेक्षा जास्त प्राथमिक आरोग्य केंद्रांची गरज आहे परंतु फक्त 1,883 आहेत; 800 सामुदायिक आरोग्य केंद्रांची गरज आहे परंतु जमिनीवर फक्त 200 आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानकानुसार एक हजार लोकांमागे एक डॉक्टरांची समाजाला गरज असते परंतु नॅशनल हेल्थ प्रोफाईल नुसार बिहारमध्ये 28,391 तर देशपातळीवर 15,500 लोकांच्या मागे एक ॲलोपथिक डॉक्टर आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या एका मानकानुसार आरोग्यावरील खर्च देशाच्या वार्षिक उत्पन्नाच्या कमीत-कमी 5 टक्के असायला हवा; पण भारताचा खर्च फक्त 1.02टक्के (2015-16) होता, जो सतत 1.5 टक्क्यांच्या आसपासच राहतो. सरकारी आरोग्य व्यवस्थेची एवढी गंभीर अवस्था असताना सरकार आरोग्य व्यवस्थेचे खाजगीकरण करत आहे, ही व्यवस्था कामगार-कष्टकऱ्यांच्या मुलांप्रमाणे सरकारी दवाखानेसुद्धा कुपोषित ठेवून, प्रतिबंधाच्या व्यवस्थेवर कुठलेही लक्ष न देत खाजगी नफा आधारित आरोग्यसेवेला प्रोत्साहन देत आहे. आज आरोग्य क्षेत्रात असलेल्या भांडवल गुंतवणुकीपैकी 75 टक्के वाटा खाजगी क्षेत्राचा आहे, व त्यांची प्राथमिकता जनतेचे आरोग्य नसून खाजगी नफा आहे.

मुजफ्फरपूरमध्ये घडलेली घटना आकस्मिक नाही, 1950 पासून देशात जपानी तापाचे रुग्ण मिळत आहेत. देशभरात 2013 मधे 7,845 रुग्ण आढळले त्यातील 1,273 रुग्णांचा बळी गेला, 2014 मध्ये 10,867 रुग्ण त्यातील 1,719 रुग्णांचा बळी गेला, 2015 मध्ये 8,079 रुग्ण त्यातील 1,112 रुग्णांचा बळी गेला म्हणजे ही लहान मुलं या मनुष्यभक्षी व्यवस्थेने घेतलेले बळी आहेत. ॲक्युट एन्सेफलाइटिस सिंड्रोम होऊन उपचारातुन वाचलेल्या मुलांपैकी राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोगाच्या आकडेवारीनुसार 6,500 मुलांना अपंगत्व आले आहे. आंधळेपण येणे, बोलता न येणे, मतिमंदत्व, पक्षघात यासारख्या गंभीर व्यंगत्वात आयुष्य काढावे लागत आहे. ह्या सर्व मुलांना त्यांच्या परिस्थितित तसेच सोडण्यात आले आहे, ही व्यवस्था त्यांची कोणतीही जबाबदारी घ्यायला तयार नाही.

2017 साली गोरखपुर मध्ये ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे याचप्रमाणे या नरभक्षी व्यवस्थेने जे लहान मुलांचे बळी घेतले त्यांना मीडीयाद्वारे विसरवण्यात आले आहे. परंतु ह्या घटनांना कामगार कष्टकऱ्यांनी आणि न्यायप्रिय लोकांनी विसरता कामा नये. 140 लहान मुलांची शरीरं थंड पडून अबोध झाली आहेत परंतु आपल्या धमण्यांत अजून गरम रक्त संचालित आहे, आपल्या संवेदना अजून किती काळ बोथट राहतील? आपल्याला आपल्या जिवंतपणाची साक्ष द्यावीच लागेल, आपल्या मुलांच्या सुद्धा जीवावर उठलेल्या ह्या नफेखोर भांडवली व्यवस्थेविरोधात आणि त्यांची दलाली करणाऱ्या सरकारांच्या विरोधात पेटून उठावेच लागेल.

# बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ढिसाळ कारभाराची किंमत सामान्यांना प्राण गमावून कधी पर्यंत मोजावी लागेल ?

**पान 11 वरून**

एका दिवसात सर्वात जास्त पाऊस (944 मिमी) झाला होता, ज्यामुळे 450 लोकांना प्राण गमवावे लागले होते आणि जवळपास 1,000 कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागले होते. तेव्हा जाऊन कुठेतरी बीएमसीने इंग्रजाच्या काळात तयार झालेल्या ड्रेनेज व्यवस्थेला व्यवस्थित करण्याच्या प्रकल्पाला हातात घेण्याचे ठरविले. या प्रकल्पाद्वारे 25 ते 50 मिमी प्रति दिवसाला पाण्याचा उपसा होणार होता. परंतु अकरा वर्षांमध्ये या प्रकल्पाचा खर्च 1,200 कोटी वरुन वाढून 2017 पर्यंत 4,000 कोटी रुपये इतका झाला आहे. एवढे पैसे खर्च करून देखील आजही हा प्रकल्प पूर्ण झालेला नाही. याशिवाय 2006 मध्ये दोन पंपिंग स्टेशन बनण्याचे देखील सांगण्यात आले होते. हे सुद्धा अजूनही अपूर्णच आहे. बीएमसीच्या या निष्काळजीपणाची व बेजबाबदारपणाची किंमत सामान्य नागरिकांना मोजावी लागते. बीएमसीच्या या ढिसाळ कारभाराला पाहता बीएमसीच्या कामाचे नियमित ऑडिट, सर्व प्रकल्पांची गांभीर्याने तपासणी आणि दोषींना शिक्षा आवश्यक आहे, अन्यथा प्रत्येक वर्षी 'येरे माझ्या मागल्या' प्रमाणे जलसंकटाला तोंड द्यावेच लागेल.

पावसाळा तर दूरच, इतर काळातही गोरगरिब कष्टकरी जनतेच्या वस्त्यांमध्ये पाण्यापासून ते स्वच्छतेपर्यंतच्या प्रश्नांवर मनपाची प्राथमिकता शून्य असते हे आपल्याला माहित आहे. या कारभाराला कारणीभूत आहे ते राजकीय पक्ष, बिल्डर लॉबी यांचे साटेलोटे. जनता आता खूप चांगल्या प्रकारे ओळखते की रस्ते असोत वा ड्रेनेज लाईन, काम करताना ढिसाळपणे काम केले की पुढच्या वर्षी आणि नियमितपणे तीच तीच कामे निघत राहतात आणि बिल्डर-ठेकेदारांना सतत पैशांचा पुरवठा चालू राहतो. निवडणुकीच्या काळात मग याच पैशाचा एक हिस्सा, हे मुंबईचे मालक असलेले बिल्डर-ठेकेदार विविध राजकीय पक्षांना पुरवतात. सत्तेमध्ये पक्ष कोणताही येवो, बिल्डर-ठेकेदारांची खरी सत्ता चालूच राहते. बिल्डर-राजकारण्यांच्या या अभद्र युतीला तोडल्याशिवाय आणि आपले स्वतंत्र कामगारवर्गीय राजकारण उभे केल्याशिवाय सामान्य जनता, कष्टकरी, कामगार यांची मुंबईच्या पावसामध्ये होणारी फरफट थांबणार नाही.

• संपादक मंडळ – सोमनाथ केंजळे, सत्यनारायण • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 204, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 9156323976, 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित